म. ग्र. सं. ठाणं
विषय
सं. नं.

नोंद नाही

भाग तिसरा.



॥ श्री ॥

कीर्तनतरंगिणी.

भाग ३ रा.

लेखक

वामन एकनाथशास्त्री केमकर

मुद्रक व प्रकाशक,

केशव रावजी गोंधळेकर

जगद्धितेच्छु प्रेस, ९०७ शनवार पेठ, पुणें.

आवृत्ति ५ वी.

किंमत १ रुपया.

सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या ग्रंथासंबंधीं सर्व प्रकारें मालकी गोंधळेकर यांनीं ठेविली आहे.

श्री.

प्रस्तावना.

कीर्तन म्हणजे काय व कीर्तनें करण्याचा प्रघात सुरू करण्याचें कारण काय व हा केव्हां कोणीं सुरू केला हें प्रथम लोकांस कळणें अवश्य आहे. कारण कोणत्याही विषयाचें मूळ किंवा त्यापासून प्राप्त होणारें फळ याचें ज्ञान जर नसलें तर कर्त्याची क्रिया आणि करविणाराचा हेतु निष्फळ होऊन व्यर्थ शीण मात्र होतो; तो होऊं नये यासाठीं याविषयीं पुढें विवेचन करितों:—

नारायणाच्या गुणांचे जे अनुवाद ते सशास्त्र वर्णन करून सहस्त्रावधि लोकांत उभें राहून सर्वांचें मनरंजन होईल अशा सामग्रीसह व्याख्यान देऊन सत्य एक परमात्मा याविषयीं ठसा उठवून देणें याचें नांव कीर्तन. भागवतांत जी नवविधा भक्ति सांगितली आहे तीपैकीं ही दुसरी होय.

कृतयुगापासून द्वापारयुगापर्यंत हा कीर्तनाचा प्रकार मुळींच नव्हता. त्या तीन्ही युगांत वसिष्ठ, विश्वामित्र, व्यास व पराशरादि महान् ऋषि ज्ञानसंपन्न असून तत्त्वज्ञानी होते, ते जीवांचा उद्धार व्हावा म्हणून अनेकविध शास्त्रें रचून व्यासपीठावर बसून लोकांस ज्ञान, कर्म आणि उपासना यांचीं अनेकविध व्याख्यानें देत असत. पुढें कलीचा प्रादुर्भाव झाल्यावर कांहीं कालपर्यंत त्या ऋषींनीं केलेल्या ग्रंथांवर लोक भरंवसा ठेवून श्रवण, मनन, निदिध्यासन करून कृतार्थ होत होते. अलीकडे लोक अगदीं कालग्रस्त होऊन अश्रद्धावान् व अकर्मास प्रवृत्त झाले. तेणेंकरून विद्या, बल आणि ज्ञान यांचा लोप होऊन लोक धर्माधर्मांचा विचार न करितां केवळ पशुतुल्य व्यापार करूं लागले. असें हें लोकांचें दुःख भगवद्भक्तांनीं मनांत आणून त्यांचा उद्धार व्हावा याकरितां रामदास, तुकाराम, ज्ञानेश्वर आदिकरून सांधूंनीं जगदुद्धारार्थ अवतार घेतले. व त्यांनीं अज्ञानी लोकांस जमा करून कीर्तनरूपानें नानाविध प्रकारें कथा सांगून पुष्कळ लोकांचा उद्धार केला. त्या अलीकडे कांहीं विद्वान् लोकांनीं शास्त्रविद्येच्या जोरानें व वाणीच्या माधुर्यानें व न्यायप्रतिपादक शास्त्राचे अनुरोधानें ईश्वराचे भक्तीकडे बरेच लोकांचीं मनें वळविलीं. परंतु ते आत्मसाक्षात्कारी नसल्यामुळें परमार्थाविषयीं अंध असून त्यांचे श्रोतेही अंध, मग मुक्त कसे होतील? हें सहजच कळतें.

प्रस्तुत काळीं कथा आणि पुराणें हे एक प्रकारचे व्यापारच बनून राहिले आहेत. बरें तो व्यापार तरी विद्वानांशिवाय चांगला व्हावयाचा नाहीं. विद्येच्या संबंधानें विचार केला तर दिवसेंदिवस शास्त्रज्ञ लोकांची संख्या कमी होत चालली आहे. बरें, ज्या ज्या ठिकाणीं पुराण आणि कथा होतात त्या त्या स्थळीं अविद्वान लोक व स्त्रिया यांखेरीज इतर समंजस लोक बहुधा मुळींच येत नाहींत असें म्हटलें तरी चालेल. कारण ज्या मासल्याचे विद्वान वक्ते त्याच मानानें श्रोते. कीर्तन म्हणजे ज्याच्या श्रवणापासून अद्वैत

ज्ञान प्राप्त व्हावयाचें तें सर्व एके अंगास राहिलें, पण पद्धतवार कोणास कीर्तन तरी करितां येत आहे काय ? तर तेंही नाहीं. त्यांतून कोणास कथा करावी असें वाटल्यास कोठल्या तरी कांहीं कविता पाठ करून असंबद्ध रीतीनें पूर्वरंग व आख्यान यांचा संबंधही न जाणतां कसा तरी वेळ घालवितात. कथेचे जुनें सांप्रदायिक न राहिल्यामुळें कथा म्हणजे कशी असावी हेंही कोणास समजेनासें झालें, ह्यामुळें आम्हीं जें कीर्तनतरंगिणी नांवाचें पुस्तक तयार केलें आहे त्याचा हा तिसरा भाग आहे. या भागांत हरिदासांस इतर दिवशीं कीर्तनास उपयोगीं पडणारीं स्फुट आख्यानें व त्यांचे पूर्वरंगही घातले आहेत.

दुसऱ्या भागांत हरिदासांस ज्यांविषयीं आवश्यकताच असते अशीं राम, कृष्ण, नृसिंह इत्यादिकांचीं जन्माख्यानें व शेवटीं गोपालकाला आणि ललित इतकें आहे. ह्या तिसऱ्या भागांत प्रथम मंगलाचरणापासून कीर्तनाचे क्रमानें भजन, नंतर प्रतिपाद्य विषयाचा अभंग किंवा पद त्यावर अनेक ग्रंथांतील सार्थ श्लोक, आर्या आणि कवित इत्यादि प्रमाणानें पूर्वरंग निरूपण, मग आख्यानाचा उपक्रम, नंतर आख्यान, शेवटीं उपसंहार व आरती याप्रमाणें सर्व आख्यानें लिहिलीं आहेत. या ग्रंथाचा उपयोग कीर्तन करूं इच्छिणाऱ्या लोकांस विशेष आहे. ज्याला तालसुराचें कामापुरतें ज्ञान व कांहीं वक्तृत्व आहे त्याला गुरूवांचूनही या पुस्तकाचे योगानें चांगलें कीर्तन करितां येईल.

या ग्रंथाचा, ज्यांच्या येथें उत्सव होतात त्यांस व हरिदास लोकांस व ग्रंथसंग्रहकर्त्यांस फारच उपयोग आहे.

रावजी श्रीधर गोंधळेकर.

अनुक्रमणिका.

—:o:—

	पृष्ठ.		पृष्ठ.
शबरी आख्यान	१—१८	हरिश्चंद्राख्यान	३६—६४
यक्षप्रश्नाख्यान	१८—१९	दुर्वासाख्यान	४४—४९
शतमुखरावणाख्यान	१९—२३	सुभद्राहरण	४९—५६
लक्ष्मणशक्ति	२३—३१	दामाजीचें चरित्र	५७—६१
द्रौपदीस्वयंवर	३१—३६	रामराज्याभिषेक	६१—६८

कीर्तनतरंगिणी.

भाग ३ रा.

शबरी-आख्यान.

पूर्वरंगनिरूपण.

श्रीगणेशायनमः ॥ नमनं ॥ श्रीमन्महागणाधिपतयेनमः ॥ श्लोक ॥ अविरलमदजल-निवहं भ्रमरकुलानीकसेवितकपोलं ॥ अभिमतफलदातारं कामेशंगणपतिंवंदे ॥ १ ॥ याकुंदेंदुतुषारहारधवलायाशुभ्रवस्त्रान्विता । यावीणावरदंडमंडितकरायाश्वेतपद्मासना ॥ याब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैःसदावंदिता । सामांपातुसरस्वतीभगवतीनिःशेषजाड्यापहा ॥ २ ॥ नमो गुरुभ्यो गुरुपादुकाभ्यो । नमःपरेभ्यः परपादुकाभ्यः ॥ आचार्यसिद्धेश्वरपादुकाभ्यो । नमोस्तु लक्ष्मीपतिपादुकाभ्यः ॥ ३ ॥ गुरुर्ब्रह्मागुरुर्विष्णुर्गुरुर्देवोमहेश्वरः ॥ गुरुः साक्षात्परंब्रह्मतस्मैश्रीगुरवेनमः ॥ ४ ॥ कृष्णंकमलपत्राक्षं । पुण्यश्रवणकीर्तनं ॥ वासुदेवंजगद्योनिं । नौमिनारायणंगुरुं ॥ ५ ॥ मूकंकरोतिवाचालं । पंगुंलंघयतेगिरिं ॥ यत्कृपातमहंवंदे । परमानंदमाधवं ॥६॥ संचिंतयेद्भगवतश्चरणारविंदं । वज्रांकुशध्वजसरोरुहलांच्छनाढ्यं ॥ उत्तुंगरक्तविलसन्नखचक्रवालं । ज्योत्स्नाभिराहतमहद्धृदयांधकारं ॥ ७ ॥

(असें मंगलाचरण झाल्यावर हरिदासानें देवास साष्टांग नमस्कार घालावा व मागील मंडळींनीं रामकृष्णहरिराम जयजय रामरामजयराम याप्रमाणें भजन करावें. नमस्कार झाल्यावर हरिदासानें पुंडलीकवरदे हरिविठ्ठल, पार्वतीपते हरहर महादेव, सीताकांतस्मरण जयजय राम असें नामस्मरण करून धृपद म्हणावें. धृपद झाल्यावर पुंडलीक० पार्वतीपते० सीताकां० असें म्हणून मूलपद म्हणावें) ॥ मूलपद ॥ (राग काफी.) सुखकर कर साधूचासंग ॥ सुखकर० ॥ध्रु०॥ क्षणभंगुरतनुजाणुनि हरिगुण ॥ श्रवणींकीर्तनींरंग ॥ १ ॥ सुखकर० ॥ जाईजणेंहेंसर्वहिजाइल ॥ रथगजधेनुतुरंग ॥ २ ॥ सुखकर० ॥ वस्त्रेंभूषणेंकैंचींअंतीं ॥ कोठेंछपरपलंग ॥ ३ ॥ सुखकर० ॥ आत्मारामबोधठसावुनि ॥ दृढतरराहे अभंग ॥ ४ ॥ सुखकर० ॥ भजन ॥ रामकृष्णहरि जयजय राम० ॥ पुन्हां मूलपद ॥ सुखकरकरसाधूचा संग ॥ सुख० ॥ ध्रु० ॥ क्षणभंगुर तनु जाणुनि हरिगुण ॥ श्रवणींकीर्तनींरंग ॥ १ ॥ सुखकर० ॥

उपोद्घात.

आद्यौ कीर्तनारंभाचे ठायीं अपरोक्षसाक्षात्कारी श्रीशुकसनकादि संप्रदायानुयायी आत्मारामनामक कविवर्य हे ज्यांस अत्युपयोगी अमूल्य परंतु क्षणभंगुर अशी नरतनु अदृष्टयोगानें सहज प्राप्त झाली असून जे गृह, धन, दारा इत्यादि विषयसुखांत सर्व काळ

निमग्न होऊन ईश्वरदत्त बुद्धयादि शक्तींचा तत्तद्विषयसंपादनार्थ अपव्यय करितात; आणि त्यामुळें नित्यानंदघन आत्मस्वरूपाविषयीं जे बहिर्मुख झाले आहेत त्यांस विषयसुखावर तुच्छत्वबुद्धि उत्पन्न होऊन सच्चिदानंदघन आत्मस्वरूपाकडे मनःप्रवृत्ति व्हावी आणि त्या योगानें आत्मसाक्षात्कार व्हावा या उद्देशानें सुखकर आणि सुलभ असें साधन सांगतात. ॥ सुखकर कर साधूचा संग ॥ सुख० ॥ ध्रु० ॥ आत्मस्वरूपसाक्षात्कार होण्यास मुख्य साधन सत्समागमच होय. सत्समागमानें भगवद्गुणश्रवणकीर्तन या ठिकाणीं प्रीति उत्पन्न होते; नंतर भगवद्विषयक प्रीति दृढ झाली असतां अनुक्रमें देहादि अनात्मवर्ग आणि स्त्रीपुत्रगृहादि भोग्यवर्ग यांचे ठिकाणीं हळूहळू विरक्ति होते. त्या योगानें आत्मज्ञान होऊन साधकांस कृतार्थता प्राप्त होते. यासाठीं हे मानवा—कर साधूचा संग ॥ सुख० ॥ १ ॥ आतां सत्संगति आत्मज्ञानास मुख्य साधन आहे अशाविषयीं आचार्य म्हणतात ॥ श्लोक ॥ सत्संगाद्धासनात्यागादात्माविद्याविचारणात् ॥ प्राणस्पंदनिरोधाच्चैजयेद्दोषंकमनः ॥ १ ॥ अर्थ.—आत्मस्वरूप हें अतींद्रिय म्हणजे वागादि सकलेंद्रियांस अगोचर असल्याकारणानें तें मनानेंच जाणलें पाहिजे, यास श्रुतिप्रमाण. ॥ मनसैवेदमाप्तव्यं ॥ आतां मन हें विषयसंस्कारयुक्त असतां आत्मस्वरूपाभिमुख कधींच व्हावयाचें नाहीं. याकरितां आधीं मनोजय केला पाहिजे. त्यास प्रथम उपाय सत्संग होय. सत्समागमानें दिवसानुदिवस ऐहिक आणि पारलौकिक विषयवासनांचा त्याग करून आत्मविद्येचा विचार तसाच प्राणस्पंदनिरोध म्हणजे योगाभ्यास यांच्या योगानें आधीं मनोजय करावा. अर्थात् मनःशुद्धि झाली असतां तें मन अंतर्मुख होऊन स्वरूपीं रममाण होतें. यावरून आत्मज्ञानास मुख्य साधन सत्समागम होय. म्हणून पदकार म्हणतात. ॥ कर साधूचा सँग ॥ सुखकर० ॥ १ ॥ सत्संगाविषयीं सुभाषितकार म्हणतात—दूरीकरोति दुरितं विमलीकरोति चेतश्चिरंतनमघं चुलकीकरोति ॥ भूतेषुकिंचकरुणां बहुलीकरोति संगःसतांकिमुनमंगलमातनोति ॥ २ ॥ अर्थ.—साधूचा संग कोणतें मंगल (कल्याण) करीत नाहीं 'अपि तु सर्वमपि मंगल आतनोति' तर सर्व मंगल करितो. काय काय करितो म्हणाल तर दुरित म्हणजे क्रियमाण पातक जें आहे त्यास दूर करितो म्हणजे तें होऊं देत नाहीं. तसेंच चित्तास 'विमलीकरोति' म्हणजे वासनामलरहित करतो आणि चिरंतन म्हणजे अनंत जन्मींचें संचित पाप जें त्यातें 'चुलकीकरोति' म्हणजे नाहींसें करितो. त्याचप्रमाणें भूतमात्रांचे ठिकाणीं दया वृद्धिंगत करितो. तेव्हां सत्संग काय एक करीत नाहीं ? तर सर्व कांहीं करतो. म्हणून कवि म्हणतात—कर साधूचा संग ॥ सुखकर० ॥ १ ॥ आतां सत्समागम करून काय करावें अशाविषयीं कवि प्रथम चरणांत सांगतात. ॥ क्षणभंगुर तनु जाणुनि हरिगुण ॥ श्रवणींकीर्तनींरंग ॥ ॥१॥ सुखकर० ॥१॥ ही तनु म्हणजे हा देह सकल पुरुषार्थसाधक असल्यामुळें अमूल्य आहे, परंतु क्षणभंगुर आहे. म्हणजे आतां आहे तसाच उत्तर क्षणीं राहील असा याचा भरंवसा नाहीं. याकरितां असलेल्या आयुष्यांत सर्वकाळ हरिगुणश्रवण व हरिकीर्तन यांचे ठिकाणीं प्रेमपूर्वक रममाण हो. श्रवणकीर्तन केल्यावांचून खरें सत्संगाचें फळ जें हरिभजन तें पूर्ण प्राप्त होत नाहीं. याविषयीं कवि लिहितात, ॥ आर्या ॥ यदि नं श्रवणेऽभिरुचिर्नश्रुतपूर्वोत्तरानुसंधानं ॥ नोद्रीधोमूलदृशिर्नचगुरुहस्तःकथंभजनपूर्तिः ॥ १ ॥

अर्थः—जर हरिगुणश्रवणाचे ठायीं अभिरुचि नाहीं, तसेंच पूर्वी ऐकिलें त्याचें अनुसंधान उत्तरश्रवणकालीं जर नसेल, त्याचप्रमाणें आर्द्रा म्हणजे भूतमात्राचे ठिकाणीं कृपार्द्रबुद्धि जर नसेल, तसेंच मूलस्वरूपावर जर दृष्टि नसेल आणि इतकेंही असून सद्गुरूचा पद्म-हस्त जर मस्तकावर नसेल तर भजनाची पूर्णता म्हणजे परमात्मैक्यज्ञान तें कसें होईल ? तर होणार नाहीं. यांतच श्लेषानें दुसरा एक अर्थ कवीनें साधला आहे. तो हाः—यदि म्हणजे जर ' श्रवणे ' श्रवण नक्षत्राचे ठायीं अभिरुचि नसेल, तसेंच श्रुत म्ह० प्रसिद्ध ज्या पूर्वा आणि उत्तरा यांचें अनुसंधान जर नसेल आणि आर्द्राविषयीं धी (ज्ञान) नसेल, त्याचप्रमाणें मूलनक्षत्रावर दृष्टि जर नसेल आणि त्यांत गुरु (श्रेष्ठ) असा हस्त नक्षत्र जर नसेल तर भजन (नक्षत्रसमूह) त्याची पूर्णता कशी होईल ? अर्थात् होणार नाहीं. तात्पर्य—सत्समागमास राहून श्रवणकीर्तनादि साधनें परम प्रेमानें करावीं या आशयानें कवि म्हणतात—॥ श्रवणीं कीर्तनीं रंग ॥ सुखकर० ॥ १ ॥ देहाच्या क्षणभंगुरत्वाविषयीं योगवासिष्ठकार लिहितात. ॥ श्लोक ॥ तडित्सुशरदभ्रेषुगंधर्वनगरेषुच ॥ स्थैर्ययेनविनिर्णीतंसविश्वसितुविग्रहे ॥ ३ ॥ अर्थः— राम म्हणतात, विद्युल्लतांचे ठायीं शरदृतूंतील अभ्राचे ठिकाणीं आणि गंधर्वनगरांचे ठायींहि स्थिरत्वाचा निश्चय ज्यानें केला असेल तो या क्षणभंगुर देहाचे ठिकाणीं स्थिरपणाचा विश्वास धरो. तात्पर्य, विद्युल्लतादिकांप्रमाणेंच देह क्षणमात्रें नष्ट होणार आहे. याविषयीं आणखी एक ठिकाणीं वासिष्ठकार म्हणतात ॥ श्लोक ॥ स्थिरतयासुखभासितयातयां सिततमुज्झितमुत्तमफल्गुच ॥ जगतिनास्तितथागुणवर्जितं मरणभाजनमायुरिदंयथा ॥ ४ ॥ अर्थः—या जगांत गुणवर्जित म्हणजे गुणांनीं रहित असें कांहीं नाहीं. कसें तर स्थिरत्वानें आणि सुखभासानें सर्वकाळ रहित तसेंच अति तुच्छ व मरणाचें भाजन म्हणजे पात्र असें हें आयुष्य जसें गुणशून्य आहे, तसें अन्य कांहीं नाहीं. तात्पर्य, अशा रीतीनें देह क्षणिक असें समजून निरंतर ईश्वरगुणानुवादाचें श्रवणकीर्तन याचे ठायीं रममाण हो. म्हणजे त्या योगानें सत्समागम आत्मज्ञानोत्पादनद्वारें फलद्रूप होऊन सुखकारक होईल. या आशयानें कवि म्हणतात. ॥ सुखकर कर साधूचा संग ॥ १ ॥ आतां निरंतर श्रवण कीर्तन होण्यास प्रतिबंधक जें गृह, धन, पशु इत्यादिकांचें मनांत चिंतन तें टाकण्यास उपायभूत व वैराग्याचें मुख्य बीज जें विषयांचें मिथ्यत्वानुसंधान त्याविषयीं दुसरे आणि तिसरे चरणांत सांगतात. ॥ जाईजणेंहेंसर्वहिजाइल ॥ रथगजधेनुतुरंग ॥ २ ॥ सुख० ॥ वस्त्रें भूषणेंकैचींअंतीं ॥ कोठें छपरपलंग ॥ ३ ॥ सुखकर० ॥ संपत्तीविषयीं वासिष्ठांत रामोक्ति आहे. ॥ श्लोक ॥ एषाहिविषमादुःखभोगिनां गेहनागुहा ॥ धनमोहगजेंद्राणांविंध्यशैलमहातटी ॥ ५ ॥ हिमंवैराग्यवल्लीनांविकारोलूकयामिनी ॥ राहुदंष्ट्रोविवेकेंदोःसौजन्यांभोजचंद्रिका ॥ ६ ॥ अर्थः—ही लक्ष्मी अति दुःसह आहे, कां तर ही सर्व दुःखरूप भोगी म्हणजे सर्प याची मोठी खोल दरीच आहे. तशीच निबिड जो मोह, मोह म्हणजे " अतस्मिंस्ताद्बुद्धिर्मोहः " म्हणजे अन्यथा भ्रम, ते हे कीं नित्यापरोक्ष जें आत्मस्वरूप सच्चिदानंदघन त्याचे ठिकाणीं परोक्षत्व असज्जड दुःखित्वादि भ्रांति अनात्मभूत जे देहेंद्रियादिक यांचे ठिकाणीं आत्मत्वभ्रांति उपेक्ष्य जे स्त्रीपुत्रादिक केवल परस्पर संकेतानेंच मात्र स्वकीयत्व पावलेले त्यांचे ठिकाणीं आत्यंतिक ममत्व. तसेंच प्रियतमत्व आणि त्यांच्या

साकल्यवैकल्यानें आपले ठिकाणीं साकल्य वैकल्य भावना, इत्यादि जे मोह हेच कोणीं गजेंद्र यांचें निवासस्थान जी विंध्याचलाची तटभूमि ती ही लक्ष्मी होय. ॥ १ ॥ आणखी ही कशी म्हणाल तर, वैराग्यरूप ज्या वल्ली त्यांस सुकविणारें असें हिम (थंडी) ही लक्ष्मी होय. आणखी अनेक प्रकारचे जे विकार (कामक्रोधादिक विपर्यास) हेच कोणी एक उलूक (दिवाभीत) यांची लक्ष्मी ही केवळ यामिनीचें (रात्र) होय. तशीच विवेक हाच कोणी एक इंदु (चंद्र) यास ही केवळ राहूची दंष्ट्राच आहे आणि सौजन्यरूपी सूर्यकमलास म्लान करणारी ही चंद्रिकाच आहे. ॥ २ ॥ त्याप्रमाणें गज, रथ, धेनु (गायी), घोडे, वस्त्रें, अलंकार हें सर्व जाईजणें (अनित्य) आहे, असें पूर्णपणें जाणून त्याविषयीं उदासीनत्वानें असावें. लक्ष्मीच्या चंचलत्वाविषयीं कवि म्हणतात.—॥ आर्या ॥ अनुभवतदर्दतावित्तंमौन्यान्मानयतसज्जनान्भजत ॥ अतिपवनपरुषविलुलितदीपशिखाचंचलालक्ष्मीः ॥ ६ ॥ अर्थः—हे जीव हो, ही लक्ष्मी अति प्रबल वायूनें चंचल झालेल्या दीपज्वालेप्रमाणें अति चंचल आहे. याकरितां बाप हो ! अदृष्टयोगानें जर तुम्हांस ती मिळाली आहे, तर तिचा स्वतः अनुभव घ्या; सत्पात्राचे ठिकाणीं दान करा; पूज्य ते सज्जन त्यांचा सन्मान करा आणि त्यांस भजा. तात्पर्य,-लक्ष्मीचा जो अत्यासक्ति धरूं नये; अशाप्रकारें वैराग्यशील अंतःकरण झाल्यावर सदुपदिष्ट आत्मतत्त्वज्ञान दृढ होतें; याविषयीं ज्ञानेश्वर म्हणतात. ॥ ओंवी ॥ वैराग्येवीणकांहीं ॥ ज्ञानासि तंव तगणें नाहीं ॥ हें विचारूनिठायीं ॥ ठेविलेंदेवें ॥ १ ॥ असो. याप्रमाणें प्रपंचीं वैराग्यपूर्वक सत्समागम झाला असतां काय होतें अशाविषयीं शेवटील चरणांत सांगतात,—आत्मारामबोध ठसावुनि ॥ दृढतरराहे अभंग ॥ ३ ॥ सुखकर० ॥ आत्मा हाच राम आहे असा दृढतर बोध होऊन मग तूं कालत्रयीं अखंडदंडायमान म्हणून अभंग असा राहशील. याकरितां असें सकलपुरुषार्थशिरोमणीभूत जें मोक्षपद त्यास अव्यभिचारी जें अद्वितीय साधन आत्मज्ञान तें प्राप्त व्हावें अशी इच्छा असेल तर हे जीवा ! तूं हेंच कर, कवि म्हणतात,—कर साधूचा संग ॥ सुखकर० ॥ ध्रु० ॥ आतां सत्समागमानें आत्माच राम असा बोध होऊन कोणास मोक्षसुख प्राप्त झालें, अशाविषयीं कवि शबरी-आख्यान निरूपण करितात.

शबरी-आख्यान.

॥ आर्या ॥ मलयाद्रितटीं होता एक पुलिंदाख्य मुख्य तो शबर ॥ जो मार्गीं स्वकुलाचें भरण करीबहुलुटोनिविप्रवर ॥ १ ॥ साकी ॥ कन्या त्याची शबरीनामकखेळेगृहीं लडिवाळ ॥ शांतसुशीलचि नकरिचपलता यापरिकंठींकाळ ॥ बुधहोपरिसाचरिताला ॥ मानासुमनींहोसुखमाला ॥ २ ॥ ओंवी ॥ कोणी एक द्विजाचे घरीं ॥ अंगणीं खेळती कुमर कुमरी ॥ तेथें येऊनियां शबरी ॥ क्रीडाकरी कौतुकें ॥ श्लोक ॥ (कामदाछंद) विप्रबोलिलाऐकसत्वरी ॥ खेळुंतूं-नकोंड्यर्थमंदिरीं ॥ खेळणेंजरीतातमायगे ॥ त्यागुनीमुखेंयेथराहिगे ॥ ४ ॥ दिंडी ॥ वदेशनरींतमुनीराजयाला ॥ तातमातात्यागुनीजीवनाला ॥ करूंकैसेंअजिकथातेंचिस्वामी ॥ करिन त्यागेंराहुनीयाचिधर्मा ॥ ५ ॥ आर्या ॥ बोलेविप्रतियेतें जाउनिमलयींसुचंदनीआण ॥

चंदन विक्रय करुनी पोषणकरिउदरमानसींजाण ॥ ६. ॥ अभंग ॥ वचनऐकुनी त्यागिलें सकळ ॥ राहिलीविमळविप्रगेहीं ॥ १ ॥ द्विजमुखेंतीतेंलाधेरामनाम ॥ करितांचिकामआठवीभावें ॥ २ ॥ ७ श्लोक ॥ (शार्दूलविक्रीडित) कोणीएकदिनींवनांतशबरीतीस्वार्थसाधावया ॥ जातांपर्वतगव्हरींसुनयनींकौतूकपाहूनियां ॥ थालीपूर्णमनींतद्रामगम्हणेधेनूपहावाघतो ॥ एकेठायिंकसेसदावसतिहोसद्योगहाभासतो ॥ ८ ॥ आर्या ॥ त्यागिरिवरुनीतोडुनि चंदनउदरार्थतांसुमतिवाहे ॥ तोंतेथेंएकगुहा निबिडध्वांतामनोरमापाहे ॥ ९ ॥ साकी ॥ वृकमृगउरशिखंडिकरिहरी व्याघ्रवत्समिलगय्या ॥ सुकपिकअरुवकहंससेनसंग विहरतहैं-इकठय्या ॥ १० ॥ पद ॥ मलयगव्हरींअद्भुतशोभापाहुनियाशबरी ॥ संतोषुनियांजायभीतरींपाहेनेत्रभरी ॥ ध्रु० ॥ मांजरमूषकसर्पखगपतिअद्वयवनिंचरती ॥ पंचाननमृगपशुपक्षीते सौख्यामधिंवसती ॥ तेजोमयतनु कनकासनिंश्रीयोगिनिभाग्यवती ॥ स्वरूपसुंदरमुक्तलतेपरि शोभावहुदिसती ॥ चाल ॥ माथांशोभेकबरीभार ॥ भस्मउटीअक्षमणिहार ॥ लागलीसमाधीथोर ॥ चाल ॥ सखारामम्हणेनाउनिभिल्लिणीवंदीबद्धकरीं ॥ संतोषुनियाजायभीतरींपाहे नेत्रभरी ॥ ११ ॥ श्लोक ॥ विरक्तांयोगिनींकाश्चित् मलयाद्रिगुहाश्रितां ॥ चीरांबरधरांदिव्यां जटामुकुटमंडितां ॥ १२ ॥ आर्या ॥ योजीमनांतऐसें सुमतिशिवाचीचकायहीरमणी ॥ जीचा विख्यातजगीं पुत्रतपस्येंततोकुमारमणी ॥ १३ ॥ साकी ॥ बडेप्रेमसेबोलतसबरीधनधनतेरीकाया ॥ कोनतुमारामातापीतागुरूकैचाजोगकमाया ॥ १४ ॥ पद ॥ (विश्वामित्रसभेआला ॥ मागतोमाझ्यारामाला ॥ या चालीचें) शबरीबोलेयोगिनिला ॥ परिसामाझ्याविनतीला ॥ ध्रु० ॥ कैसाप्राप्तझालायोग ॥ तेणेंभोगितसासुखभोग ॥ परमार्थाचा साधुनिलाग ॥ साधिलापरलोकींचावेग ॥ चाल ॥ कारण सांगावें मजला ॥ परिसा० ॥ १ ॥ दावीं मातेंश्रीरघुराव ॥ प्रार्थितेंमनिंधरुनदृढभाव ॥ सदयेसत्वरतूंमनपाव ॥ पावनज्याचेंकीबहुनांव ॥ चाल ॥ यास्तवममजविभ्रमला ॥ परिसामाझ्याविनतीला ॥ २ ॥ १५ ॥ आर्या ॥ एक्यापळांतकेला कुत्सितपरिदेहहातपोराशी ॥ तारियलेंमजबुडतां कवणअसादेहहातपोराशी ॥ १६ ॥ पद ॥ कडवें ॥ घडलासद्गुरुसंग तेणेंगेलादृश्यप्रसंग ॥ सद्गुरुऐसातो मातंग ॥ व्हावेंतत्पदकमळींभृंग ॥ भवआठविलादेवभेटविलादेऊनज्ञानअभंग ॥ व्हावेंतत्पद० ॥ १ ॥ १७ ॥ पद ॥ सुनसखिअबतुमबचनयेहिमनमेंसमझैये ॥ संतसमागमहरिकीर्तनमोसदारमरहिये ॥ ध्रु० ॥ करुनाकरगुरुराजमहातमकाननमोसुनिये ॥ देनालेनातजकरसारादयाधरमकरिये सुनसखि० ॥ १ ॥ सतगुरुबिनहरकबहीनमिलेयेयिखातरजाना ॥ महाराजमातंगपदजुगधरकेभवतरना ॥ सुनसखिअबतुमबचनयेहिसबमनमेंसमझैये ॥ २ ॥ चरनकमलमोसरनजाकेरामामिलनकबहोय ॥ पुछोयेहीसेवाकरकेस्वारथऔरनकोय ॥ सुनसखि० ॥ ३ ॥ सखारामप्रभुनोगिनीइहकारनसमुझावों ॥ हमहीअबलापात्रनहीहैंयेहिखातरकरनावो ॥ सुनसखि० ॥ १४ ॥ श्लोक ॥ कामदा ॥ वचनऐकतांशीघ्रचालिली ॥ तिथुनियांत्वरेंबावरीभली ॥ मुनिपदांबुजींलक्षठेविलें ॥ निकटिंराहिली कौतुकेंबळें ॥ १९ ॥ ॥ पद ॥ कडवें ॥ २ ॥ (मागील) निश्चितवेइनगुरुचीगांठ ॥ ऐसाचित्तींधरिलाहट्ट ॥ आनंदेंझाडीम्नानाचीवाट ॥ चाल ॥ सद्गुरुपाउलेंसुंदरसुकुमारवाटक कंटकदाट ॥ काढुनिपुष्पेंरचिलींअचाट ॥ आनंदें० ॥ २ ॥ ओंवी ॥ मातंगमुनीचीशिष्यमंडळी ॥ सन्निधअसतांवेळोवेळीं ॥ गुरुचरणदर्शनहेळीं ॥ प्राप्तनोहेशबरीतें ॥ २० ॥ श्लोक ॥

साकल्यवैकल्यानें आपले ठिकाणीं साकल्य वैकल्य भावना, इत्यादि जे मोह हेच कोणीं गजेंद्र यांचें निवासस्थान जी विंध्याचलाची तटभूमि ती ही लक्ष्मी होय. ॥ १ ॥ आणखी ही कशी म्हणाल तर, वैराग्यरूप ज्या वल्ली त्यांस सुकविणारें असें हिम (थंडी) ही लक्ष्मी होय. आणखी अनेक प्रकारचे जे विकार (कामक्रोधादिक विपर्यास) हेच कोणी एक उलूक (दिवाभीत) यांची लक्ष्मी ही केवळ यामिनीचें (रात्र) होय. तशीच विवेक हाच कोणी एक इंदु (चंद्र) यास ही केवळ राहूची दंष्ट्राच आहे आणि सौजन्यरूपी सूर्यकमलास म्लान करणारी ही चंद्रिकाच आहे. ॥ २ ॥ त्याप्रमाणें गज, रथ, धेनु (गायी), घोडे, वस्त्रें, अलंकार हें सर्व जाईजणें (अनित्य) आहे, असें पूर्णपणें जाणून त्याविषयीं उदासीनत्वानें असावें. लक्ष्मीच्या चंचलत्वाविषयीं कवि म्हणतात.—॥ **आर्या** ॥ अनुभवतदर्दतावित्तंमौन्यान्मानयतसज्जनान्भजत ॥ अतिपवनपरुषविलुलितदीपशिखाचंचलालक्ष्मीः ॥ ६ ॥ **अर्थः**—हे जीव हो, ही लक्ष्मी अति प्रबल वायूनें चंचल झालेल्या दीपज्वालेप्रमाणें अति चंचल आहे. याकरितां बाप हो ! अदृष्टयोगानें जर तुम्हांस ती मिळाली आहे, तर तिचा स्वतः अनुभव घ्या; सत्पात्राचे ठिकाणीं दान करा; पूज्य जे सज्जन त्यांचा सन्मान करा आणि त्यांस भजा. तात्पर्य,-लक्ष्मीचा जो वास्तविक उपयोग तो आचरण करून तिच्या अनित्यत्वानुसंधानेंकरून तिजविषयीं अत्यासक्ति धरूं नये; अशाप्रकारें वैराग्यशील अंतःकरण झाल्यावर सदुपादिष्ट आत्मतत्त्वज्ञान दृढ होतें; याविषयीं ज्ञानेश्वर म्हणतात. ॥ **ओंवी** ॥ वैराग्येवीणकांहीं ॥ ज्ञानासि तंव तगणें नाहीं ॥ हें विचारूनिठायीं ॥ ठेविलेंदेवें ॥ १ ॥ असो. याप्रमाणें प्रपंचीं वैराग्यपूर्वक सत्समागम झाला असतां काय होतें अशाविषयीं शेवटील चरणांत सांगतात,—आत्मारामबोध ठसावुनि ॥ दृढतरराहे अभंग ॥ ३ ॥ सुखकर० ॥ आत्मा हाच राम आहे असा दृढतर बोध होऊन मग तूं कालत्रयीं अखंडदंडायमान म्हणून अभंग असा राहशील. याकरितां असें सकलपुरुषार्थशिरोमणीभूत जें मोक्षपद त्यास अव्यभिचारी जें अद्वितीय साधन आत्मज्ञान तें प्राप्त व्हावें अशी इच्छा असेल तर हे जीवा ! तूं हेंच कर, कवि म्हणतात,—कर साधूचा संग ॥ सुखकर० ॥ ध्रु० ॥ आतां सत्समागमानें आत्माच राम असा बोध होऊन कोणास मोक्षसुख प्राप्त झालें, अशाविषयीं कवि शबरी-आख्यान निरूपण करितात.

शबरी-आख्यान.

॥ **आर्या** ॥ मलयाद्रितटीं होता एक पुलिंदाख्य मुख्य तो शबर ॥ जो मार्गीं स्वकुलाचें भरण करीबहुलुटोनिविप्रवर ॥ १ ॥ **साकी** ॥ कन्या त्याची शबरीनामकखेळेगृहीं लडिवाळ ॥ शांतसुशीलचि नकरिचपलता यापरिकंठींकाळ ॥ बुधहोपरिसाचरिताला ॥ मानासुमनींहोसुखमाला ॥ २ ॥ **ओंवी** ॥ कोणी एक द्विजाचे घरीं ॥ अंगणीं खेळती कुमर कुमरी ॥ तेथें येऊनियां शबरी ॥ क्रीडाकरी कौतुकें ॥ **श्लोक** ॥ (कामदाछंद) विप्रबोलिलाऐकसत्वरी ॥ खेळुंतूं-नकोऽन्यर्थमंदिरीं ॥ खेळणेंजरीतातमायगे ॥ त्यागुनीमुखेंयेथराहिगे ॥ ४ ॥ **दिंडी** ॥ वदेशबरीतेंमुनीराजयाला ॥ तातमाताऽत्यागुनीजीवनाला ॥ करूंकैसेंअजिकथातेंचिस्वामी ॥ करिन स्वांगेंराहुनीयाचिधामी ॥ ५ ॥ **आर्या** ॥ बोलेविप्रतियेतें जाउनिमलयींसुचंदनीआण ॥

चंदन विक्रय करुनी पोषणकरिउदरमानसींजाण ॥ ६. ॥ अभंग ॥ वचनऐकुनी त्यागिलें सकळ ॥ राहिलीविमळविप्रगेहीं ॥ १ ॥ द्विजमुखेंतींतेंलाधेरामनाम ॥ करितांचिकामआठवीभावें ॥ २ ॥ ७ श्लोक ॥ (शार्दूलविक्रीडित) कोणीएकदिनींवनांतशबरीतीस्वार्थसाधावया ॥ जातांपर्वतगव्हरींसुनयनींकौतूकपाहूनियां ॥ धालीपूर्णमनींतदामगम्हणेधेनूपहावाघतो ॥ एकेठायिंकसेसदावसतिहोसद्योगहाभासतो ॥ ८ ॥ आर्या ॥ त्यागिरिवरुनीतोडुनि चंदनउदरार्थतांसुमतिवाहे ॥ तोंतेथेंएकगुहा निबिडध्वांतामनोरमापाहे ॥ ९ ॥ साकी ॥ वृकमृगउरशिखंडिकरिहरी व्याघ्रवत्समिलगय्या ॥ सुकपिकअरुवकहंससेनसंग विहरतहैंइकठय्या ॥ १० ॥ पद ॥ मलयगव्हरींअद्भुतशोभापाहुनियाशबरी ॥ संतोषुनियांजायभीतरींपाहेनेत्रभरी ॥ ध्रु० ॥ मांजरमूषकसर्पखगपतिअद्वयवनिंचरती ॥ पंचाननमृगपशुपक्षीते सौख्यामधिंवसती ॥ तेजोमयतनु तनूकासनिंश्रीयोगिनिभाग्यवती ॥ स्वरूपसुंदरमुक्तलतेपरि शोभाबहुदिसती ॥ चाल ॥ माथांशोभेकबरीभार ॥ भस्मउटीअक्षमणिहार ॥ लागलीसमाधीथोर ॥ चाल ॥ सखारामम्हणेनाउनिभिल्लिणीवंदीबद्धकरीं ॥ संतोषुनियाजायभीतरींपाहेनेत्रभरी ॥ ११ ॥ श्लोक ॥ विरक्तांयोगिनींकाश्चित् मलयाद्रिगुहाश्रितां ॥ चीरांबरधरांदिव्यां जटामुकुटमंडितां ॥ १२ ॥ आर्या ॥ योजीमनांतऐसें सुमतिशिवाचीचकायहीरमणी ॥ जीचा विख्यातजगीं पुत्रतपस्व्येंततोकुमारमणी ॥ १३ ॥ साकी ॥ बडेप्रेमसेबोलतसबरीधनधनतेरीकाया ॥ कोनतुमारामातापीतागुरूकैचाजोगकमाया ॥ १४ ॥ पद ॥ (विश्वामित्रसभेआला ॥ मागतोमाझ्यारामाला ॥ या चालीचें) शबरीबोलेयोगिनिला ॥ परिसामाझ्याविनतीला ॥ ध्रु० ॥ कैसाप्राप्तझालायोग ॥ तेणेंभोगितसासुखभोग ॥ परमार्थाचा साधुनिलाग ॥ साधिलापरलोकींचावेग ॥ चाल ॥ कारण सांगावें मजला ॥ परिसा० ॥ १ ॥ दावीमातेंश्रीरघुराव ॥ प्रार्थितेंमनिंधरुनदृढभाव ॥ सदयेसत्वरतूंमनपाव ॥ पावनज्याचेंकींबहुनांव ॥ चाल ॥ यास्तवममजविभ्रमला ॥ परिसामाझ्याविनतीला ॥ २ ॥ १५ ॥ आर्या ॥ एक्यापळांतकेला कुत्सितपरिदेहहातपोराशी ॥ तारियलेंमजबुडतां कवणअसादेहहातपोराशी ॥ १६ ॥ पद ॥ कडवें ॥ घडलासद्गुरुसंग तेणेंगेलादृश्यप्रसंग ॥ सद्गुरुऐसातो मातंग ॥ व्हावेंतत्पदकमळींभृंग ॥ भवआठविलादेवभेटविलादेऊनज्ञानअभंग ॥ व्हावेंतत्पद० ॥ १ ॥ १७ ॥ पद ॥ सुनसखिअबतुमबचनयेहिमनमैंसमझैये ॥ संतसमागमहरिकीर्तनमोसदारमरहिये ॥ ध्रु० ॥ करुनाकरगुरुराजमहातमकाननमोसुनिये ॥ देनालेनातजकरसारादयाधरमकरिये सुनसखि० ॥ १ ॥ सतगुरुबिनहरकबहीनमिलेयेयिखातरजाना ॥ महाराजमातंगपदजुगधरकेभवतरना ॥ सुनसखिअबतुमबचनयेहिसबमनमेंसमझैये ॥ २ ॥ चरनकमलमोसरनजाकेरामामिलनकवहोय ॥ पुछोयेहीसेवाकरकेस्वारथऔरनकोय ॥ सुनसखि० ॥ ३ ॥ सखारामप्रभुनोगिनीइहकारनसमुझावों ॥ हमहीअबलापात्रनहींहैंयेहिखातरकरनावो ॥ सुनसखि० ॥ १४ ॥ श्लोक ॥ कामदा ॥ वचनऐकतांशीघ्रचालिली ॥ तिथुनियांत्वरेंबावरीभली ॥ मुनिपदांबुजींलक्षठेविलें ॥ निकटिंराहिली कौतुकेंबळें ॥ १९ ॥ ॥ पद ॥ कडवें ॥ २ ॥ (मागील) निश्चितघेइनगुरुचीगांठ ॥ ऐसाचित्तींधरिलाहट्ट ॥ आनंदेंझाडीस्नानाचीवाट ॥ चाल ॥ सद्गुरुपाउलेंसुंदरसुकुमारत्यातक कंटकदाट ॥ काढुनिपुष्पेंरचिलींअचाट ॥ आनंदें० ॥ २ ॥ ओंवी ॥ मातंगमुनीचीशिष्यमंडळी ॥ सन्निधअसतांवेळोवेळीं ॥ गुरुचरणदर्शनहेळीं ॥ प्राप्तनोहेशबरीतें ॥ २० ॥ श्लोक ॥

पाहूनियांमगम्हणेवधुलोकपाळा ॥ हाहाकरूंविधिवशेंघडतेंकपाळा ॥ मातंगदर्शन नसे-
मजलागिंकांहीं ॥ दुःखाब्धिमाजिंबुडतेंपरमार्थनाहीं ॥ २१ ॥ **आर्या** ॥ स्नानार्थतो प्रभातीं
गेलामातंगऋषितयेवाटें ॥ तेथेंपुष्परचितपथ पाहुनिआश्चर्यतेंमनीवाटे ॥ २२ ॥ **पद** ॥
(राग जोगी— मजला वरिल सुभद्रा काय कोणि० या चा०) आश्रमिंयेउनिमुनिवरतो ॥
बोलेशिष्यांसी ॥ ध्रु० ॥ स्नानाजातांलक्षुनिघाट ॥ झाडितोकवणस्वांगेंवाट ॥ उच्च-
नीचहरळकरूनिसपाट ॥ करितोथाटगुप्तत्वें ॥ आश्रमीं० ॥ १ ॥ तुम्हीजाउनियांसत्वर ॥
जाउनिआणानारीनर ॥ तोषविनदेउनियांसद्वर ॥ नकरांविलंबझडकरिजा ॥ आश्र० ॥ २ ॥
॥ ओंवी ॥ ऐसेंऐकूनियांवचन ॥ शिष्यनिघालेतेथून ॥ उत्तररात्रींपाहतीयेंऊन ॥ तंव
तेथेंकौतुकदेखिलें ॥ २४ ॥ **आर्या** ॥ पथझाडितांचिधरिली नेलीगुरुच्यासमीपतीशबरी ॥
तत्पदकमलविलोकुनि झालीलुब्धतेजशीभ्रमरी ॥ २५ ॥ **पद** ॥ कडवें ॥ (मार्गील)
पाहुनिमातंगभट्ट ॥ तेथेंशबरीझालीधिट्ट ॥ जाऊनिपायधरीघट्ट ॥ चाल ॥ जाऊनि
शरणप्रक्षाळिचरणतेव्हांतीर्थकेलेंगट्ट ॥ ३ ॥ **श्लोक** ॥ (मालिनी) ॥ मुनिवरनयनानें
पाहुनीपूर्णधाली ॥ चरणकमलवंदीखिन्नतातीनिवाली ॥ रघुपतिमजदावारामकैवल्यदानी ॥
तुजविणमजकोणीनाहिंवापानिदानीं ॥ २६ ॥ **साकी** ॥ कैसोदरसनहोयगोमोहे रामअ-
जोध्यावासी ॥ मैहूंमबरीदुवरीतामो वडीपापकीरासी ॥ २७ ॥ **आर्या** ॥ मुनिशबरीसम्ह-
णेकीं, शुद्धेयाआश्रमांततूंराहिं ॥ ऊच्छिष्टेंभक्षुनियां चित्तपुराणींचसर्वदावाहिं ॥ २८ ॥
झालीत्याउच्छिष्टें शबरीलाहीमनोज्ञतासिद्धी ॥ तत्काळगुरुमनोगत जाणुनिसेवेसियोजि-
लीबुद्धी ॥ २९ ॥ **दिंडी** ॥ सदुच्छिष्टेंतिसआत्मबोधझाला ॥ जन्मशतकृतअघसंघतैंजळाला ॥
मुनीबोलेशबरीसत्रिजगकैसें ॥ ज्ञानदृष्टीनेंसांगमलाऐसें ॥ ३० ॥ **श्लोक** ॥ होतांचिआ-
ज्ञामगसर्वसांगे ॥ तीसिद्धियोगेंकिमपीनमागे ॥ ब्रह्माहरीशंकरशक्रयांचा ॥ सांगेसमाचार-
हियोग्यसाचा ॥ ३१ ॥ **श्लोक** ॥ साधिकारशबरीसगमेमना ॥ श्रीगुरूसधृतसत्यभावना ॥
तैंम्हणेसमजसीगुजकन्ये ॥ रामनामभजगेजगिंधन्ये ॥ ३२ ॥ अल्पकाळसरतांरघुराम ॥
प्राप्तहोइलवनींसुखधाम ॥ शिष्यांसहभजेजगपाळा ॥ घेउनीनिशिदिनींजपमाळा ॥ ३३ ॥
आर्या ॥ प्राणांतींगुरुबोले शुद्धेयाआश्रमांततूंराहें ॥ मगथोड्यादिवसांनचि अत्यद्भुतराम-
रूपतेंपाहें ॥ ३४ ॥ **साकी** ॥ यापरिसांगुनिनिजशिष्यातें मुनिवरनिजतनुत्यागी ॥ ब्रह्म-
सुशाश्वतपदपावेतोमुक्तजाहलावेगीं ॥ पुढतीआलाश्रीराम ॥ सानुजकाननिंसुखधाम ॥
३५ ॥ **पद** ॥ (तीर्थीमाचीवार्तापरिसुनीधर्मराजतळमळी ॥ जशीकाउदकाविणमासुळी
या चा०) मातंगाश्रमिंराहेशबरीजाणुनियांद्विजवर ॥ बहिष्कृतिघालितिजाउनिवर ॥ ध्रु० ॥
कर्मभ्रष्टहेब्राह्मणझालेगुहेंतटेवितिबरी ॥ शबरितीद्विजसेवनआदरी ॥ अनाचारहाकायमां
डिलादिसेकपटअंतरीं ॥ कथावेंजाउनित्यांकितितरी ॥ चाल ॥ वर्ततांअसेतैंसानुजतोपावला ॥
काननींभ्रमेजोसुखकरमनिंभावला ॥ निजभक्तरक्षणाखळजनिंफुंपावला ॥ चाल ॥ सखाराम
प्रभुआलापरिसुनिउचंबळेसागर ॥ भक्तिचाशबरीसीझडकर ॥ मातंगाश्रमीं० ॥ १ ॥३ ॥
आर्या ॥ द्विजगातिप्रभुसिमग सांगतिमातंगवृत्तहर्षानें ॥ जेविंप्रतापरामग्रीष्मजनिततापजे-
विंवर्षानें ॥ ३७ ॥ **श्लोक** ॥ (शार्दूलविक्रीडित) कोणीगाउनिसांगतीशबरितेंश्रीरामआला
वनीं ॥ सौमित्रासहसौख्यमूर्तिपरिमेत्रैलोक्यचिंतामणी ॥ ऐसेंऐकुनिजायतीहरिखतोचित्तींनसे
मावला ॥ म तंगेंमजवोविलादिनम्हणेतोआनकींपावला ॥ ३८ ॥ **आर्या** ॥ न्यावेंउपायतन-

या यास्तवविपिनांतजाउनीशबरी ॥ वृक्षावरिवेंधुनियां बदरफळेंतोडिनिरखुनीशबरी ॥ ३९ ॥ श्लोक ॥ कटवाम्लतिक्तरसहीनफळांसिटाकी ॥ जींगोडगोडतितुकींवसनांतझांकी ॥ ओंटी भरीचचुरते उतरूनिभूमी ॥ चित्तींम्हणेनयनिंपाहिनतोविभूमी ॥ ४० ॥ ज्याच्यामस्तकिं दीर्घनूतनजटाफेंटादिसेटोपतो ॥ माजींवेष्टितवल्कलेंझळकतीदूजाम्हणेकोणतो ॥ आश्चर्या अतिगवलीबघुनियांतूणरिपाठीवरी ॥ राजीवाक्षअमाविलोकुनिवधूधांवेजशीबावरी ॥ ॥ ४१ ॥ साकी ॥ जटाजूटपृथुभालभ्रुकुटिद्विग काननकुंडलसोहे ॥ पीतवसनवनमालगरेतन निरखनिरखमनमोहे ॥ ४२ ॥ अंजनीगीत ॥ विनवीशबरीतैंरघुराया ॥ आहेविनतीमाझी पायां ॥ दासीवरतीकरूनीमाया ॥ छायाकरिरामा ॥ ४३ ॥ शतजन्मींचेंसुकृतफळलें ॥ तुझे चरणबाम्हणुनिदेखिले ॥ मनितंवसुंदररूपरोंखिलें ॥ जहालानवलाव ॥ ४४ ॥ श्लोक ॥ बहूदीससीराघवातूंभुकेला तुवांपाहिजेबाफलाहारकेला ॥ तुझ्याकारणेंम्यांफळेंगोडरामा ॥ अगाआणिलीसेविसीताभिरामा ॥ ४५ ॥ सारींक्षतांकितफळेंनिरखूनिडोळां ॥ कांहींअशीं म्हणतसेरघुराजभोळा ॥ चंचूपुटींचुबकण्यावनपांखरांनीं ॥ नेणोंदिल्याप्रतिनखोत्करपांखरांनीं ॥ ४६ ॥ चंचूक्षतेंहींनव्हतींदयाळा ॥ मींकांतशींआणिनहाकपाळा ॥ मींआपुल्याचावुनि शुद्धदांतें ॥ जाणूनिघेमीचरसप्रसादातें ॥ ४७ ॥ मधुरतरफळांचीपाहुनीपूर्णगोडी ॥ मगमजन-रपाळाठेविताहोयखोडी ॥ निरखुनिरघुनाथेंभावत्याभिल्लिणीचा ॥ अनुचितफलभक्षीईशजोहस्त-टीचा ॥ ४८ ॥ गीत ॥ तुजसन्निधमजठेवींरामा ॥ विरहनसाहेपूरितकामा ॥ यविणनरुचे मंगलधामा ॥ अन्यमलाकांहीं ॥ ४९ ॥ सखारामप्रभुनृपदाशरथी ॥ प्रसन्नहोउनिबोलेति-जप्रती ॥ या अवतारींनाहिंप्रतीति ॥ पुढतीयेईलगे ॥ ५० ॥ श्लोक ॥ अहंजन्मातरेकृष्ण-स्त्वंसुभद्राभविष्यसि ॥ तत्रावयोश्चिरंभूयात्सुखदायीसमागमः ॥ ५१ ॥ साकी ॥ अगलेज-नममोबहेनसुभद्रा होजायेगींमेरी ॥ बारावरसतकहिलामिलराहिये भगतिबडीहैतेरी ॥ ५२ ॥ ओंवी ॥ शबरीम्हणेदेवासी ॥ मी जातां पतिगृहासी ॥ तूं तेथें यावें निश्चयेसी ॥ निमित्त-कांहीं करूनियां ॥ ५३ ॥ श्लोक ॥ श्रीराम ऐकुनि म्हणे तिजलागिं जेथें ॥ जाशीलमी नियतयेइनजाण तेथें ॥ जन्मांतरींहयतुझ्यापतिचेधुवाया ॥ लाजेंनमीशबरिगे वसुंएकठाया ॥ ५४ ॥ साकी ॥ माव जाणुनि शबरीचा विभु प्रेमेबदरीफळतें ॥ भक्षणकरितांलक्ष्मणबोले कैसें मन हें वळतें ॥ रामाउच्छिष्टाखासी ॥ योग्यनचहें आपणासी ॥ ५५ ॥ दिंडी ॥ रामबोलेकौतुकपरिसआतां ॥ प्रेमभावें आणिलींफळेंताता ॥ म्हणुनिमजलाबहुइष्टगमतिबारे ॥ नकोसंशयमानसींभक्षिबोरें ॥ ५६ ॥ अभंग ॥ बोलेतीशबरीऐसेंकायरामा ॥ लक्ष्मणया नामातुझाबंधु ॥ १ ॥ असतांअसेंकांविचारीतुम्हांसी ॥ कौतुकमानसीभासेमातें ॥ २ ॥ सखारामप्रभुम्हणेभिल्लिणीसी ॥ चिंतुनीयोगासीकंठींकाळ ॥ ३ ॥ ओंवी ॥ ऐसेंऐकुनियां वचन ॥ तेथुनिरामाज्ञाघेऊन ॥ शबरीपावलीनिजस्थान ॥ नामस्मरणींनिमग्नहो ॥ ५७ ॥ आर्या ॥ अवलोकनार्थमुनिनें पाठविलातेस्थळींऋषिकुमर ॥ होतेंविपरीतकसेंपाहुनिसांगे द्विजांसमाचार ॥ ५८ ॥ श्लोक ॥ (शार्दूलविक्रीडित) ऐकूनीमगयापरीअनलसेक्रोधावले-सन्मुनी ॥ चित्तामाजिंपहातदाम्हणतिहोभ्रष्टत्वज्ञालेंजनीं ॥ स्पर्शास्पर्शपथांतहोयकुमराजा-णूनित्यामुंडिलें ॥ प्रायश्चित्तनदीजळींकरवितांतेंरक्ततापावलें ॥ ५९ ॥ श्लोक ॥ प्रायश्चित्ता-र्थमाह्मातुंशबरीस्पर्शदोषतः ॥ गतमात्रेमुनेःपुत्रेरक्तोदाऽभून्मलप्रभः ॥ ६० ॥ साकी ॥ पा-हुनियापरिघाबरलेद्विज म्हणतीरामःध्यावें ॥ प्रायश्चित्तवदेविभुउत्तम उक्तऐसेंसांगावें ॥ ६१ ॥

॥ओंवी॥ मलप्रभागंगेमाजींजाण ॥ श्रीरामकरितांजाऊनिस्नान ॥ मांसग्रंथीनलागतांक्षण॥ अकस्मातजाहल्या ॥ ६२ ॥आर्या॥ करितांस्नानरघूत्तम ग्रंथमयीजाहलीनदीसारी ॥ द्विजम्हणती सर्वांग्राहुनि शबरीचास्पर्शदोषहाभारी ॥ ६३ ॥ ओंवी ॥ सर्वव्यवसायराहिला ॥ रामचंद्रासन्निधतेवेळां पातलाअरण्यकमुनींचामेळा ॥ म्हणतीशरणसर्वस्वें ॥ ६४ ॥ पद (गोविंदा गोपाळा कृष्णा विष्णू घननीळा ॥ या चालीवर.) श्रीमद्राघवपूर्णपरात्परसच्चित्सुखदाता ॥ रविकुलभूषणदाशरथेनृपचूडामणेताता ॥ ध्रु० ॥ भवजलनिधिमग्नातें तारकचरणतुझेदेवा ॥ नेणुनिमहिमाळळबहुकलामत्सरमनिंहेवा ॥ श्री० ॥ १ ॥ अभिमानानें त्रस्ताचिकेलेंनसुचे आजकांहीं ॥ कोसलनृपतेकृपाकरुनियांकूर्मदृष्टिपाहीं ॥ श्रीमद्रा० ॥ २ ॥ कर्मठपणहें कायदींधलेंदूरगअपणासी ॥ व्यर्थतेणेंअशुद्धसरिताशुद्धकरींतिजसी ॥ श्रीमद्रा० ॥ ३ ॥ पाणीपाणीकरितीवाळेंकर्महिचालेना ॥ शोणितमांसेंभरिलीगंगाकष्टचिहेनाना ॥ श्रीमद्रा० ॥ ४ ॥ सखारामप्रभुबोलेशर्क्कीकांहिंनसेमाझी ॥ शुद्धकरायासमर्थशबरीतीसिकराराजी ॥ श्रीमद्रा० ॥ ५ ॥ ६३ ॥ आर्या ॥ शुद्धनदीजलव्हावें हें तुमच्यामानसीं असेल जरी ॥ शबरीसिशरणजावेंतीसंकटसागरींतुम्हांसतरी ॥ ६६ ॥ रामाज्ञापरिसुनिमुनि जातीद्रुतयोगिनीपियाठायां ॥ व्यायादर्शनसत्वर म्हणतीमातेकरींकृपाछाया ॥ ६७ ॥ श्लोक ॥ येरामभक्तिविमुखास्तेपांमामूत्समागमः ॥ इतिज्ञात्वैवशबरीआश्रमांतर्गृहंगता ॥ ६८ ॥ श्लोक ॥ (कामदा) विप्रसांगतीजानकीपते ॥ नःढळेअम्हांनायकेचते ॥ भिल्लिणीबलेगुप्तनाऊनी ॥ युक्तिचाकर्थीलोकपावनीं ॥ ६९ ॥ पद॥ (ज्याचेवंशींकुलधर्मरामसेवाहो० या० च०) रामबोलेऋषिलागींतुम्हीजावेंहो ॥ चरणरजशबरीचेस्वकरींघ्यावेहो ॥ ध्रु० ॥ तेचिनेउनिसरितेमार्जिंटाकाहो ॥ गंगाशुद्धहोईलनेत्रझांकाहो ॥ राम० ॥ १ ॥ सखारामप्रभुम्हणेविप्रवृंदाहो ॥ सुखेंजाऊनिशबरीभीमनेंवंदाहो ॥ राम० ॥ २ ॥ ७० ॥ ओंवी ॥ रामाज्ञाघेऊनिब्राह्मण ॥ शबरीचेपदरजघेऊन ॥ मलप्रमेंतटाकितांनेऊन ॥ शुद्धउदकजाहलें ॥ ७१ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ असो. याप्रमाणें शबरीनें श्रीरामप्राप्त्यर्थ मातंगमुनीचा समागम करून त्यांच्या सेवेनें आणि तदुपदिष्ट योगाच्या अनुष्ठानानें त्याच देहांत श्रीरामदर्शनाचा परमलाभ जोडला, एवढेंच नाहीं; शेवटीं आत्माच राम असा बोध अंतःकरणांत दृढ ठसून सर्वकाळ अभंग अशा स्वरूपसुखांत ती निमग्न झाली. म्हणून कवि पूर्वपक्षी म्हणतात, कीं हे मुमुक्षुजीवा! अत्यंत सुखकर असा साधूचा समागम कर आणि त्या योगानें ॥ आत्मारामबोधठसावुनि ॥ दृढतरराहेंअभंग ॥ ३ ॥ सुखकर करसाधूचासंग ॥ ध्रु० ॥ तवकथामृतंतप्तजीवनंकविभिरीडितंकल्मषापहं ॥ श्रवणमंगलंश्रीमदातंभुविगृणंतितेभूरिदाजनाः ॥ १ ॥

॥ आरती ॥ कायेन वाचा०॥ अच्युतं केशवं०॥ हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥ हरे-कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ पुंडलीकवर० ॥ पार्वतीपते० ॥ सीताकांत० ॥ सबसंतनकीजय ॥

॥ समाप्त. ॥

यक्षप्रश्नाख्यान प्रारंभः

पूर्वरंग.

श्रीगणेशायनमः ॥ अखिरल० ॥ इत्यादिनमनं ॥ नारायण हरी ॥ इतिभजनं ॥पुंडलिक०॥

पार्वती० ॥ सीताकांत० ॥ पद ॥ तयावरीदेवकरीलदया ॥ तयाव० ॥ ध्रु० ॥ स्वपरम्हणुनिमतिनधरींचराचरीं ॥ निर्मळभावजया ॥ १ ॥ तयावरी० ॥ रक्षकजोसकळांकमळापति ॥ जाणुनिनधरींभया ॥ २ ॥ तयाव० ॥ आनंदतनयम्हणेहरिकीर्तनीं ॥ काशीप्रयःगगया ॥३॥ तयावरीदेव० ॥

उपोद्घात.

आदौ कीर्तनारंभीं हरिभक्तशिरोमणि आनंदतनयकवि हे जीवांना अज्ञानावरणांत पडून संसारसंबंधीं अनेक दुःखें होतात तथापि ज्यांचें अंतःकरण या प्रपंचांतून परावृत्त न होतां पुनःपुनः विषयलंपट होतें, त्यामुळें अवश्य संपादनीय जो परमेश्वरानुग्रह त्यास जे अपात्र होत आहेत, त्यांनीं प्रपंचांत असून ती अपात्रता नाहींशी करून ईश्वराची दया आपणावर करून घ्यावी आणि त्या योगानें जन्ममरणप्रवाहांतून मुक्त व्हावें या उद्देशानें, परमेश्वराची कृपा कोणावर व कोणत्या प्रकारानें होते, अशाविषयीं प्रथम पदांत वर्णन करितात ॥ तयावरी देव करील दया ॥ तयावरी० ॥ तयावरी म्हणजे वक्ष्यमाण लक्षणांनीं संपन्न जो पुरुष त्यावर देव (ईश्वर) दया करतो; कोणावर म्हणाल तर प्रथम चरणांत सांगतात.—स्वपरम्हणुनिमतिनधरींचराचरीं ॥ निर्मळभावजया ॥ १ ॥ तया० ॥ चराचर म्हणजे चेतनाचेतनात्मक प्रपंच जो त्याचे ठिकाणीं जो स्वकीय आणि परकीय अशा प्रकारची बुद्धि धरीत नाहीं म्हणजे सर्व ठिकाणीं वस्तुदृष्ट्या समबुद्धि ठेवितो; तयावरी देव करील दया ॥ तयावरी०॥ याविषयीं भागवतकार म्हणतात.—॥श्लोक॥ हरिःसर्वेषुभूतेषुभगवान्स्तईश्वरः ॥ इतिभूतानिमनसाकामैस्तैःसाधुमानयेत् ॥ १ ॥ अर्थ ॥ सर्वांतर्यामी आणि सर्वशक्ति असा हरि हा, सर्वभूतांचे ठिकाणीं सारखा आहे. यास्तव प्राणिमात्रांस जें जें इष्ट असेल तें तें देऊन मनःपूर्वक त्याचा मान करावा. अर्थात् हा स्वकीय आणि हा परकीय अशी भावना न धरितां सर्व ठिकाणीं सारखे वृत्तीनें वागावें. कारण प्रत्येक पदार्थावर जसें क्रयविक्रयादि संबंधानें हें स्वत्व नित्य रहात नाहीं; त्याचप्रमाणें स्त्रीपुत्रादि, स्वजन म्हणून मानलेले जे त्यांचे ठिकाणींही स्वत्व हें नित्य रहात नाहीं, ह्याविषयीं भागवतांत षष्ठस्कंधीं शुकोक्ति आहे ॥ श्लोक ॥ यथावस्तूनिपण्यानिहेमादीनित. तस्ततः ॥ पर्यटंतिनरेष्वेवंजीवोयोनिषुकर्तृषु ॥ १ ॥ अर्थ—ज्याप्रमाणें सुवर्ण आदिकरून पदार्थ अनेक मनुष्यांचे ठिकाणीं क्रयविक्रयादि संबंधानें अनेकांच्या स्वत्वाश्रित होऊन रहातात त्याप्रमाणेंच हा जीव अनेक योनींत जन्मून अनेकांचे स्वत्वास आश्रय होतो. तात्पर्य, या न्यायानें पहातां कोणी कोणाचा स्वजन नाहीं आणि परका नाहीं, व्यवहारसंबंधानें एकाशीं एक संयुक्त होतात, त्यांत ऐकमेकांशीं आनुकूल्य प्रातिकूल्यसंबंधानें शत्रुत्व मित्रत्व पावतात, परंतु वास्तविक विचार केल्यास स्वपरभाव मानण्याचें कारण नाहीं; या न्यायानें ज्यांनीं आपपर सोडिलें आहे." याविषयीं ज्ञानेश्वर अनेक दृष्टांतांनीं प्रतिपादन करतात. ॥ ओंवी ॥ गायींचीतृषाहरूं ॥ व्याघ्राविषहोऊनियांमारूं ॥ हेंनेणेंचि गाकरूं ॥ तोयजैसें ॥ १ ॥ आपुलियाउजेडुकरावा ॥ पराव्याआंधारूपाडावा ॥ हेंनेणेचिगापांडवा ॥ दीपुजैसा ॥ २ ॥ अशा रीतीची समदृष्टि असण्याचा अंतःकरण

अति निर्मल पाहिजे. त्यावांचून समदृष्टि व्हावयाची नाहीं म्हणून विशेषण देतात— निर्मलभावजया ॥ तयावरी० ॥ ज्याचा भाव (अंतःकरण) अतिशय निर्मल (स्वपरभ्रांतिरूपमलानें किंवा विविधवासनोपरोगानें रहित) आहे अशा समबुद्धि पुरुषांवरच ईश्वर दया करतो. अशा आशयानें आनंदतनय म्हणतात. ॥ तयावरीदेव० ॥ तसेंच दैवी संपत्तीचें प्रथम अंग जें अभय त्याविषयीं दुसरे चरणांत प्रतिपादन करितात. ॥ रक्षकतोसकळांकमळापति ॥ जाणुनिनधरीभया ॥ २ ॥ तयावरी० ॥ जगांतील प्राणिमात्रांचें रक्षण करणारा एक कमलापति भगवान् आहे अशा दृढ निश्चयावर जो देह किंवा परिजन यांविषयींची कोणत्याही प्रकारें भीति धरीत नाहीं. आतां ईश्वरच सर्वांचें रक्षण करतो व त्याचें रक्षण नसून आपण कितीहि रक्षण केलें तरी निरर्थक होतें अशाविषयीं सप्तमस्कंधांत यमाची उक्ति आहे. ॥ श्लोक ॥ पथिच्युतंतिष्ठतिदिष्टरक्षितंगृहे स्थितंतद्विहतंविनश्यति ॥ जीवत्यनाथोऽपितदीक्षितोवने गृहेऽपि गुप्तोऽस्यहतोनजीवति ॥ ॥ अर्थ—मार्गांत सुटून पडलेला पदार्थ ईश्वरानें रक्षण केला असल्यास तेथेंही सुरक्षित राहतो आणि घरीं असून ईश्वराचें रक्षण जर नसेल तर तो पदार्थ नाश पावतो. तसेंच अनाथ मनुष्यावर ईश्वराची कृपादृष्टि असेल तर वांचतो आणि घरांत सुरक्षित असून ईश्वराचें रक्षण नसल्यास तो मनुष्य कितीही उपचारें केले तरी जगत नाहीं. असा निश्चय अंतःकरणांत दृढ धरून निर्वाहाची काळजी किंवा स्त्रीपुत्रादिकांची चिंता अथवा कोणत्याही संकटाविषयीं भीति अगदीं बाळगीत नाहीं; याविषयीं एक कवीची उक्ति आहे. ॥ श्लोक ॥ योमेगर्भगतस्यापिवृत्ति कल्पितवान्प्रभुः ॥ शेषवृत्तिविधानायसकिंमुसोऽथवामृतः ॥ १ ॥ अर्थ—जो प्रभु मीं गर्भांत असतांना माझी उपजीविका करिता झाला ! मग शेष राहिलेल्या आयुष्यांत माझा निर्वाह चालण्यास तो प्रभु निजला आहे कीं मृत झाला आहे ? तात्पर्य, अशा रीतीनें सर्वकाळ जो निश्चित, कुकर्मापासून परावृत्त असल्यामुळें लोकापवादापासून निर्भय आणि ' यदभाविनतद्भावि ' अशा पूर्ण निश्चयामुळें कोणतेंही स्थित्यंतर प्राप्त झालें असतां जो निरुद्वेग, त्यावरच परमात्मा दया करतो, अशा आशयानें आरंभपदांत कवि म्हणतात.—तयावरी देवकरील दया ॥ तयावरी० ॥ २ ॥ याचप्रमाणें भगवत्कीर्तनाचे ठिकाणीं अत्यंत अभिरुचि असणें हेंही भगवत्प्रसादाचें एक लक्षण होय म्हणून तिसरे चरणांत सांगतात ॥ आनंदतनयम्हणेहरिकीर्तनीं ॥ काशीप्रयागगया ॥ ३ ॥ तयावरी० ॥ हरिकीर्तन करणें किंवा श्रवण करणें हेंच तीर्थाटण अशा बुद्धीनें जो निरंतर भगवद्गुणानुवाद वर्णन किंवा श्रवण करतो तो भगवत्कृपेस पात्रभूत होतो; याविषयीं श्रीमद्भागवतांत प्रल्हाद म्हणतात.— ॥ श्लोक ॥ यदाग्रहग्रस्तइवक्वचिद्धसत्यक्रंदतेध्यायतिवंदतेजनम् ॥ मुह्युःश्वसन्वक्तिहरे जगत्पतेनारायणेत्यात्मगतिर्गतत्रपः ॥ १ ॥ तदापुमान्मुक्तसमस्तबंधनस्तद्भावभावानुकृताशयाकृतिः ॥ निर्दग्धबीजानुशयोमहीयसाभक्तिप्रयोगेणसमेत्यधोक्षजम् ॥ २ ॥ अर्थ—ज्या वेळेस हा पुरुष भगवच्चिंतनानंदांत निमग्न असल्यामुळें कधीं कधीं हंसतो कधीं कधीं ' आक्रंदते ' दीन व अज्ञानी जनांची दया मनांत येऊन आक्रोश करतो, कधीं कधीं अतिगुप्त जें परमात्मतत्त्व त्याचें ध्यान करतो, कधीं कधीं सर्व भूतांचे ठिकाणीं ईश्वर आहे अशा विचारानें सर्व जनांस वंदन करितो आणि कधीं कधीं आत्मचिंतन करीत असतां श्वासोच्छास

सोडीत निर्लज्ज होऊन हे हरे, हे जगत्पते, हे नारायणा, याप्रमाणें नामसंकीर्तन करितो. ॥ १ ॥ तेव्हां तो मनुष्य भगवच्चिंतनाच्या दृढाभ्यासानें अंतःकरण तदाकार झालें असतां सर्व कर्मवासना दग्ध होऊन श्रेष्ठ अशा भक्तियोगानें अधोक्षज जो परमात्मा त्यास प्राप्त होतो; अर्थात् परमेश्वराच्या अनुग्रहास पात्र होतो; हाच अभिप्राय मनांत आणून आनंदतनय म्हणतात.—तयावरीदेवकरील दया ॥ ध्रु० ॥ असो. याप्रमाणें ईश्वराची दया झाली असतां सर्व सुखाची प्राप्ति आणि अनिष्ट निवृत्ति ही सहजच होतात; यांत संशय नाहीं. आतां सर्वरक्षक ईश्वर आहे. अशा सत्यनिष्ठेनें राज्यादिकांविषयीं उदासीन व स्वपरभेदबुद्धिविवर्जित जो धर्मराज त्यास ईश्वराच्या कृपेनें सुखप्राप्ति व अनिष्ट जें दुःख त्याची निवृत्ति कशी झाली याविषयीं कवि यक्षप्रश्नाख्यान निरूपण करितात.

अथ यक्षप्रश्नाख्यान प्रारंभः

आर्या ॥ सरलावनवासमग द्वैतवनींपांडुनंदनवसतिते ॥ दिवसांतवांकुल्याशत दाविलहोते हिनंदनवसतितें ॥ १ ॥ **ओंव्या** ॥ कथाश्रवणेंक्रमितीवेळ ॥ म्हणतीलोटल्यादुष्टकाळ ॥ त्रयोदशवर्षांनंतरेंखेळ ॥ वीरश्रीयेचामाजवूं ॥ २ ॥ ऐसेंसहजअनुवादत ॥ तंवब्राह्मणपातलात्वरित ॥ धर्मरायातेंविनवित ॥ म्हणेदुश्चितनिवारीं ॥ ३ ॥ गृहांगणींमंथारणी ॥ अनतांपातलेहरिणहारिणी ॥ वृत्तमोडांनिसंघर्षणीं ॥ अंगकंडूशांतविती ॥ ४ ॥ अरणींअडकलियाशृंगीं ॥ मृगघेऊनिपळालेवेगीं ॥ अग्निहोत्रनपवेभंगीं ॥ ऐसेंकरींधर्मराया ॥ ५ ॥ ऐकूनउठलेपांचहीजण ॥ करींघेऊनिधनुष्यबाण ॥ वनोपवनीं धांवतां गहन ॥ कुरंगकोठेंलक्षेना ॥ ६ ॥ **साकी** ॥ विप्रवचन जबसुनतधर्मतब धनुखबानहातन्मो ॥ लेतबंधुसहकाजदुजनके धुंडतमृगकानन्मो ॥ ७ ॥ **आर्या** ॥ शृंगाग्रविलग्नाराणि तोमृगगेलाचिलागलेहोते ॥ त्यामार्गें जे फाराचि पाचहिनरसिंहभागले होते ॥ ८ ॥ भेटेवनींअकस्मात्तापापहराधुसाचिएकवट ॥ तच्छीतच्छायेतें सेवितितेतृपितवीरएकवट ॥ ९ ॥ **साकी** ॥ देखतहीमृगहाथनआवे थग्गयेपांचो भय्या ॥ आयेसबमिलिवृच्छनकेतल बैठतहीइकठय्या ॥ १० ॥ **ओंवी** ॥ मध्यान्हींपातलाभानु ॥ उष्णींश्रांतला कुरुनंदनु ॥ न्यग्रोधच्छायेकरूनिशयनु ॥ बंधुप्रतिअनुवादे ॥ ११ ॥ जन्मोनिनाहींकेलेंपाप ॥ किमर्थभोगितोंहासंताप ॥ कवण्याकर्माचालोप ॥ तेंतत्त्वतांनेणवे ॥ १२ ॥ भीमम्हणेदुर्योधन ॥ देखतांहारिलींस्त्रियेचीं वसनें ॥ तो घेतलानाहींप्राणें ॥ त्याचींफळेंहींनरेंद्रा ॥ १३ ॥ अर्जुन म्हणेदुष्टकर्ण ॥ ताडितांकुशाव्दाचेबाण ॥ केलेंनाहींशिरच्छेदन ॥ त्याचींफळेंहींनरेंद्रा ॥ १४ ॥ सहदेवम्हणेकपटद्यूतीं ॥ सौबळेंहरिलीसंपत्ती ॥ मारिलानाहींशस्त्रघातीं ॥ त्याचींफळेंहींनरेंद्रा ॥ १५ ॥ धर्मम्हणेअसोओतां ॥ तृषेनेंपीडलोंबहुताता ॥ नकुळावेंधूनिवृक्षावरुता ॥ जळ सभोंवतेंविलोकीं ॥ १६ ॥ **साकी** ॥ वृच्छनकोशीरचढानकुलतब हेरतजलकाननमो ॥ तब देखतवहएकसरोवर दूरघोरकाननमो ॥ १७ ॥ **कटाव** ॥ धर्मतृषेनेंव्याकुळ बहुदेखननकुळमग लगवगलगवग काष्ठकमंडलुकरीं घेऊनी जायदूरवनिंमनींभयधरुनि बंधुभजनिरतसार सज्जनीं हेंचिनिवाडिलें पुढेंदेखिलें उंचउंच ते वृक्ष भयंकर ताडमाड वड पिंपळ उंबर वेळू सागवाभळी जांभळी कौठी बोरी शिंदचिंचशमि सरसआम्रडालिंब लिंब कडुलिंबसिताफळ रामफळें अंजीर नारिंगें कौलेसाखरनिंबवेनिंबहीसुपारी केळीनारळी बरुसुरूकृष्णागरु

चंदन कदंबचंपकफणसबकुळपुन्नाग अगस्तीधात्रीअशोक पारिजात कांचनजासुंदी जाइजुई मोगरामालती शेवंतीनिशिगंधहजारा गुलाबगुलछबू मधूमालती कुंदचमेलीबंधुजीवकर वीरकेतकीसुवर्णचंपक सदागुलाब अतसिकुसुमघन सघनगगनवन जना भासतें ऐसें अगनगखगरवगूंजित सजलकमलदल चलित ललितवर चकितमधुपझंकारयुक्तें अकस्मात पाहिलें सरोवर मंदमंदजलसुगंधवेऊनि अतितृषेनें संतोष पावला ॥ १ ॥ **ओंवी** ॥ काष्ठकमंडलूकरीघेऊन ॥ अतिसत्वरकरीगमन ॥ पुढेंसरोवरविस्तीर्ण ॥ समुद्रप्रायदेखिलें ॥ ॥ १८ ॥ **आर्या** ॥ धर्मचिघैर्येंसाहे सोशिलव्यसनकायदुसरातें ॥ नकुळतदाज्ञाघेउन आणायातोय जायसुसरातें ॥ १९ ॥ उष्णेंझालाहोता तसतृषितजेविधेनुसुतडागें ॥ धांवेतरंगहस्तें जाणोंपाचारिलाचसुतडागें ॥ २० ॥ **ओंवी** ॥ नकुळेंस्पर्शितांचिजीवना ॥ वृक्षींयक्षकरीगर्जना ॥ म्हणेकरूंनकोजलपाना ॥ महाअनर्थपावसी ॥ २१ ॥ आमचेप्रश्नसांगावे ॥ तरीमगतोयप्राशनकरावें ॥ अवज्ञाकरितांहानिनीवें ॥ पावशीलतत्काळीं ॥ २२ ॥ **आर्या** ॥ यक्षम्हणेरेबापा आधींसेऊंनकोचितोयातें ॥ मत्प्रश्नोत्तरदेतांष्यायान्यायाहियोग्यतोयातें ॥२३॥ **ओंव्या** ॥ हृदयींस्पर्शितांजळ ॥ मृत्युपावलातत्काळ ॥ पृथ्वीतळीं महाविशाळ ॥ वृक्षतैसा पडियेला ॥ २४ ॥ विलंबलागतांनकुळासी ॥ धर्मेंपाठविलेंसहदेवासी ॥ येरुपाहेतंववंधूशीं ॥ प्रेतदशादेखिली ॥ २५ ॥ आधींकरूंतृषाहरण ॥ मगकरणेंहेंविचारण ॥ तंवत्यायक्षेंघातली आण ॥ उदकहातींनातळें ॥ २६ ॥ तेंनऐकूनमाद्रीबाळ ॥ जळपितांपडलातत्काळ ॥ तैंअर्जुनवीरपाळ ॥ युधिष्ठिरेंप्रेषिला ॥ २७ ॥ पार्थेंप्राशितांजळ ॥ मृत्युपावलातत्काळ ॥ विलंबदेखूनउतावेळ ॥ भीमधर्मेंपाठविला ॥ २८ ॥ तोहींपहुडलात्यांचियेपंक्ती ॥ पाठींपातलीधर्ममूर्ति ॥ चवघेबंधुदेखूनियांक्षिती ॥ कपाळहस्तेंपिटीतसे ॥ २९ ॥ हिमवंतविंध्यामंदरमेरु ॥ तैसेपडलेचौघेवीरु ॥ मारूंनशकतीहरिहरु ॥ तेहेकवणेंमारिले ॥ ३० ॥ **आर्या** ॥ मगसहदेवधनंजय भीमहिपडलेतसेचजलपानें ॥ गमलेवधिलेतेत्या स्वच्छदतटिकालियारुय जलपानें ॥ ३१ ॥ धर्मम्हणेहादैवा नकळेझालाअनर्थकायकसा ॥ मद्बंधुएकतीरजळ :द्यायायावाचिशीघ्रमायकसा ॥ ३२ ॥ हारेकितवाधर्मा स्वकृतेंनिजजीवितासिआंचवघे ॥ धिगधिगम्हणूनिविटते द्यूतनकरितांमुबंधुकांचवघे ॥ ३३ ॥ ऐसेंम्हणोनिजाउनिधर्मेंतेबंधुपाहिलेशवसे ॥ सावृतअहंताशी ज्यामध्येंचेतनानलेशनसे ॥३४॥ **श्लोक**॥ **चंपू** ॥ तस्यास्तटेकमलिनीदलपात्रपाणींस्तान्वंक्तिशोनिपतितान्मबलोक्य वीरान् ॥ बाष्पांबुभिःप्रथमदर्शितमार्गएवतन्वानृपस्यचरणौसहसानिपेते ॥ ३५ ॥ **अर्थ**—त्या सरोवराचे तटावर, कमलिनीपत्रांचीं पात्रें हातांत घेऊन ओळींनें पडलेल्या त्या वीरांस (भीमादि चवघां बांधवांस) अवलोकन करून खालीं पडलेल्या अश्रूंनीं जिला प्रथम, पडण्याचा मार्ग दाखविला आहे म्हणूनच कीं काय धर्मराजाची तनु भूमीवर पडली ॥ ३५ ॥ **चपूकार** ॥ मय्यप्यसूनिहविमुंचति याज्ञसेनीसाश्वापदाविषमबुद्धगतिर्मवेन्नः ॥ हामाद्रिकुंतियुवयोर्वनभूमिरेवपुत्रप्रसूतिविपदोःपदतांप्रपेदे ॥ ३३ ॥ **अर्थ**—धर्मराज म्हणतात, हे श्वापदहो ! मींही आतां प्राण दिले असतां त्या याज्ञसेनीस आमची ही विषमगति समजेल ! हे माद्रि, हे कुंति ! ही वनभूमिच तुमच्या पुत्रांच्या प्रसूतीस आणि नाशासही स्थानभूत झाली ॥ ३६ ॥ **आर्या** ॥ हामीमहाधनंजय नस्वर्गीसुखपहालहानकुळा ॥ हासहदेवादोष त्यजितांमजकायहालहानकुळा ॥ ३७ ॥ गेलासिकोर्विभीमा त्यागुनियांमजगुरुमतिज्ञात्या ॥ त्यजिल्यासुयोधनोरु-

ध्वंसादिकशागुरुप्रतिज्ञात्या ॥ ३९ ॥ चंपू ॥ यत्सद्द्वेषीनियुद्धजीवनभुजप्रख्यानिधेमारुते ।
कर्णाकर्णिकयानिशम्यभवतःप्राप्तामवस्थामिमां ॥ शोकेनानिशमेकचक्रनगरीभाजांचवाष्पायितुं।
स्वस्त्रीयैःसहसौबलस्यचमुदांकोप्येषकालोभवत् ॥ ३९ ॥ अर्थ—शत्रूंशीं मल्लयुद्ध करणें हेंच ज्यांचें जीवन आहे अशा वाहूंनीं सर्व जगांत प्रख्यात होणाऱ्या हे वत्सा वायुपुत्रा, तुला ही अवस्था प्राप्त झाली, असें कर्णोपकर्णीं ऐकून एकचक्री नगरींत राहणाऱ्या जनांस शोकानें आणि दुर्योधनादिक भाऱ्यांसह शकुनी मामास आनंदानें अश्रुपात करण्याचा हा चत्कारिक काल प्राप्त झाला आहे. ॥ ३९ ॥ श्लोक ॥ स्वय-
मव्रणएवयोरणेव्रणमाधत्तहरस्यहस्तके ॥ व्रणमायुषिपार्थतस्यतोविदधातिस्मसृधंविनैवकः ॥ ४० ॥
अर्थ—हे पार्था, स्वतः अक्षत असूनच ज्या त्वां संग्रामांत महादेवाच्या मस्तका-
वर व्रण (क्षत) केलास त्या तुझ्या आयुष्याचे ठिकाणीं युद्धावांचून कोणीं ही जखम
केली ? ॥ ४० ॥ आर्या ॥ वत्सानभंगलासी प्रभुशींकरुनीतशाहिविषमरणा ॥ कालविलें
कायजळीं, त्यादुष्टांहींवशाहिविषमरणा ॥ ४१ ॥ विषकालविलेंअसतें तारिसलिलींकरपती
नकानलिनें ॥ अलिनींत्याजिलींअसतींहोतींतुमचींहिआननेंमलिनें ॥ ४२ ॥ गेलास्वर्गासिबरें
जापरिकवणासिहानिरविलाहो ॥ अत्यद्भुतहेंम्हणतिलनकधींहीपद्महानिरविलाहो ॥ ४३ ॥
विजयिचतुर्बंधुचतुर्भुजलीलेंकरुनिआक्रमीनरसा ॥ ऐसेंचिम्हणतहोतों परिझालोंदीनआजिमी
नरसा ॥ ४४ ॥ चंपू ॥ दैवंकठोररचितंदययाविहीनंमाद्रीसुतावहहमातृसुखानभिज्ञौ ॥
कंदांकुराणिचपलानिचभक्षयित्वाकांतारसीमनिमयाचरितौनसेहे ॥ ४५ ॥ अर्थ—ज्याचें
आचरण अतिकठोर असें आणि परमनिर्दय हें दैव आहे. कारण मातृसुख ज्यांस मुळींच
माहीत नाहीं असे आणि कंदमुळें व फलें भक्षण करून मजबरोवर अरण्यांत फिरणारे हे
माद्रीसुत (नकुळ–सहदेव) त्या दैवास सहन झालें नाहींत. ॥ ४५ ॥ आर्या ॥ चिंतुनि
ऐसेंप्याया गेलाजोंसाधुदक्षतोयातें ॥ विनिवारीतोचिसरस्तटगतबकरूपयक्षतोयातें ॥ ४६ ॥
॥ ओंवी ॥ तोयक्षबालेगर्जोनिशब्दु ॥ म्यांमारिलेतुझेबंधु ॥ प्रश्ननसांगतांबाधूं ॥ मजपा-
सावपातले ॥४७॥ चंपू ॥ राजन्मदुक्तिसरणेंःप्रतिवाक्यदानंदेवोप्युपेक्षजलमत्रनपातुमीष्टे ॥
एते मदीयममवत्य वचोऽवलेपात् पीतांबवः सपदि बिभ्रति दीर्घनिद्राम् ॥ ४८ ॥ अर्थ—हें
राजा! माझ्या प्रश्नांचें प्रत्युत्तर दिल्यावांचून देवही येथें जलपान करूं शकत नाहींत असें
असतां हे तुझे बंधु गर्वानें माझा अपमान करून उदक प्याले म्हणून हे प्रस्तुत दीर्घनि-
द्रा करीत आहेत. ॥ ४८ ॥ आर्या ॥ रेकौंतेया केले अनुज तुझे प्रेतरूप म्यां बघे ॥ तूं
तारिवांचहटेंजळ सेवुनिमरतांउगेच कां अवघे ॥ ४९ ॥ मत्प्रश्नांचें उत्तर दे जलसेवूंनकोचि
थांब कसा ॥ धर्म म्हणे ऐसा तूं कोण प्रभु जाहलासि कां बकसा ॥ ५० ॥ मी यक्ष असें
सांगे दावी प्रगटुनिशरीरपर्वतसें ॥ पूर्वीं कधीं न झालें प्राप्त न आश्चर्य भीतिपर्वतसें
॥ ५१ ॥ ओंवी ॥ धर्म म्हणे जितकें ज्ञान ॥ तितुकें कांहीं करीन कथन ॥ कैसे कैसे
तुझे प्रश्न ॥ ते नावेक परिसवीं ॥ ५२ ॥ आर्या ॥ धर्म म्हणे अग्निपुढें पांडित्य करील काय
कापूस ॥ कळल्या उत्तर देइन पुसणें तें यक्षनायका पूस ॥५३॥ भारतवनपर्व ॥ को मोदते
किमाश्चर्यं कः पंथाः काच वार्तिका ॥ वदमेचतुरःप्रश्नान्मृताजीवंतुबांधवाः ॥ ५४ ॥ अर्थ ॥
या जगांत सुखी कोण आहे तसेंच आश्चर्य कोणतें? मार्ग कोणता आणि वार्ता को-
णती या माझ्या चार प्रश्नांचीं उत्तरें दे! म्हणजे मृत झालेले तुझे बंधु जिवंत होतील.

॥ ९४ ॥ श्लोक ॥ पंचमेऽहनिषष्ठेवाशाकंपचतिस्वगृहे ॥ अनृणीचाप्रवासीचसवारिचरमोदते ॥ ९५ ॥ अर्थ—जो पांचवे किंवा सहावे दिवशीं स्वगृहीं भाजपिाला शिजवून पंचमहा यज्ञ करतो आणि ज्यास ऋण नसून प्रवांसही करावा लागत नाहीं, हे यक्षा तो सुखी होय. ॥ ९५ ॥ श्लोक ॥ अहन्यहनि भूतानि गच्छंति हि यमालयं ॥ शेषाः स्थावरमिच्छंतिकिमाश्चर्यमतःपरं ॥ ९६ ॥ अर्थ—प्रति दिवशीं प्राणी यमसदनास जातात आणि बाकी राहिलेले लोक स्थावर उत्पन्नाची इच्छा करतात; यापेक्षां अधिक आश्चर्य कोणतें आहे. ॥ ९६ ॥ श्लोक ॥ तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना नैको ऋषिर्यस्यमतंप्रमाणम् ॥ धर्मस्यतत्त्वंनिहितंगुहायां महाजनोयेनगतःसपंथाः ॥ ९७ ॥ अर्थ—तर्क हा अप्रतिष्ठ आहे म्हणजे त्याची एकविध स्थिति नाहीं, श्रुतिप्रामाण्य मानावें तर त्याही भिन्न आहेत; ऋषीवर प्रामाण्य समजावें तर तो ऋषिही एक नाहीं, कीं ज्याचें मत प्रमाण मानतां येईल. धर्माचें तत्त्व तर गुह्य ठेवलें आहे, यास्तव ज्या मार्गानें महाजन (श्रेष्ठ लोक) गेले असतील तोच मार्ग इतर जनांस योग्य होय ॥ ९७ ॥ श्लोक ॥ अस्मिन्महामोहमयेकटाहे सूर्याग्निनारात्रिदिनेंधनेन ॥ मासर्तुदर्वीपरिघट्टनेनभूतानिकालःपचतीतिवार्ता ॥ ९६ ॥ अर्थ—या महामोहमयकटाहांत रात्रि आणि दिवस हींच इंधनें ज्यास आहेत अशा सूर्यरूप अग्नीच्या योगानें काळ हा ऋतु, मास हींच कोणी एक दर्वी (पळी) ती फिरवून सर्व भूतांस शिजविताहे ही वार्ता होय. ॥ ९८ ॥ श्लोक ॥ अक्षय्यो नरकः केन प्राप्यते भरतर्षभ ॥ एतन्मे पृच्छतः प्रश्नं तच्छीघ्र वक्तुमर्हसि ॥ ९९ ॥ अर्थ—हे भारतश्रेष्ठा युधिष्ठरा, अक्षय्य नरकवास कोणाला प्राप्त होतो ? हा माझा प्रश्न लौकर सांग. ॥ ९९ ॥ श्लोक ॥ ब्राह्मणंस्वयमाहूययाचमानमकिंचनं ॥ पश्चान्नास्तीतियोब्रूयात्सोऽक्षय्यंनरकंव्रजेत् ॥ ६० ॥ अर्थ.—याचना करणाऱ्या दरिद्री ब्राह्मणाला स्वतां घरीं बोलावून मग नाहीं म्हणून सांगतो तो अक्षय्य नरकास प्राप्त होतो. ॥६०॥ ओंव्या ॥ कोठून उदया पावे सूर्य ॥ कोठें त्याची प्रतिष्ठा होय ॥ कोण त्याचे समागमीं ये ॥ अस्तपावतोकैसेनी ॥ ६१ ॥ उत्तरवदेधर्मसुजाणु ॥ ब्रह्मींपामून उगवेभानु ॥ संगींत्याचेदेवगणु ॥ धर्म त्याचीप्रतिष्ठा ॥६२॥ घेऊनिलोकांचीं आयुष्यें ॥ अस्तमानातेंजातअसे ॥ ब्राह्मणपुण्याचेविशेषें ॥ पुढतीउदयायेतअसे ॥ ६३ ॥ किंमर्थ दानब्राह्मणातें ॥ किमर्थदाननटनर्तकांतें ॥ किमर्थदानसेवकांतें ॥ हें निवडूनि सांगपा ॥६४॥ किमर्थ दानगानृपातें ॥ हेंरायासांगमातें ॥ धर्मम्हणेएकचित्तें ॥ यक्षराया पारियेसीं ॥ ६५ ॥ व्हावयापरलोकप्राप्ती ॥ दानदीजेब्राह्मणाप्रती ॥ लौकिकवाढवावया कीर्ति ॥ नटनर्तकांतेंद्रव्यदीजे ॥ ६६ ॥ भरणपोषणालागींजाण ॥ भृत्यादीजे वेतनदान ॥ भयरक्षावयाकारण ॥ राजियादानदेईजे ॥ ६७ ॥ कवणदैवतब्राह्मणातें ॥ धर्मसनातनकोणते ॥ मनुष्याभवम्हणतीजयातें ॥ तेसांगिजेपांडवा ॥ ६८ ॥ धर्मम्हणेऐकवचन ॥ ब्राह्मणदैवतवेदाध्ययन ॥ तपश्चर्यासनातन ॥ धर्मधनयानांवें ॥ ६९ ॥ गुरूस्थानींकवणश्रेष्ठ ॥ देवामाजीकवणवरिष्ठ ॥ पवनाहूनिवरिष्ठ ॥ वेगवंतकवणतो ॥ ७० ॥ पितादेवांमाजीमुगुटमणी ॥ माताश्रेष्ठगुरुपूजनीं ॥ पवनाहुनिसहस्रगुणी ॥ मनहेंचंचलजाणिजे ॥ ७१ ॥ आर्या ॥ यक्षातेंचिननिववी नृपदत्तप्रश्नशतसमुत्तरतें ॥ सुश्रोतृवृंदज्याच्या श्रवणींहोऊनिबहुसमुत्तरतें ॥ ७२ ॥ यक्षम्हणेकौंतेया यापांडित्यैंचिगुरुहितुजलाजो ॥ झालोंप्रसन्नचवघांमाजिउठाऐक इष्टतुजलाजो ॥ ७३ ॥ ओंव्या ॥ वचनींतोषविलेंमातें ॥ वदेदेवप्रसन्नचित्तें ॥ चवघांमाजी

आवडेतूतें ॥ तोउठवीनतत्काळ ॥ ७४ ॥ धर्मम्हणेगुणवेल्हाळ ॥ नकुळमाद्रीचांबाळ ॥ तो उठविल्याकामसकळ ॥ पूर्णमाझासमर्था ॥ ७५ ॥ आर्या ॥ धर्मम्हणेनकुळउठो यक्षम्हणे मान्यजेंशतक्रतुला ॥ भीम नको विजय नको आवडलें त्यजुनि अमृत तक्र तुला ॥ ७६ ॥ ओंवी ॥ बळसमुद्र भीमसेन ॥ धनुर्धरांमाजी अर्जुन ॥ जाणतियांमाजी सुजाण ॥ सहदेव तो पांडवा ॥ ७७ ॥ आर्या ॥ धर्म म्हणे बा यक्षा मज तो माद्रीपृथासमानांवें ॥ दोघींचीहि असावी म्यां अधिक उणें कधीं न मानावें ॥ ७८ ॥ ओंवी ॥ मीकुंतीचा ज्येष्ठकुमार ॥ ज्येष्ठमाद्रीचानकुळवीर ॥ उभयपुत्रींसुपावित्र ॥ दोघीमातालौकिकी ॥ ७९ ॥ ॥ आर्या ॥ उरलोंमीकुंतीचा माद्रीचाज्येष्ठपुत्रउरवाहो ॥ स्वर्गींनअश्रुधारें त्यामातेचेंकदापिउरवाहो ॥ ८० ॥ ओंवी ॥ यक्षबोलेप्रसन्नवदन ॥ चौघांदिधलेंप्राणदान ॥ असेंबोलतांचौघेजण ॥ उठतेझालेतेकाळीं ॥ ८१ ॥ आर्या ॥ त्या यक्षरेंउठले सुखसुप्ततसेप ळांतंचवघेते ॥ फारनिवालेपांचहि अमृताचीजेविंदेवचवघेते ॥ ८२ ॥ भूपम्हणेयक्षातूं कोणप्रभुअद्भुतप्रभावाचे ॥ लीलेनेंअसुहरिले तनुजघुदेंआमुचीप्रभावाचे ॥ ८३ ॥ चंपू ॥ कटिलंबितत वल्कलोजटाल:कननीयस्मितधौतयज्ञसूत्र: ॥ कुशबर्हवतंसित:सदेव:कुरुराजस्यपुरोवतीर्य तस्थौ ॥ ८४ ॥ अर्थ—ज्याच्या कटीस वल्कलें लोंबत आहेत व मस्तकावर जटा आहेत, तसेंच ज्याच्या सुंदर हास्यप्रभेनें यज्ञोपवीत उज्ज्वल दिसत आहे आणि कुश (दर्भ) व बर्ह (मयूरपिच्छ) यांचीं भूषणें धारण केलेला असा तो देव (यमधर्म) धर्मराजाच्या पुढें येऊन उभा राहता झाला. ॥ ८४ ॥ ओंवी ॥ म्हणेपुत्रातुज्ञापिता ॥ मीचअरणीहरिलीआतां ॥ प्रसन्नहोऊनतुझियाचित्ता ॥ परीक्षिलेंसुशब्दीं ॥ ८५ ॥ आर्या ॥ भूपम्हणेहेताता हरिणहृतासांपडोतत्याअरणी ॥ धर्मम्हणेपावेबा कैंचामृगआमुचीचहीकरणी ॥ ८६ ॥ तिसरावरमागतुझ्या भुललों मीसाधुनायका महिम्या ॥ वंदिन म्हणे युधिष्ठिर जिंकावा लोभ कोप कामहि म्यां ॥ ८७ ॥ पांडव त्या विप्राच्या ठेविति आधीं शिरांवुनें चरणीं ॥ मग अर्पिति धर्मप्रभु,—दर्शनवरलाभहेतुत्याअरणी ॥ ८८ ॥ इतियक्षप्रश्नाख्यानंसंपूर्णम् ॥ असो, याप्रमाणें यमधर्मरूपी यक्षानें धर्मराजाच्या समबुद्धीस व सत्यनिष्ठेस संतुष्ट होऊन त्याचे चारी बंधु जिवंत करून ब्राह्मणाच्या अरणी दिल्या आणि अज्ञातवासरूप महासंकटांतून पार पडण्यास अत्युपयुक्त असा आकारगुप्तिरूप वरही दिला आणि आपण अंतरधान पावला. तस्मात् जो कोणी असा ईश्वरावर दृढनिष्ठा ठेऊन ईश्वरनिर्मित जगतामध्यें स्वपरभावना ठेवीत नाहीं आणि ईश्वरगुणानुवादाचे वर्णनांत जो काशीप्रयाग काय तें हेंच अशी प्रेमबुद्धि ठेवितो, त्यावर ईश्वर दया करतो. असा अभिप्राय मनांत आणून प्रथमपदीं आनंदतनय म्हणतात,—त्यावरीदेवकरीलदया ॥ तयावरी० ॥ तवकथामृतंतप्तजीवनं० ॥ आरती ॥ कायेनवाचा० ॥ अच्युतंकेशवं० ॥ हरेराम० ॥ हरेकृष्ण० ॥ पार्वतीपते० ॥ जानकी० ॥

शतमुखरावणाख्यान.

पूर्वरंग निरूपण.

—:०:—

श्रीमन्महागणाधिपतयेनमः ॥ अविरलमदजलनिवहं० ॥ इत्यादिनमनं ॥ गोपालराधेकृष्ण

गोविंगोविंद ॥ गोपाळ० ॥ इतिभजनं ॥ पुंडलिकवर० ॥ पार्वतीपतेहर० ॥ जानकीजीवनस्मर० ॥ मूळ अभंग ॥ नामपावनपावन ॥ नामींतरलेअवघेजन ॥ १ ॥ शिवहाळाहळी तापला ॥ तोहिनामेंशीतळझाला ॥ २ ॥ अठरापुराणांचे पोटीं ॥ नामाविणनाहींगोष्टी ॥ ३ ॥ तुकाम्हणेअवघेंसार ॥ श्रीहरीचेंनामथोर ॥ ४ ॥ कीर्तनारंभीं भगवद्भक्तावतंस तुकारामाख्य साधु मुमुक्षुजनांस सदुपदेश करतात. काय म्हणतात, नृजन्म अति दुर्लभ आहे. याचें साफल्य व्हावें असा जर हेतु आहे, तर या कलियुगामध्यें जीवाला तारक नाम आहे. तरी श्रीराम जगत्त्रयचक्रवर्ती त्याच नाम ध्यावें हा सदुपदेश. उपदेश दोन प्रकारचे आहेत. एक सदुपदेश, दुसरा असदुपदेश. हे परम साधु परोपकाराविषयीं दक्ष, परोपकारार्थ अवतार ज्यांचा म्हणून सदुपदेश करतात, वाईट सांगावयाचे नाहींत हा नियम. यावर शंका, कां सांगतात ? बरें किंवा वाईट सांगण्याचें यांस कारण काय ? यांना विचारतो कोण ? विचारल्यावांचून कां सांगतात ? "नापृष्टःकस्याचिद्ब्रूयात्" विचारल्यावांचून सांगणें, बोलल्यावांचून बोलणें हें व्यवहारशून्य लक्षण होय. संशयनिवृत्ति, सत्पुरुष जे त्यांचा देहस्वभावच हा कीं. परोपकार करावा. यावर ॥ श्लोक ॥ भर्तृहरिः--पद्माकरंदिनकरोविकची करोति चंद्रो विकासयति कैरवचक्रवालं ॥ नाम्यर्थितो जलधरोपि जलं ददाति संतः स्वयंपरहितेषु कृताभियोगाः ॥ २ ॥ अर्थः--दिनकर म्हणजे सूर्य अप्रार्थित उदयाला येऊन कमळें जीं त्यांप्रत विकासित करतो, कमले प्रार्थना करीत नाहींत, प्रार्थनेंकरून काय होणार ! तर हा देहस्वभाव. आणखीं चंद्र कुमुदिनी ज्या त्यांप्रत विकासयति म्हणजे प्रफुल्लित करतो हें अप्रार्थित कर्म आहे, तर हें देहस्वभावलक्षण होय. आणखीं अप्रार्थित मेघ वृष्टि करून जल देतो. अनुष्ठानें करून जलप्राप्ति होत नाहीं, तो लोकहितकर्ता आहे, यास्तव आपणच होऊन वृष्टि करतो; तसें साधु परहित करणारे आहेत, त्यांच्यानें दुसऱ्याचें नुकसान पाहवत नाहीं. नुकसान कोणतें ? श्वानसूकरादि अनेक योनीस जन्म घेतलेल्या जीवांचे तेथें ज्ञान नसल्या कारणानें ते देह फुकट गेले, तसा हा देह फुकट जाऊं नये,--सार्थक व्हावें म्हणून सांगतात; प्रभूचें नाम ध्यावें. ज्याचा जो देहस्वभाव तो तें स्वभावलक्षण कधीं गुप्त ठेवणार नाहीं. त्याविषयीं तुकाराम अभंगद्वारें सांगतात.--॥ आधीं होता वाघ्या ॥ दैवयोगें झाला पाग्या ॥ त्याचायेळकोटराहिना ॥ देहस्वभावजाईना ॥ १ ॥ आधींहोतेंकुळकर्ण ॥ पुढें आलें संतपण ॥ त्याचाकारभारराहीना ॥ देहस्वभावजाईना ॥ २ ॥ यावर गोष्टः--एक कुलकर्णी संन्यासी झाला, तो प्रवास करीत असतां एका गांवांत पारतीच्या देवळांत राहिला, तेथें चोरांनीं गांवांतून घोडा चोरून आणला. तो अडला, चालेना; हे (संन्यासी) लघवीला बाहेर आले होते, त्यांनीं अशा कर्मांत आयुष्य घालविलें होतें; तेव्हां विचार करून काय म्हणतो. हे काय अडाणी आहेत ? आपल्याला बोलावयाचें नाहीं, कारण आपण संन्यासी आहों. असा विचार केला, परंतु राहवेना; देहस्वभाव. बाहेर येऊन म्हणतो. आधीं होतों याच कर्मीं ॥ मग झालों सन्यासधर्मी ॥ आपणास काय ॥ होटाळी वांचून घोडें न जाय ॥ मूर्खहो ! घोडा लगाम किंवा होटाळीवांचून जायाचा नाहीं; गळ्यांत घोतर बांधून कोठें जात असतो ? या कृत्याचें कारण नाहीं. परंतु देहस्वभाव; ज्याचा जो स्वभाव तें कर्म तो करणारच, कधीं राहणार नाहीं. ॥ आधींहोता ग्रामजोशी ॥ सेनापतीकेलात्यासी ॥ त्याचेंपंचांगराहीना ॥ देहस्वभावजाईना ॥ परचक्रावर

जाण्याविषयीं राजाचा हुकूम आणि हा मुहूर्त पहात बसला. यावर दुसरी म्हण, " राजाची स्वारी मशालजीचा घातवार" ॥ आधीं होती दासी॥मग मिळाली राजासी॥तिचें हिंडणें राहिना ॥ देह० ॥ आधीं होता संतसंग ॥ तुका झाला पांडुरंग ॥ त्याचें भजन राहिना ॥ देहस्वभाव जाईना ॥ तर साधूंच्या विभूति परोपकारार्थ आहेत. यावर—श्लोक ॥ पिबंतिनद्यः स्वयमेव नांभः स्वयं न खादंति फलानि वृक्षाः ॥ नादंति सस्यं खलु वारिवाहाः परोपकारायसतां विभूतयः ॥ १ ॥ **अर्थ**—नद्या स्वतः पाणी पीत नाहींत, वृक्ष स्वतः फळें खात नाहींत, धान्य मेघ खात नाहींत, उत्पन्न कारतात हा देहस्वभाव, तसे साधु परोपकारार्थ विभूति ज्यांच्या ते जन्म सफल व्हावा म्हणून म्हणतात, नामसाधन चांगलें आहे. भवाब्धि अति दुस्तर याचें तरण व्हावें हा जर हेतु आहे तर नाम घे; वाणीनें ईश्वर नामोच्चार कर; नृजन्म वारंवार नाहीं. अनेक योनींत फिरावें तेव्हां एकवार नृजन्मप्राप्ति—यावर ॥ श्लोक ॥ जलजा नवलक्षाणि दशलक्षाणि पक्षिणः ॥ त्रिंशल्लक्षं गवाश्वाद्याः स्थावराणां च विंशतिः ॥ कृमयो रुद्रलक्षाणि चतुर्लक्षाणि मानवः ॥ १ ॥ **अभंग** ॥ नऊलक्षयोनीं जळचरींभोगाव्या ॥ दशलक्षध्याव्यापक्ष्यांमाजी ॥ १ ॥ तीसलक्षयोनीपशूंमध्येंभोगाव्या ॥ वीसलक्षध्याव्यावृक्षांमाजी ॥ २ ॥ अकरालक्षयोनीकृमींचियाघरीं ॥ मानवांभीतरींचारलक्ष ॥ ३ ॥ एक्याएक्यायोनीकोटीकोटीफेरा ॥ नरदेहाचावारालागेमग ॥ ४ ॥ तुकाम्हणेऐसा नृदेहवरिष्ठ ॥ फारहोतीकष्टप्राप्तीलागीं ॥ ५ ॥ आतां मुमुक्षूनें नाम घ्यावें, मुमुक्षु कोण? हा उपोद्घात पुष्कळ आहे, तथापि थोडक्यांत सांगतों,—कारण, नाममहिमा सांगावयाचा आहे, मोक्षेच्छु तो मुमुक्षु; मुक्त होण्याची इच्छा ज्यास त्यास मुमुक्ष म्हणावें. तुकाराम म्हणतात, त्यानें नाम घ्यावें, तें नाम कसें आहे.—" नाम पावन पावन " द्विरुक्ति तालांत बसण्याकरितां नाहीं; तर ' आदराद्विरुक्तिः ' विशेष प्रेमलक्षणाचें हें उपलक्षण आहे. अत्यंत प्रीतीचा गृहस्थ आला म्हणजे या या! बसा बसा! पदार्थ घ्या घ्या! आदरेंकरून म्हणतों, तसें 'नाम पावन पावम' अथवा नाम पातक्यास पावन करील हें आश्चर्य नाहीं, पवित्रासही पावन करतें. पवित्र आहे त्यास काय पावन करावयाचें? गंगादि तीर्थें सांसर्गिक दोषानें मलयुक्त होतात. नामेंकरून पवित्रता होते. ' नामीं तरले अवघे जन ' नामेंकरून अखिल जन तरले म्हणजे नामधारक नाम घेणारा वायां गेलाच नाहीं; ते कसे तरले तर नामी (चांगले). या युगीं भगवत्प्राप्तीला नामसाधन श्रेष्ठ.—याविषयीं.—भागवत ॥ कृते यद्ध्यायतोविष्णुंत्रेतायांजपतोमखैः ॥ द्वापरेपरिचर्यायांकलौतद्धरिकीर्तनात् ॥ १ ॥ **अर्थ**—युगें चार.—कृत, त्रेता, द्वापार व कलि. कृतयुगामध्यें एक लक्ष वर्षें आयुष्य,—ध्यानसाधन. त्रेतायुगीं एक शून्य कमी (दहा हजार वर्षें) आयुष्य,—यज्ञसाधन. द्वापारयुगीं एक शून्य कमी (हजार वर्षें) आयुष्य,—सेवासाधन; भगवंताची सेवा करावी. कलींत एक शून्य कमी (शंभर वर्षे) आयुष्य.— तीं सगळीं पदरांत पडत नाहींत, यद्वा पडलीं तरी अर्धें आयुष्य रात्र खाऊन जात्ये; अर्ध्यांत सर्व प्रकार ॥ **भर्तृहरि** ॥ आयुर्वर्षशतंनृणांपरिमितंरात्रौतदर्धंगतंतस्यार्धस्यपरस्यचार्धमपरंबालत्ववृद्धत्वयोः ॥ शेषंव्याधिवियोगदुःखसहितंसेवादिभिर्नीयतेजीवेवारितरंगचंचलतरेसौख्यंकुतः प्राणिनां ॥ १ ॥ **अर्थ**.—मनुष्यांना शंभर वर्षें आयुष्याचें परिमाण आहे, त्यांतील अर्धें आयुष्य रात्रीं झोंपेंत गेलें; राहिलेलें जें अर्ध

(९० वर्षें) त्यांचेंही अर्ध (२५ वर्षें) बालत्व आणि वृद्धत्व यांत गेलें.—आतां राहि-लेला चतुर्थांश (२५ वर्षें) आयुष्यांत व्याधि, स्त्रीपुत्रादिक वियोगदुःखें असल्यामुळें तें निरुपयोगीच होतें, त्यांतही ईश्वरदयेनें निरोगी व दुःखानुभवरहित कांहीं आयुष्य रा-हतें तें सेवा (चाकरी) इत्यादि उपजीविकेच्या व्यापारांनीं घालवितात. तेव्हां अशा या जलबुद्बुदाप्रमाणें अत्यंत चंचल जीवितांत प्राण्यांस सुख कोठून प्राप्त होणार ? ॥ १ ॥ या युगीं अल्पायु लोक, इंद्रियनिग्रह नाहीं करितां सोपें साधन ॥ नाम-संकीर्तन साधन हें सोपें ॥ जळतील पापें जन्मांतरींचीं ॥ १ ॥ याहुनी आणिक नाहीं पैं साधन ॥ वहातसें आण विठोबाची ॥ २ ॥ तुका म्हणे सोपें आहे सर्वांहुनी ॥ श-हाणा तो धनी जाणतसे ॥ ३ ॥ दुसरीं साधनें पुष्कळ आहेत,—हठयोगादि पंचा-ग्निसाधन, ॥ धूम्रपान, पर्वतपात, जलायशीं वास. पण इंद्रियनिग्रह होऊन साधन होणें क-ठिण म्हणून कवि म्हणतात.—श्लोक ॥ मांयासंकुरुवायुरोधनविधौमाकश्यर्यमापादयेः काये-वर्जितभोजनव्रततयामारण्यमासेव्यतां ॥ पंचाग्निप्रचयेनचर्मदहनंनैवाचरक्लेशदंसानंदंकुरुरा-मनामभजनंस्यात्तेनसर्वेप्सितं ॥ १ ॥ अर्थ.—हे मुमुक्षुजीवा ! प्राणायामादिकेंकरून वा-युरोध करण्याविषयीं आयास करूं नकोस, तसेंच भोजन वर्ज्य करून निरशनादिक व्र-तांनीं शरीराचे ठिकाणीं कृशत्व संपादन करूं नकोस, याचप्रमाणें अरण्यवास नको आणि पंचाग्निसाधनानें शरीरत्वचेचें दहन हेंही करून घेऊं नको,—कारण, तें निरर्थक क्लेशदायक आहे.—तर आनंदयुक्त सर्वकाल राम या नामाचें भजन कर म्हणजे त्या योगानें सर्व इच्छित पूर्ण होईल. ॥ १ ॥ हें नाम सोपें सोंवळें आहे, ओंवळें नाहीं, एकांत नको, एका जागीं बसायला नको.—वामनपंडित म्हणतात—श्लोक—अहोयेतांजातांउठत बसतांकार्यकरितां ॥ सदादेतांघेतांवदनिंवदतांग्रासागिळितां ॥ घरींदारींशय्येवरिबहुसुखाचें अवसरीं ॥ समस्तांचीलज्जात्यजुनिभगवत्कीर्तनकरीं ॥ १ ॥ सांकेत्यंपरिहास्यंवा स्तोभंहलन मेव च ॥ वैकुंठनामग्रहणं अशेषाघहरंविदुः ॥ १ ॥ अर्थ.—वैकुंठ जो परमात्मा श्रीकृष्ण त्याचें नामग्रहण 'सांकेत्यं' संकेतानें म्हणजे मुलाचें नांव ठेवून, 'तसेंच परिहास्यं' (थट्टेनें) कोणाचा उपहास करून किंवा 'स्तोभं' म्हणजे निंदेनें अथवा हेटाळणीनें जरी केलें तरी तें सर्व पातकांचा नाश करितें असें ज्ञाते म्हणतात.॥ १ ॥ श्लोक ॥ नकळतांपदअग्निवरीपडे ॥ नकरिदाह कधींनअसेंघडे ॥ आजितनामवदोभलत्यामिषें ॥ सकलपातक भस्म करीतसे ॥ १ ॥ ॥पद॥ कैसेंहीकीर्तनकरितां, कल्याणवरेंव आहे ॥ कैसें० ॥ध्रु०॥ वाल्मिकउफराट्यानामानें ॥ झालापतीतवक्तामानें ॥ तारकनामाच्याअभिधानें ॥ तरलासंसृतिलवलाहे ॥ १ ॥ कैसें० ॥ पक्ष्यापढवितांपापिणी ॥ केलापरमात्मातोऋणी ॥ चढलीवैकुंठाकुटणी ॥ केवढेंकौतुकहेंपाहे ॥२॥ कैसेंही० ॥ शुद्धबुद्धीनसतांज्ञान ॥ वितालविस्वरकारितीगान ॥ तारकनामाचेंमहिमान ॥ आनंदात्मजगुणगाये ॥ ३ ॥ कैसेंही० ॥ श्लोक ॥ एकांगसंगिनीं मुद्रांलब्ध्वाब्धिमत-रत्कपिः ॥ अंगप्रत्यंगसंसर्गिनामकिंकर्तुमक्षमं ॥ १ ॥ अर्थ.—कवि म्हणतात, रामचंद्राच्या एकांगाचे ठिकाणीं सक्त होणारी मुद्रा प्राप्त झाली तिच्या योगानें वानरही (मारुति) शतयोजन विस्तीर्ण समुद्रास तरला, मग सर्व अंगें आणि उपांगें यांचे ठिकाणीं संसर्ग पावणारें जें नाम तें काय करण्यास असमर्थ आहे ? तर सर्व कांहीं करणार आहे; असा अभिप्राय मनांत आणून आद्य अभंगीं तुकाराम म्हणतात,—नामपावनपावन ॥ नामींतरले-

अवघेजण ॥ ध्रु० ॥ ॥ भजन ॥ कृष्णारामारामाहोरामारामारे ॥ रामरायाराघोबारे ॥ पुंडलीकवरदा० ॥ पार्वतीपते० ॥ जानकीजीवन० ॥ आतां श्रीरामनामानें कोण महत्संकटांतून तरला अशी ही आकांक्षा पूर्ण करण्याकरितां कवि शतमुखीरावणाख्याननिरूपण करितात.

शतमुखरावणाख्यान प्रारंभ.

ओंवी ॥ रावणवधाचियेआधीं ॥ युद्धसमयप्राससंबंधी ॥ कुंभकर्णाचेवंशवृद्धी ॥ कारण झालेंपरियेसा ॥ १ ॥ कुंभनिकुंभउभयकुमरां ॥ माजीनीकुंभाचीदारा ॥ झालीदेखूनगरोदर ॥ पितृभुवनापांठविली ॥२॥ तेलंघूनद्वीपांतरा ॥ सवेगपातलीमाहेरा ॥ नवमासभरतांसुंदरा ॥ दुष्टकुमार प्रसवली ॥३॥ साकी ॥ पौंड्रिकनामाठेवुनिमोहें, पालनकरिंती झाली ॥ पाहुनिसुंदरवदनतयाचें, कालक्रमणा केली ॥ ४ ॥ ओंवी ॥ प्रौंड्रिकठेवूनियां अभिधान ॥ सुखेंक्रमितअसतांदिन ॥ तंवकुलक्षयवृत्तांतबाण ॥ श्रवणवमींखडतरला ॥ ५ ॥ श्लोक ॥ इंद्रवज्रा ॥ झालाकुळाचाक्षय रामयोगें ॥ लंकापतीहोयकनिष्ठवेगें ॥ सिंहासनींबैसुनिराज्यभार ॥ घेहोयऐसासमजाप्रकार ॥६॥ ओंवी ॥ रावणबंधुप्रधानकुमर ॥ श्रीरामेंवधिलेसहपरिवार ॥ विभीषणासराज्याधिकार॥ देऊनिकेलाअक्षयी ॥७॥ साकी ॥ लंकापतितोचिरायुकेला सत्वरत्यारघुनाथें ॥ लक्ष्मणसीताघेऊनिगेला आपणसाकेतातें ॥ दशरथतनयश्रीराम ॥ योगीमानसविश्राम ॥ ८ ॥ आर्या ॥ बंधुसह आप्तजना, मारुनि तो ज्ञत्रुचें सहाय करी ॥ मातृमुखें हें ऐकुनि, त्या हरिवरिकुपितसाचिजायकरी ॥ ९ ॥ ओंवी ॥ श्रीरामकुठारअतिप्रचंड ॥ तयापितामहिवंधु मीनलादंड ॥ सहमूळशीं करूनिखंड ॥ तवकुळतरुछेदिला ॥ १० ॥ परीबिभीषणऊर्जिताचिव्याघी ॥ लागलीतयादुर्बुद्धी ॥ पुत्रप्रौढत्वदिव्यौषधी ॥ अवधीमात्रअक्षयी ॥ ११ ॥ आर्या ॥ गोत्रजवधपापबहुत नकरींम्हणुनीतयासतीवारी ॥ परितोतैसाचिनिघे मृतदशमुखकुंभकर्णकैवारी ॥ १२ ॥ ओंवी ॥ नकरितांप्राणनाश ॥ बिभीषणालंघवीनदशदिशां ॥ तरीचकुंभकर्णाचीस्नुषा ॥ पुत्रवतीयेलोकीं ॥ १३ ॥ ऐसेंबोलोनिप्रतिज्ञोत्तरा ॥ सवेगभरला गगनोदरा ॥ क्षीरसिंधूचेपैलतीरा ॥ मायापुरापातला ॥ १ ॥ श्लोक ॥ शार्दूलविक्रीडित ॥ सूर्याचेकरजेथकांहिंनसतीशैलापरीदैत्यते ॥ जेथेंफाराचिनांदतीभुजबळेंसिंधूतटाकींचते ॥ उड्डुणाकरुनीतदाशतमुखापाहूनिधालामनीं ॥ सद्भावेंपदवंदुनीकथिकरात्याराक्षसाचाधनी ॥ १५ ॥ पद ॥ (मायाम्हणेअभिमन्युरेमुला या चालीवर म्हणावें) ॥ पौंड्रिकमगनमनकरुनि वदेतेधवां ॥ शतमुखधररावणासिपरिसयेधवां ॥ ध्रु० ॥ रामहाचितीक्ष्णपरशुदंडबिभीषण ॥ होउनिमाझेंबुडविलेंकुळतिहींधन ॥ राज्यठावनाहिंआतांकरिचरक्षण ॥ पूर्णभावेंशरणपाहें अभयदेईन ॥ चाल ॥ अंतनकोपाहुंआतांभक्षिमानवा ॥ पौंड्रिक० ॥ १ ॥ साह्यकरुनिबालकासिबैसवात्वरें ॥ लंकापुरिंराज्यपदींनेउनी बरें ॥ संदयतुम्हीआधिंकराकार्यहेंखरें ॥ मायबापतूंचिहोसिअन्यवावरे ॥ चाल ॥ बिभीषणाजिंकितांचिकथिलराघवा ॥ पौंड्रिकमग० ॥ २ ॥ ॥१६॥ श्लोक॥ शार्दूलविक्रीडित ॥ ऐसेंऐकुनिवृत्ततोमगम्हणेदैत्येंद्रत्यापौंड्रिका ॥ नाभीनाभितुलास्वयेंबसवितोंराज्यासनींबालका ॥ कोठेंरामबिभीषणाख्यमलधींदावींमलासत्वरें ॥ घे-

तोंप्राण रणांत आणतुझिबाहेंसांगतोंसत्यरे ॥ १७ ॥ **आर्या** ॥ शतमुखसैन्यासहतो निघता झालातयासिसाह्यकर ॥ लंकेप्रतियेउनिमग, पावकवर्षणकरीतसेप्रखर ॥ १८ ॥ **ओंव्या** ॥ ससैन्ययेऊनिलंकापुरा ॥ वेढुनिवर्षतीशतधारा ॥ बिभीषणहोऊनिघ्राबरा ॥ जुंझारवीरापाचारी ॥ १९ ॥ सिद्धकरूनिसकलदळ ॥ युद्धकेलेंअतिप्रबळ ॥ परंतुपरचक्रदळ ॥ असंभाव्य आगळें ॥ २० ॥ **साकी** ॥ जाणुनियापरिविघ्नशताधिक रावणबंधुधांवे ॥ चारप्रधानांसह साकेतीं करुनिपलायनपावे ॥ २१ ॥ **ओंवी** ॥ निघतांबिभीषणसद्भावो ॥ दुर्जनींमांडिला विजयोत्साहो ॥ राज्यींस्थापीपौंड्रिकरावो ॥ शतशीर्षगेलास्वस्थाना ॥ २२ ॥ येरीकडेलंकानाथ ॥ आलाअपारचिंताग्रस्त ॥ अयोध्येयेऊनित्वरित ॥ राजांगणींप्रवेशे ॥ २३ ॥ श्रीरामबैसलासिंहासनीं ॥ सभोंवत्याविबुधांच्याश्रेणी ॥ सभादाटलीअसतांतेक्षणीं ॥ राक्षसराजप्रवेशे ॥ २४ ॥ **श्लोक** ॥ कामदा ॥ मध्यरात्रतैंजाहलीअसे ॥ जागरींस्वयेंरामहोंबसे ॥ पातलातदाराक्षसेंद्रतो ॥ नेत्रजीवनींहृदयेंकष्टतो ॥ २५ ॥ **साकी** ॥ रामचंद्रपदपद्मवंदुनी बोलेलंकानाथ ॥ चिरंजीवमीअसतांदेवा झालोंआजअनाथ ॥ कैसेंविपरीतहेंकेलें ॥ जाणुनि आलोंयशगेलें ॥ २६ ॥ **दिंडी** ॥ रामचरणींतोमिठीत्वरेंघाली ॥ अश्रुगाळितमगवदेमृदुल बोली ॥ नकोलंकामजक्षणिकदुःखदाती ॥ जरिरामसर्वथासुखदहोती ॥ २७ ॥ म्हणेराघवतोकोण असे कोठें ॥ येरुबोलेसांगतांहृदयफाटे ॥ दिलीरामामजतुवांसकळलंका ॥ हरीशतमुखतीनधरींमनींशंका ॥ २८ ॥ **श्लोक** ॥ शार्दूलविक्रीडित ॥ तैंऐकोनिबिभीषणोक्तिकरुणासिंधुद्रवेफारसा ॥ संबोधूनकरूनसांत्वनमगश्रीरामबोलेअसा ॥ त्यांतेंमारिनआजकींहरिदिनींसत्यप्रतिज्ञाकरीं ॥ मारीनाजरिआजमीतरिमलाप्राप्तीअघोरींखरी ॥ २९ ॥ **ओंव्या** ॥ तयेदिवशींएकादशी ॥ रघुनाथहोताउपवासी ॥ द्विप्रहरक्रमिलीअसतांनिशी ॥ तेव्हांवदेप्रतिज्ञा ॥ ३० ॥ उदयासिनयेतांतमारी ॥ शतमुखातेंमारीनरातीं ॥ तूंतेंस्थापूनलंकापुरीं ॥ पारणेंकरूंअयोध्ये ॥ ३१ ॥ हेंसाचनकरीनजरीबोलणें ॥ तरीमाझ्यासंपूर्वजाउणें ॥ ऐसेवदुनींरघुनंदनें ॥ पुसिलेंवास्तव्यतयाचें ॥ ३२ ॥ **श्लोक** ॥ शुद्ध कामदा ॥ वचनऐकतां रामभक्ततो ॥ त्वरितराघवासत्यसांगतो ॥ जलनिधीपुढेंशोणनामती ॥ महिवरीनदीपूर्णवाहती ॥३३॥ **श्लोक** ॥ शार्दूलविक्रीडित ॥ तेथेंतोवसतोअगारघुविरादैत्येंद्रमायापुरीं ॥ माजीसैन्यसमेतदुर्धरबळीमायाजयाचीपुरी ॥ तेणेंयेउनिगांजिलेंमजप्रतीलंकास्थळींराघवा ॥ कोणाचेंनचलेरणींबळपहादीनांचियाबांधवा ॥ ३४ ॥ **ओंव्या** ॥ ऐकतांचिदूरपंथ ॥ विस्मितहोयअयोध्यानाथ ॥ म्हणेआमुचेनियमव्रत ॥ कैवींपावेलसिद्धीतें ॥ ३४ ॥ इतुकियांतनारद ॥ भवसागरपारद ॥ अकस्मातयेवरद ॥ रामपददर्शना ॥ ३६ ॥ नमस्कारूनिवासुदेवमुनि ॥ बैसविलाकनकासनीं ॥ ऋषीतोपुनिसुधावचनीं ॥ राघवासीअनुवादती ॥ ३७ ॥ भक्तकैवाराला-गून ॥ दुर्जनाचें करावेंहनन ॥ म्हणोनियांयुद्धपण ॥ आजिकेलानारदा ॥ ३८ ॥ तयाप्रतिज्ञापर्वतातें ॥ नउचलवेसामर्थ्यहातें ॥ यास्तवमाझियेचित्तें ॥ चिंतार्णवींहिंडिजे ॥ ३९ ॥ हांसोनिबोलेविरिंचितनय ॥ देखिलेंहेंपरमाश्चर्य ॥ मृगांबूच्यापूरभये ॥ अगस्तीकांपेथरथरा ॥ ४० ॥ **साकी** ॥ नारदतेव्हांस्वमुखेंसांगे रामाअघटितवदसी ॥ मारुतिसमीपअसतांतूंक्रांचिंतापथहावरिसी ॥ ४१ ॥ **ओंवी** ॥ जवळींहनुमंतअसतांसुधा ॥ कायसीक्षयरोगाधा ॥ परिसूनिमुन्युक्तशब्दा ॥ रघुनाथप्रार्थीकपीतें ॥ ४२ ॥ **पद** ॥ कैवारीहनुमान ॥ आमुचाकैवारीहनुमान ॥ ध्रु० ॥ पाठींअसतांतो नगजेठी ॥ वरकडकायगूमान ॥ १ ॥

आमुचा० ॥ नित्यानिरंतरभजकांरक्षी ॥ धरोनियांअभिमान ॥ २ ॥ आमुचा० ॥ दासार-क्षिलहाचिभरंवसा ॥ वदतसेत्याचीआण ॥ ३ ॥ आमुचा० ॥ **आर्या** ॥ रामम्हणेकपिराया अरिवधनउपेक्ष्यहेंहिपर्वतसें ॥ नेशतमुखसान्निधमज परिसुनिकपिकेरिशरीरपर्वतसें ॥ ४३ ॥ ॥ **ओंव्या** ॥ आज्ञाकरित्रैलोक्यपाळ ॥ कपीवाढलाबहुतविशाळ ॥ सत्यलोकांतलावूनि मौळ ॥ ठाकलामेरूसारिखा ॥ ४४ ॥ बिभीषणआणिब्रह्मकुमार ॥ बंधुसाहितश्रीरघुवीर ॥ संगेंघेऊनिअसंख्यवीर ॥ कपीश्वरपर्वतींवेंधले ॥ ४५ ॥ **साकी** ॥ उजवेचरणाउचलुनिठेवी कपिमायाख्यपुरीतें ॥ आनंदूनीदिवट्यालावीति नाचतिबहुतहरीते ॥ ४६ ॥ **ओंव्या** ॥ मगतेजगज्जननीचेभृत्य ॥ पाजळोनिदीपिकांचेपोत ॥ वीरश्रीप्रेमेंकरितीनृत्य ॥ पाटणचौका भोंवते ॥ ४७ ॥ जुंझारवीरींअनेकीं ॥ सिंहनादाचीचौडंकी ॥ वाजवूंनिगर्जितजेमुखीं ॥ उदो-श्रीरामअंबेचा ॥ ४८ ॥ कपींद्रभुभुःकारसमेळ ॥ तेणेंदुमदुमिलाब्रह्मगोळ ॥ तोमहाशब्द-नादव्यांळ ॥ शतमुखश्रवणींझोंबला ॥ ४९ ॥ **आर्या** ॥ त्याकपिसमूहघोषें शततुंडातेंबहू-तयेकोप ॥ कपिरूढरामपाहुनि मूर्च्छामयत्यांसिलागलीझोंप ॥ ५० ॥ **ओंवी** ॥ सावधहोऊ-निनिशाचर ॥ पाचारूनिसमस्तवीर ॥ म्हणेभूतसंचार नगरवेष्टूनिजाहलासें ॥ ५१ ॥ **आर्या** ॥ जोश्रीरामवदान्य त्रिजनींत्याप्रभुसदुष्टभूतअसें ॥ वदतेझालेसर्वहि स्थिरचरव्यापू-नितोचिभूतअसे ॥ ५२ ॥ **ओंव्या** ॥ शीघ्रहरावयातेबाधा ॥ तुम्हीगेलेंपाहिजेयुद्धा ॥ का-ळकेयाअतिप्रबुद्धा ॥ प्रधानातेंआज्ञापी ॥ ५३ ॥ हनुमंतमहद्भूताकार ॥ देखूनिभ्यालेनि-शाचर ॥ काळकेयेंधरूनिधीर ॥ युद्धकेलें सत्राणें ॥ ५४ ॥ त्या श्रीरामें महाकाळें ॥ घा-लूनियांबाणजाळें ॥ तनुजळींहूनिवेगळे ॥ प्राणमत्स्यकाढिले ॥ ५५ **आर्या** ॥ कल्मषभाज-नशतमुख, क्रोधाचाउदधिकींअसेसाच ॥ रणभूमिप्रतियेउनि मांडीमगशत्रुलागिंवहुजाच ॥ ५६ ॥ **दिंडचा** ॥ म्हणेभक्षायाफळेंमरणरूपी ॥ तुम्हांझालेडोहळेदुःखकूपीं ॥ आलायेथेंओ-पिलेंप्राणवारें ॥ जाणव्याघ्रार्चादरहीचबारे ॥ ५७ ॥ सिंहवसतेकाननींकसेआला ॥ येथघा-लिलतो अकस्मातघाला ॥ तुम्हांदेतोंमीमरणसांकडेंहो ॥ कोणरक्षीभक्षीनरोकडेंहो ॥ ५८ ॥ **साकी** ॥ ऐसेंबोलुनिशतमुखराक्षण, स्वकरींघेधनुबाण ॥ ठाणमांडुनी वर्षेभारी हरुंपाहेरिपुप्राण ॥ जर्जरझालीरामसेना ॥ स्थाननिर्भयगवसेना ॥ ५९ ॥ ॥ **श्लोक** ॥ इंद्रवज्रा ॥ श्रीरामसोडीशरजेविखार ॥ तेसर्वभक्षीरजनीविहार ॥ आश्चर्य झालेंसुरमानवांतें ॥ तोहेतुकांहींनकळेकुणातें ॥ ६० ॥ **पद** ॥ (मजलावरि-लसुभद्राकाय. या चालीवर.) नारदबोलेरघुराया; परिसेंवचनातें ॥ ध्रु० ॥ आप-ल्याबाणेंकरूनिजाण ॥ रावणनमरेहेंअनुमान ॥ होतें यास्तवकरूनिमान ॥ कांता-आणयेठायीं ॥ १ ॥ नारदबोले० ॥ वंदुनितीचेतूंचरण ॥ अनन्ययोगेंजाशरण ॥ रक्षणकरूनितुझेंतीजाण ॥ नाशिलपूर्णशत्रूतें ॥ २ ॥ नारदबोले० ॥ ६१ ॥ **ओंवी** ॥ तुजसारिखे जगजीवना ॥ जेथूनिअवतरतीनाना ॥ अनंतब्रह्मांडांचीरचना ॥ संकल्पमात्रेंसंभवे ॥ ६२ ॥ तेआदिशक्तीचीज्योति ॥ जाळीलशतमुखकर्पूराप्रति ॥ श्रीराममम्हणेतयेव्यक्ति ॥ आकारा-वयाअघटित ॥ ६३ ॥ तेंवर्मनेणसीरघुपती ॥ चिच्छक्तीजानकीसती ॥ तींतेंआणुनिशघ्रि गती ॥ नमस्कारूनिप्रार्थिकां ॥ ६४ ॥ **श्लोक** ॥ करी प्रार्थना वंदुनीशक्तिमाया ॥ रिपूंना-शनाहेंबरीयुक्तिराया ॥ म्हणोनीतुलावर्महें जाणवीलें ॥ करीत्यावरीऐकतांमान्यकेलें ॥६५॥ **आर्या** ॥ रामेंस्तवितांमारुति, जाताझाला रघूत्तमानमुनी ॥ जेव्हांशततुंडानें, शस्त्रासेंसो-

डिलीं विलोकिमुनी ॥ ६६ ॥ ओंव्या ॥ तंवयेरीकडेअयोध्यापुरी ॥ सीतानिद्रितानिजमंदिरीं ॥ देखूनिकपीमनःसागरीं ॥ युक्तिमौक्तिकधुंडाळी॥ ६७ ॥ म्हणेकेलियाशब्दघोष ॥ निद्राभंगाचालागेलदोष ॥ स्वामीकांतेसीतंवस्पर्श ॥ करूंनये सर्वथा ॥ ६८ ॥ श्लोक ॥ शिखरिणी ॥ कराग्रानेंसीताभवनउपडीघेउनिकरीं ॥ रणामाजीआलात्वरितगतिनेंपुंगवहरी ॥ म्हणेश्रीरामातेंगमनकरुनीकार्यकरगा ॥ गृहामाजीमोदेंवदुनिकपिवैसेमगउगा ॥ ६९ ॥ पद ॥ ममतूंआदिशक्तिआदिशक्ती ॥ त्रिभुवनेंतुजलाकांपती ॥ ध्रु० ॥ शतमुखरावणानिगुती ॥ मारुनिफेडींमाझीभ्रांती ॥ १ ॥ ममतूं० ॥ तुजविणमजलाआतां ॥ कोणीनादिसेप्राणदाता॥२॥ ममतूं० ॥ ७० ॥ पद ॥ अंबाबाई ॥ तूं त्रैलोक्याचीआई ॥ ध्रु० ॥ स्थिरचरव्यापकतूंजगदंबे ॥ अद्वयनिर्गुणभुवनस्तंभे ॥ लीलानिर्मितविश्वकदंबे ॥ मजकडे पाहीं ॥ १ ॥ तूंत्रै० ॥ शोणितबीजमहिषमर्दिला ॥ रात्रिंचरां धाकलाविला ॥ सौख्यादिधलेंत्यादिग्बाला ॥ वर्णूकायी ॥ २ ॥ तूंत्रै० ॥ मातेमाझेंतुजवांचून ॥ येऊनिकरिलकोणतोअवन ॥ तूंचिमाझेंमोक्षभवन ॥ संशयनाहीं ॥ ३ ॥ तूंत्रै० ॥ दाशरथीसखाराम ॥ प्रार्थींगाऊनियासन्नाम ॥ करींजननीपूर्णकाम ॥ हृदयींराहीं॥४॥ तूंत्रैलोक्याची आई ॥ अंबा० ॥ ७१ ॥ ओंव्या ॥ सान्निध देखेरघुनंदन ॥ म्हणेमींदेखतेंकायस्वप्न ॥ मायापुरागेलारमण ॥ अयोध्येमाजींमीअसें ॥ ७२॥ श्रीरामम्हणेहें मायापूर ॥ सात्वमीअसेंकौसल्याकुमार ॥ युद्धींसंकटमहाथोर ॥ म्हणूनितुह्मांआणिलें ॥ ७३ ॥ आर्या ॥ शत्रुजयनहोयरणीं, मद्बाणेंतिळनसेचिहाढळला ॥ चिंतासागरिंबुडतां, मुनिवाक्येंहाउपायआढळला ॥ ७४ ॥ ओंवी ॥ आतांनलावींउशीरा ॥ निधनमद्यशतशीर्षअसुरा ॥ अमृतपानअम्हांसुरां ॥ जगन्मोहिनीवाढीकां ॥ ७५ ॥ आर्या ॥ ऐशीराममुखेंती, ऐकेस्तुतितोचिअर्थजाणून ॥ तैंनिजचित्तींभावी, टाकावाआजदुष्टखाणून ॥ ७६ ॥ ओंव्या ॥ हरिहराचीध्येयमूर्ती ॥ जयजयसदयेस्वानंदविभूति ॥ जयानंदेअव्यक्तशशी ॥ परात्परेतुजनमो ॥ ७७ ॥ समाप्त होतांस्तवार्चन ॥ नैवेद्यओपिदेधनुष्यबाण ॥ साष्टांगेंवालूनिलोटांगण ॥ कृपाकीजेम्हणतसे ॥ ७८ ॥ देखूनिभक्तीअनन्यता ॥ तुष्टली तींजगन्माता ॥ म्हणेजगदोनिसामर्थ्यसविता ॥ निशाचरतमानिरसीन ॥ ७९ ॥ ऐसेंबोलूनि आदिशक्ती ॥ आलीरणभूमींआतौती ॥ चहूंभुजांचीआकृती ॥ जाहलीधरितीतेधवां ॥८०॥ ॥ आर्या ॥ पाशांकुशधनुघेउनि, बाणहिलाविलेकरीस्फुरण ॥ घालूनिवज्रठाणाहि, त्यासिलावूनिबाणसोडिलाएकेक ॥ प्रसवूनिहांतातशतबरी ॥८२॥ श्लोक ॥ त्वरेंकरूनीमग बाणकाढी ॥ सज्जोनिचापीरिपुलागिंधाडी महींक्रमेंतीशतशीर्षपाडी ॥ दैत्यावरीपातलि काळधाडी ॥ ८३ ॥ ओंव्या ॥ तोबाणझगडोनिशतकंधरीं ॥ शिरेंउडविलींगगनोदरीं ॥ गरगरांभ्रमूनिचक्राकारीं ॥ अधोभूमींपाडिलीं ॥ ८४ ॥ म्यासुरदेखकलेवर ॥ आयुष्यकरूनिजगर्जर ॥ आंगलगनिशाचर ॥ मारुनिकेलेनिर्बीज ॥ ८५ ॥ राक्षसमृत्युलग्नासिद्धी ॥ जहालियासीतानिजानंदीं ॥ आणिश्रीरामसैन्यामांदी ॥ विजयझेंडानाचविति ॥ ८६ ॥ साकी ॥ शतमुखरावणपडतांसमरीं, हर्षझालाअखिलां ॥ राघवकटकींनाचेमाता, आदिशक्तिजीमहिला ॥ अंकीतैसलिरामाचे ॥ सीताकायवर्णूवाचे ॥ ८७ ॥ आर्या ॥ रघुराजोजयतितरांसहनुमानजयतिलक्ष्मणोजयति ॥ ऐसेकपिवरगर्जति लंकाकांपेधरूनियाभयती ॥ ८८ ॥ ओंव्या ॥ एकेचिपदेंलंकाद्वारीं ॥ करीप्रविष्टजाहल्यावरीं ॥ तळींउतरूनसमस्तवीरीं ॥

पौंड्रकधरूनिआणिला ॥ ८९ ॥ त्याचाकरावाप्राणघात ॥ तंवतोम्हणेमीशरणागत ॥ परि-सोनियांजानकीकांत ॥ शरणागतारक्षितसे ॥ ९० ॥ अभंग ॥ रावणमारूनी-पौंड्रिकरक्षिला ॥ राज्यींबैसाविलाबिभीषण ॥ १ ॥ प्रभुसहसीतालक्ष्मणांसत्वरीं ॥ येउनिश-रयुतरींकपीआला ॥२॥९१॥ श्लोक ॥ शुद्ध कामदा ॥ करुनिपारणारामराजतो ॥ सदनिं बैसलाफारशोभतो ॥ रिपुसिमारुनीस्वस्थजाहला ॥ कवनिंवर्णितांदेवलाभला ॥९२॥ तात्पर्य, बिभीषणावर हें शतमुखरावणरूप महत् अरिष्ट आलें होतें, परंतु तो सर्वकाळ श्रीरामचं-द्राच्या नामाचे ठिकाणीं रममाण असून श्रीरामचरणास अनन्यशरण झाल्या-मुळें अशाही अतिभयंकर, महादुस्तर संकटसमुद्रांतून रामनामनौकेनेंच तरून गेला. तस्मात् तें रामनामच सकल साधनांत सारभूत आणि सर्व पवित्रांत पवित्र असें आहे. अशा अभिप्रायानें तुकाराम कवि प्रथमअभंगीं वर्णन करितात. ॥ नामपावनपावन ॥ नामींतरले अवघेजन ॥ १ ॥ तवकथामृतं० ॥ आरती० ॥ कायेनवाचा ॥ अच्युतंकेशवं ॥ हरेरामहरेरामरामरामहरेहरे ॥ हरेकृष्णहरेकृष्णकृष्णकृष्णहरेहरे ॥ भजन० ॥ पुंडलीक० ॥ ॥ पार्वतीपते० ॥ जानकी० ॥ संपूर्ण.

लक्ष्मणशक्तिआख्यान.

पूर्वरंग निरूपण.

श्रीमंगलमूर्तयेनमः ॥ अविरलमद० ॥ इत्यादिमंगलाचरणं ॥ भजन.—जयजयराम-कृष्णहरी ॥ जयजय० ॥ पुंडलीवरदेहरि० ॥ पार्वतीपतेहर० ॥ जानकीजीवनस्मरणजय जय० ॥ नंतर ध्रुपद म्हणावें:॥ पद ॥ मगतेमायाकायकरी ॥ स्मरतांनित्यहरी ॥ ध्रु० ॥ नामरूपात्मकसकळहिनश्वर ॥ निश्चयहाविचरी ॥ १ ॥ मगते० ॥ शांतिदयापरश्रवणीं सादर ॥ भवभ्रमनउरेउरी ॥ २ ॥ मगते० ॥ सहजपूर्णनिजरंगींरंगुनि ॥ सद्गुरुपायधरी ॥ मगते० ॥ पुंडलीक० ॥ पार्वती० ॥ सीताकांत० ॥ स्मरतांनित्यहरी ॥ मगते मायाकायकरी ॥ मायाकायकरी ॥ मगते० ॥

उपोद्घात.

आदौ कीर्तनारंभाचे ठायीं कविकुलतिलक ब्रह्मनिष्ठशिरोमणि रंगनाथस्वामी अधिकारी साधकांस मायासमुद्र तरण्यास उपाय सांगतात.—॥ स्मरतांनित्यहरी ॥ मगतेमायाकाय करी ॥ अहो जीवहो, मायामृगीनर्तक जो परमात्मा हरि त्याचें निरंतर स्मरण केलें असतां ही माया काय करणार आहे ? यावर शंकाकार म्हणतो, अहो बोवा, " वारिधिलक्षाहु-निही, माया अतिदुस्तरा इस तराया " ॥ ही आर्योक्ति आपल्यास माहीत नाहींसें वाटतें ? तशीच साक्षात् भगवदुक्तिही आहे—गीता—"दैवीह्येषागुणमयीममायादुरत्यया. " याच-प्रमाणें ज्ञानेश्वरांचेंही म्हणणें आहे; ॥ ओंवी॥ " पाडसवागुरकरांडी ॥ कींमुंगीमेरुओलांडी ॥ तरीमायेचीपैलथडी ॥ देखतीजीव ॥ १ ॥ म्हणुनियापांडवसुता ॥ जैसीसकामानजिणवेचिवे-निता ॥ तैशीमायामयहेसरिता ॥ नतरवेजीवा ॥ २ ॥ " असें असून तुम्ही म्हणतां, ' मग ते माया काय करी ' हें कसें ? असा आक्षेप ऐकून रंगनाथस्वामी म्हणतात बाप्पा, तूं

म्हणतोस तें खरें, ही मायानदी अति दुस्तर तर खरीच आहे, परंतु तिचा तरण्याचा मुख्य उपाय जें श्रीहरिस्मरण तें केल्यावर मग हिचें सामर्थ्य चालत नाहीं आणि हींच गोष्ट तूं सांगितलेल्या भगदुक्तीचें उत्तरार्ध पाहिल्यावर सहजच अविरुद्ध तुला खरी वाटेल तें उत्तरार्ध हें "मामेवयेप्रपद्यंतेमायामेतांतरंतिते ॥ १ ॥" अर्थ–हे अर्जुना, ही माझी त्रिगुणात्मक माया अतिदुस्तर खरीच, परंतु जे कोणी अनन्यभावानें मलाच शरण येतात ते पुरुष मायेपासून तरतात. त्याचप्रमाणें आर्येच्याही उत्तरार्धांत श्रीहरिभजन माया तरण्यास उपाय म्हणून सांगितलें आहे.–" इस तराया ॥ यत्नप्रबुद्धहि म्हणे हरिभजनाविणनसेदिसतराया ॥ १ ॥ " याच अर्थाची ज्ञानेश्वराची ओंवीही आहे.—" येथएकचिलीलातरले ॥ जे सर्व भावें मज भजले ॥ तयांऐलिचथडीसरलें ॥ मायाजाळ ॥ १ ॥ तेव्हां जो परमात्मा श्रीहरि जे त्याचें निरंतर स्मरण करून अनन्यभावें त्यास शरण जातात त्यांस ही माया कांहीं एक अनर्थ करीत नाहीं, असा आशय मनांत आणून कवि (रंगनाथ) म्हणतात,–स्मरतां नित्यहरी ॥ मगते० ॥ आतां यावर शंका, अहो ! आपण मायानदी तरण्यास उपाय हरिस्मरणं म्हणून सांगितलें हें ठीक आहे, परंतु ही माया म्हणजे काय आणि इच्यापासून अनर्थ तो काय झाला आहे ? हें समजल्यावांचून तिच्या निवारणाची वाटाघाट निरर्थक आहे; यास उत्तर.–आपण सच्चिदानंदघन असतां जिच्या योगानें असज्जडदुःखात्मक वाटतो, म्हणजे "न जायते म्रियतेवाकदाचिन्नायंभूत्वाभवितावानभूयः ॥" इत्यादि श्रुतिस्मृति वाक्यांवरून आत्मस्वरूपाचे ठायीं जन्ममरणादि विकार कांहीं नाहींत आणि आपण तर 'एकएकायोनीप्रती ॥ कोटी कोटिफेरेहोती ॥" या अभंगाप्रमाणें निरंतर जन्ममरणाच्या प्रवाहांत आहोंत तसेंच आमचें स्वरूप नित्यानंदघन असून आम्ही यत्किंचित् क्षुल्लक विषयसुखाकरितां दीनवाणें होऊन जन्मभर दारोदार लागत आहों. याप्रमाणें आमची विपरीत स्थिति होण्यास कारण जी अज्ञानावरण विक्षेपात्मकशक्ति तीच माया होय. तिनें स्वरूपाचे वास्तविक आनंदादिक धर्म आच्छादन करून दैन्यादिक धर्म नसतेच आपल्या ठिकाणीं भासविले; यास दृष्टांत.–एक वाघाचें पिलूं अगदीं लहानपणीं (जन्मतांच) एका धनगरास सांपडलें. त्याणें तें आपल्या रक्षणाच्या उपयोगीं पडेल असें जाणून कुत्र्यांमध्यें वाळगलें. त्यास जन्मापासून कुत्र्यांचा सहवास असल्यामुळें, त्या कुत्र्यांचींच सर्व लक्षणें लागलीं, कुत्रा जसा भुंकतो त्याप्रमाणें तें भुंके, त्याचें जें भक्ष्य तेंच हें भक्षण करी; वाघ, लांडगा इत्यादि क्रूर पशु पाहून कुत्र्याप्रमाणें भिऊन पळत असे. तात्पर्य, मी कुत्राच अशी त्याची भावना दृढ होऊन कुत्र्याचें सर्व आचरण तो (वाघ) करूं लागला. त्याप्रमाणें या जीवांची व्यवस्था झाली आहे. आतां त्या व्याघ्रास श्वानत्व प्राप्त होण्यास कारण, व्याघ्रत्वास आवरक व अन्यथा भ्रमास (कुत्रेपणास) उत्पादक अशी त्याची नैसर्गिक अविद्यावृत्ति त्याचप्रमाणें आत्मस्वरूप जें नित्य निरतिशयानंद त्यास आवरक व जीवत्वरूप अन्यथाभ्रमास उत्पादक जी ही नैसर्गिक मायाशक्ति तीच आपल्या या विपरीतभावनेस कारण झाली आहे, यामुळें तिची निवृत्ति झाल्यावांचून स्वानंदप्राप्ति व्हावयाची नाहीं, यास्तव त्या मायेची निवृत्ति करणें अवश्य आहे. आतां तिच्या निवारणार्थ उपाय कोणता म्हणाल तर हाच.– ॥ स्मरतांनित्यहरी ॥ मगतेमायाका० ॥ त्या वाघाचें अज्ञान, आपले. ठिकाणींच

निरर्थक दीनत्वादि दुःखांस हेतु झाल्यानंतर एके दिवशीं त्याच प्रदेशांत वाघ प्राप्त झाला. तेव्हां त्याला पहातांच सर्व कुत्र्यांबरोबर तो लहान वाघही पळूं लागला; त्या समयीं तो वाघ म्हणाला, हे कुत्रे मला भिऊन पळतात हें योग्य आहे, परंतु हा वाघाचा बच्चा असून मला कां भीत आहे, समजत नाहीं; असा विचार करून त्यास हाक मारून आणि अभय देऊन म्हणाला, अरे बाबा ! तूं कां पळतोस ? बच्चा म्हणाला, तूं मला मारशील म्हणून; वाघ म्हणतो, तूं कोण आहेस ? त्यानें सांगितलें मी कुत्रा. त्या वेळीं त्या व्याघ्रास आश्चर्य वाटून मनांत म्हणतो, अरेरे ! ! हा माझा सजातीय अज्ञानामुळें कुत्र्यांत मिसळला आहे तर याचें अज्ञान नाहींसें करतों म्हणजे हा आपलें स्वरूप जाणून या भ्रांतिकल्पित श्वानत्वापासून मुक्त होऊन भयनिर्मुक्त होईल. असा विचार करून त्यास म्हणाला अरे, तूं कुत्रा नव्हेस, तो कुत्रा पळत आहे त्याचा रंग व आकृति तूं पहा आणि आपलीही पहा, म्हणजे तुझ्या ध्यानांत येईल; नंतर त्यानें तसें करतांच आपण कुत्र्याहून वेगळे प्रकारचे आहों असें त्यास वाटलें. मग त्या वाघानें आपलें स्वरूप दाखवून नंतर स्वतःचें पहावयास सांगितलें. तेव्हां तें सादृश्य दिसतांच मी वाघ आहें, असा त्याचा पूर्ण निश्चय झाला व तेच कुत्रे त्यानें आपल्या व्याघ्रत्वज्ञानदेवतेस प्रथम बळी केले. अस्तु. त्याप्रमाणें ह्या जीवानें आपलें व देहादि जडवर्गाचें वैलक्षण्य (वेगळेपणा) मनांत आणून नंतर सच्चिदानंदरूप परमात्मा जो श्रीहरि त्याच्या स्वरूपाचें चिंतन करून देहेंद्रियादिरहित केवल चिदंशरूप जीवाचें व परमात्म्याचें सादृश्य मनांत आणून निरंतर त्याचेंच निदिध्यासन केलें असतां आपलेंच परंतु मायेनें आच्छादन केलेलें ज्ञान, आनंदइत्यादि धर्म आविर्भूत होऊन अंशतः तोच आपण आहों असा बोध उत्पन्न होतो, अर्थातच मग ती माया काय करणार आहे ? असा अभिप्राय मनांत आणून रंगनाथस्वामी म्हणतात. ॥ स्मरतांनित्यहरी ॥ मगतीमाया कायकरी ॥ १ ॥ आतां ही माया जीवांस किती दुःख देते व हिची निवृत्ति कशानें होते याविषयीं वेदस्तुतीच्या व्याख्येंत श्रीधरस्वामी म्हणतात—श्लोक ॥ नृत्यंतीतववीक्षणांगण-गताकालस्वभावादिभिर्भावान्सत्वरजस्तमोगुणमयानुन्मीलयंतीबहून् ॥ मामाक्रम्यपदाशिरस्यति-भरात्संमर्दयत्यातुरंमायातेशरणंगतोस्मिनृहरेत्वामेवतांवारय ॥ १ ॥ अर्थ—हे नृहरे हे परमात्मन् ही तुझी मायारूप 'वेश्या' माझ्या मस्तकावर पाय देऊन अतिभारानें पीडित झालेला जो मी त्या मला मर्दन करीत आहे ! आतां मायेला वेश्या म्हटलें आहे तेव्हां वेश्येचे गुण हिच्यांत कोणते आहेत म्हणाल तर सांगतों—नृत्यंती हे जगदीश्वरा, तुझें जें वीक्षण म्हणजे अवलोकन हेंच अंगण यांमध्यें ती नृत्य करिते, वेश्येला तालधारी आदिकरून मंडळी जशी सहाय्य करते, त्याप्रमाणें काल, कर्म, स्वभाव इत्यादि त्या मायावेश्येची सहाय मंडळी आहे, वेश्या जशी अनेक हावभाव करून प्रेक्षकांचें मन आकर्षण करित्ये त्याप्रमाणें ही माया सत्व, रज आणि तम या गुणांच्या अनेक वृत्ती उत्पन्न करून सर्व जीवांस मोहित करत्ये. तस्मात् हिला वेश्या म्हणणें योग्य आहे. तर या मायापाशांतून मुक्त होण्याकरितां हे नृहरे मी तुम्हांसच शरण आलों आहें, तर आपण तिचें निवारण करा. तात्पर्य, परमात्मभजनावांचून मायानिवृत्ति व्हावयाची नाहीं, तिची निवृत्ति होण्यास एक श्रीहरीचें भजन किंवा

सतत स्मरणच उपाय आहे. म्हणून कवि म्हणतात.—स्मरतां नित्य हरी ॥ मगतेमायाका०॥ आतां श्रीहरीचें नित्यस्मरण राहण्यास तरी साधनें कोणतीं ? याविषयीं पुढील चरणांत सांगतात.—नामरूपात्मकसकलहिनश्वर ॥ निश्चयहाविवरी ॥ १ ॥ श्रीहरीचें निरंतर स्मरण होण्यास नामरूपात्मक जगतावर मिथ्यात्वबुद्धि हें प्रथम साधन, कारण हें सर्व अनित्य आहे अशी दृढ भावना झाली असतां नित्यस्वरूप जो परमात्मा त्या ठिकाणींच अंतःकरण रममाण होतें. यावर शंका. अहो, हें जग मिथ्या म्हणतां हें कसें ? कारण या जगांत दीर्घ कालास अवलंबून कित्येक कृत्यें आपण आरंभतों व तीं त्याप्रमाणें पुष्कळ काळानें सिद्धीस जातात. तशींच प्रत्येक पदार्थापासून अर्थक्रिया होते म्हणजे शीत पदार्थापासून शैत्याचा अनुभव येतो, उष्ण पदार्थापासून उष्णता होते; याप्रमाणें भोजन केलें असतां तृप्ति होते. इत्यादि वास्तविक व्यापार होत असून या जगास मिथ्या कसें म्हणावें ? यास समाधान—क्रिया खरी झाली म्हणजे ज्या पदार्थाचे आश्रयानें ती क्रिया होते ते पदार्थही खरेच असें सिद्ध होत नाहीं. कारण, मिथ्या पदार्थापासून देखील अर्थक्रिया होते; यास उदाहरण.—शेतांत पक्ष्यादिकांनीं येऊं नये म्हणून बुजगावणें करीत असतात. त्यास पहातांच पशु, पक्षी पळून जातात. तात्पर्य, त्यापासून शेताचें रक्षण होतें म्हणून त्या बुजगावण्यास खरें मनुष्य म्हणतां येणार नाहीं. तद्वतच अर्थक्रिया होते एवढ्यावरूनच जगास सत्यत्व सिद्ध होत नाहीं; कारण, क्रिया ही मिथ्या पदार्थापासूनही होते. यास रज्जुसर्प आदिकरून पुष्कळ दृष्टांत आहेत. आतां या जगास मिथ्यात्वाविषयीं प्रमाणें तर पुष्कळ आहेतच, परंतु विचारानें पाहिलें असतां या जगाचें मिथ्यात्व सहज प्रत्ययास येईल. जें वस्तुत्रिकाळीं अबाधित त्यास नित्य किंवा खरें असें म्हणतात आणि हें नामरूपात्मक जगत् तर अवस्थात्रयांत देखील सारखें प्रतीयमान नाहीं. यास प्रमाण ॥ श्लोक ॥ स्वप्नेजागरितंनास्तिस्वप्नोजागरितेनहि ॥ लयेऽपिद्वयुभयंनास्तिलयोपिद्वयुभयोर्नहि ॥१॥ अर्थ.—जें जागृतींत दिसतें तें स्वप्नांत नाहीं, जें स्वप्नांत दिसतें तें जागृतींत नाहीं, स्वप्न आणि जागृती या दोन्हीतील व्यवहार सुषुप्तींत नाहींत, याप्रमाणें अवस्थात्रयांत व्यभिचार पावत असल्यामुळें अहंकारादि घटांत नामरूपात्मक सर्व जग मिथ्या आहे, असा जो वेदांतशास्त्राचा निश्चय त्याचें अंतःकरणांत नीट विवरण कर म्हणजे जगन्मिथ्याबुद्धि दृढ झाली असतां नित्यसत्य जें परमात्मस्वरूप त्याचें सर्वकाळ स्मरण राहील आणि हरिस्मरण नित्य राहिल्यावर, " मगतेमायाकायकरी " तसेंच सतत हरिस्मरण राहण्यास दुसरें साधन भूतदया व अंतःकरणाची शांतता म्हणजे कामादि विकारराहित्य हें आहे. म्हणून दुसरे चरणांत प्रतिपादन करितात.— " ॥ शांतिदयापरश्रवणींसादर ॥ भवभ्रमनउरेउरी ॥ " अंतःकरणांत सर्वकाळ शांतता, (कामादि विकारशून्यता) असली म्हणजे हरिस्मरण सतत राहतें. याविषयीं आचार्य म्हणतात.— ॥ श्लोक ॥ आसुतेरामृतेःकालंनयेद्वेदांतचिंतया ॥ दद्यान्नावसरं कंचिन्कामादीनांमनागपि ॥ १ ॥ अर्थः—जागें झाल्यापासून पुन्हां झोंप येईपर्यंत, तसेंच जन्मल्यापासून मरेपर्यंत वेदांताचिंतनांत काळ घालवावा, काम, क्रोध, लोभ इत्यादि विकारांस थोडीहि सवड मनांत शिरण्यास देऊं नये. आणि सर्व भूतांचे ठिकाणीं आत्मवत् दया व श्रवण म्हणजे परब्रह्मस्वरूपाचें श्रवण याविषयीं सादर म्हणजे [illegible]

तत्पर असावें म्हणजे त्या योगानें परमात्मस्मरणाविषयीं वृत्ति निरंतर जागरूक राहिली असतां संसारभ्रमनिमित्तक भय निःशेष नाहींसें होतें, अशा अभिप्रायानें रंगनाथ स्वामी म्हणतातः— ॥ स्मरतांनित्यहरी ॥ मगतेमायाकायकरी ॥ आतां निरंतर श्रीहरिस्मरणानें मायापाशांतून मुक्त झालेला व शांति, दया आणि वैराग्य इत्यादि शुद्ध सद्गुणरत्नांनीं अलंकृत जो अंजनीसुत हनुमान तद्धीर्यातिशयप्रदर्शक लक्ष्मणसंजीवनाख्यान कवि निरूपण करितात.

लक्ष्मणशक्तिआख्यानप्रारंभ.

श्रीगणेशायनमः ॥ आर्या ॥ सौमित्रासहवानर, बलघेउनिसंगातेत्वरेंआला ॥ दशरथतनयरघुत्तम, दशमुखमानूनिमानसींपाला ॥ १ ॥ साकी ॥ होतांसंगरघोरपरस्पर, रामवदेसौमित्रा ॥ युद्धांतींमजझालेश्रमबहु पीडितितेममगात्रां ॥ दशमुखगांठुनियासमरीं ॥ बाणासोडुनि शांतिकरी ॥ २ ॥ दिंडी ॥ रामवचनपरिसूनिलक्ष्मणानें ॥ पुढेंलक्षुनिरावणाकौतुकानें ॥ युद्धकौशल्यदावितांचितेणें ॥ शक्तिसोडियलीधांवतीत्वरेनें ॥ ३ ॥ श्लोक ॥ इंद्रवज्रा ॥ येतांचिशक्तीकरिंमारुतीनें ॥ तेघेतलीतैंवनितात्वतीनें ॥ त्यातेंवदेतूंजनिंब्रह्मचारी ॥ कांझोंबसीबासमजूनिनारी ॥ ४ ॥ भुजंगप्रयात ॥ कपीच्याकरांतूनिजेव्हांनिघाली ॥ महाशक्ति तेव्हांपुढेंशीघ्रआली ॥ उरींबैसतांलक्ष्मणादुःखझालें ॥ पडेमेदिनीमाजितोतैंनहाले ॥ ५ ॥ ॥ ओंवी ॥ लक्ष्मणपडतांरणमंडळी ॥ राघवयेऊनियाजवळी ॥ मायामोहेंदेहकवळी ॥ मस्तकअंकींघेउनियां ॥ ६ ॥ श्लोक ॥ हनुमन्नाटक ॥ धृत्वांकेऽनुजमब्रवीद्रणभुविश्रीरामचंद्रः सखे त्वंगंतासिपरत्रयाम्यहमपिप्रस्थानकृत्योद्यतः ॥ सीतामद्विरहान्मृतैवकपयोयस्यानुगाभक्तिमान्कस्यद्वारिबिभीषणस्तुविमनास्तिष्ठेदयेदीनवत् ॥ अर्थः—रामचंद्र रणभूमीचे ठिकाणीं लक्ष्मणास मांडीवर घेऊन म्हणतात; हे लक्ष्मणा, तूं आतां परलोकास जाशील आणि मीही तुझ्या पाठोपाठ प्रस्थान करण्यास उद्युक्त आहें, माझा वियोग झाल्यावर सीता मेलीच समज, वानर हे ज्याचे सेवक आहेत त्या सुग्रीवाकडे जातील, परंतु आपले ठिकाणीं ज्याची पूर्ण भक्ति तो बिभीषण खिन्न होऊन कोणाचे द्वारांत दीनासारखा जाऊन उभा राहील ? ॥ पद ॥ भय्यामोसोबोल लछमनभय्यामोसोबोल ॥ ध्रु० ॥ चौदाभुवनमे वाहवाकिन्ही ॥ बाजतबीनाढोल ॥ लछमन० ॥ तुलसीदासप्रभुअपराधीतेरा ॥ मनकी गाठनखोल ॥ २ ॥ लछमन० ॥ ८ ॥ दोहा प्रानत्यजौंसीतात्यजौं त्यजौंराजकोकाज ॥ बिभीखनकौकैसेत्यजौं याकीमोकोलाज ॥ ९ ॥ लछमन भय्यामोकौंत्यागिकै कियोस्वरगकोबास ॥ येकछूआच्छीनाकरीं छूटीमेरीआस ॥ १० ॥ श्लोक ॥ गिरियास्यंत्यमीवीरास्त्वयिवत्सदिवंगते ॥ मरिष्यामिससीतोऽहंक्वयास्यतिबिभीषणः ॥ ११ ॥ अर्थः—हे वत्सा, लक्ष्मणा, तूं स्वर्गास गेला असतां हे वानरवीर पर्वतावर जातील आणि सीतेसहित मीही प्राणत्याग करीन, परंतु बिभीषण कोणीकडे जाईल ! ॥ पद ॥ १२ ॥ सौमित्राबंधुराया कांरेमजलाटाकिसी ॥ ध्रु० ॥ परदेशींतुजविणेंमजकोणीनिरविलें ॥ वनोवनींउपवासीतुजलागींफिरविलें ॥ सर्वहीदुःखतेंमाझेंत्वांबाहारवीलें ॥ सीतेच्यादुष्टशब्दांत्वांपोटींजिरवीलें ॥ फळमुळेंजळाहिआम्हांनिशिदिनींबापुरवीलें ॥ अपराधातिच्यामाझ्याकितिवेळांसोशिसी ॥ १ ॥

सौमित्र० ॥ आतांमीकायकरूंतुजवीणएकला ॥ मशींबोलेंनेत्रींपाहेंजीवमाझाशोकला ॥ इंद्र जितशूरवरींत्वांजीवेंकींठोकला ॥ दशकंठाबाणलागेतोरक्ताओकला ॥ शूर्पणखानकटिकरुनं शंबरीलामारिशी ॥२॥ सौमित्राबंधुराया०॥ श्लोक ॥भुजंगप्रयात॥ सुषेणाभिमानीमहावैद्यराणा। म्हणेयामचत्वारआयुष्यजाणा॥रवीदेखतांप्राणसांडील काया॥करायत्नजोमीवदेंरामराया ॥१३। श्लोक ॥ मालिनी ॥ गमनकरुनियेतांयोजनेंआठकोटी ॥ जलनिधिपरपारींहेमतेजाळपेटीं । वचनपडतकानींवानरांधाकपोटीं ॥ उठुनिशपथबोलेमारुतीवीरजेठी ॥ १४ ॥ ते समयीं इतर आपआपली शक्ति सांगतांत.—श्लोक ॥ नलस्त्रिरात्रेपुनरेतिगत्वातथैवमैंदाद्विविदौद्विरात्रे ॥ सुग्रीव-नीलौपुनरेकरात्रेवीरोंगदोयामचतुष्टयेच ॥ १५ ॥ अर्थ—नळ नांवाचा वानर तीन रात्रींत जाऊन परत येत आहे, तसेंच मैंद आणि द्विविद हे दोन वानर दोन रात्रींत जाऊन परत येतात, सुग्रीव आणि नील हे एक अहोरात्रांत जाऊन येतात आणि वीर अंगद हा चार प्रहरांत जाऊन येत आहे ॥ ओंवी ॥ ऐसेंऐकून तेधवां ॥ निराशोंहोय जानकीधवा ॥ लक्ष्मणाकवळूनिशोकदवा ॥ प्रवेशलापुनरपि ॥ ११ ॥ पद ॥ १७ ॥ अ-रेसौमित्राबोलमशींकांहीं ॥ ध्रु० ॥ वाहतोंआणवसिष्ठगुरुची ॥ प्रतारणानाहीं ॥ १ ॥ अरे० ॥ बंधुरायातुजविणमजला ॥ शून्यदिशादाही ॥ अरे० ॥ २ ॥ श्लोक ॥ भुक्तेम-यिप्रथममत्सिफलानिवत्ससुप्तेकरोषिशयनंमयिजीवतित्वं ॥ प्राणान्जहासिसुरलोकसुखाय किंवा सापत्नभावमहहप्रकटीकरोषि ॥ १८ ॥ अर्थ.—हे वत्सा लक्ष्मणा, मीं प्रथम भो-जन केलें असतां नंतर तूं फळें क्षभण करीत असस, तसेंच मी आधीं निजल्यावर मग तूं निद्रा करीत होतास असें असून मी जिवंत असतां तूं स्वर्गलोकींचें सुख भोगण्याकरितां प्राणत्याग करितो आहेस. तस्मात् मला वाटतें, आजचे प्रसंगीं तूं सापत्नभाव प्रगट करि-तोस काय ? ॥ श्लोक ॥ पातालतःकिमुसुधारसमानयामिनिष्पीड्यचंद्रममृतंकिमुवाहरामि ॥ उद्यत्प्रचंडकिरणंकिमुवारयामि कीनाशपाशमानिशंकिमुचूर्णयामि ॥ १९ ॥ अर्थ.— याप्रमाणें राम शोक करीत असतां मारुती म्हणतो; हे रामचंद्रा, मी पाताळांत जाऊन तेथून अमृतरस आणूं काय ? किंवा चंद्रमंडळ पिळून त्यांतील अमृत हरण करूं ? अथवा ज्या सूर्याचा उदय झाला असतां लक्ष्मणाचे प्राण जाणार त्या प्रचंड तेजस्वी सूर्यास हाकून देऊं, किंवा प्राण हरण करणारा जो यम त्याचा पाशच अगदीं चूर्ण करून टाकूं ? ॥ स्रग्धरा ॥ नीत्वालंकांसुषेणंपुनरनिलसुतःप्रार्थयामासरामंदेवाज्ञांदेहिवी-रास्तवहितकरणेप्रस्थिताःसंतिसर्वे ॥ लक्षाणांषष्टिरास्तेद्रुहिणगिररितोयोजनानांहनूमांस्तैला-ग्नौसर्षपस्यस्फुटनरबपरस्तत्रगत्वात्रचैमि ॥ २० ॥ अर्थ.—वायुपुत्र मारुति हा सुषेण वैद्यास पुन्हां लंकेस नेऊन राचचंद्राची प्रार्थना करिता झाला कीं, हे देवा, तूं आज्ञा दे, हे सर्व वीर तुझें हित करण्याविषयीं तत्पर आहेत. द्रोणागिरि हा येथून साठ लक्ष योजनें आहे, ' तथापि ' हा हनूमान् तापलेल्या तेलांत टाकलेली मोहरी जितक्या वेळांत फुटते तितक्या वेळांत तेथें जाऊन पर्वत घेऊन येतो आहे. ॥पद॥२१॥ जीनघबरो रघुवीर ॥ अबतुमजीनघबरोरघुवीर ॥ ध्रु० ॥ पावपलखमोपर्वतल्याऊं ॥ मनमोराखोधीर ॥ १ ॥ अबतुम० ॥ रविकुलव्यापकजगदुद्धारक ॥ बडेबडेरनधीर ॥ २ ॥ अबतुम० ॥ तुलसीदासप्रभुपावभरोसे ॥ उडगयेबजरंगबीर ॥ ३ ॥ अबतुम० ॥ साकी ॥ दोकरजोर विनतिकरेतब, सुनियोजीरघुनाथ ॥ द्रोनगिरिसमकोटिसेल्याऊं, पलमेअबमैंलाय ॥ २० ॥

श्लोक ॥ मालिनी ॥ तृतियप्रहरभागींशीघ्रआणीनशैलू ॥ करुनिपणउडालालोकप्राणेशबाळू ॥ सुमनमनविमोदेंठोंवलेंरामपायीं ॥ स्मरणकुलिशवाचेंविघ्नभंगी तदार्हा ॥ २३ ॥ अभंग ॥ ॥ २४ ॥ कालनेमीनामाविप्रवेषेंथोर ॥ बैसलासमोरमार्गामाजी ॥ १ ॥ आश्रमांतवेद-घोषतोकरीत ॥ होउनिमहंतबोधीशिष्यां ॥ २ ॥ फलपुष्पयुक्तवृक्षघनदाट ॥ वाहतीजळ-पाटसुगंधानें ॥ ३ ॥ सखारामप्रभुदासमारुतीये ॥ तयालवलाहेंविचारीहो ॥ ४ ॥ श्लोक ॥ ॥ मालिनी ॥ तृषितकपिवरेंत्यामागतांतोयदूतें ॥ वसतिगृहतडागींदाविलेंतेंचित्यातें ॥ कपि-वरजलपानींझोंबलीनक्रिपायां पडतमगरमीठीनासुटेसाधुराया ॥ २५ ॥ नसुटतमगकंठीं सूदलीपुच्छमाला ॥ धरुनिवदनवेगेंओपिलेपाणिगाला ॥ शतमितपरिमाणेंयोजनेंदेहभासे ॥ निरखुनिमगकुक्षींमारिलीलातरेंघें ॥ २६ ॥ शार्दूलविक्रीडित ॥ नक्रीहोउनिअप्सराकपि-वराबोलेदयासागरा ॥ बापाहानचविप्रआश्रमिंपहातोकालनेमीखरा ॥ झाल्येंशुद्धतुझ्याबळें नमुनियांस्वर्गासिजातेंभले ॥ ऐसेंएकुनिरुष्टचित्तकपिनेंत्यादुर्जनापाहिलें ॥ २७ ॥ मालिनी ॥ हरिवर जंव पाहे वाढला काळनेमी ॥ चरण धरुनि भूमीं भेदलें शीर्ष व्योमीं ॥ पसरुनिमु-ख धांवे पातकांचा समुद्र ॥ प्रकट प्रलयरुद्रातुल्य वाढे कपींद्र ॥ २८ ॥ पद ॥ हनुमंताचे गुण किती गाऊं नयनीं पाहुं पाहुं ॥ ध्रु० ॥ रामकार्यार्थीं मती रंगली हो ॥ बहु-वर्षांची जळीं खंगलीहो ॥ मगरी उद्धरिली पापीं गांजिलीहो ॥ चंद्रगिरीच्या आश्रमीं वेषधारी ॥ क्रोधरूपें वीर धाडितो नगारी ॥ आपदुनियां तूं त्यासी जिवें मारी ॥ वीर वज्रांगी असा कोण गाऊं ॥ गाऊ० ॥ १ ॥ २९ ॥ श्लोक ॥ मालिनी ॥ विकटहृदयमर्मीं ओपिली वज्रमुष्टी ॥ धरुनि धनुहि पायीं त्राटिला शैल पृष्ठीं ॥ फुटलि महि धडाडे शेषदेहीं धिराचे ॥ दशशतमित त्याच्या भाग झाले शिराचे ॥ ३० ॥ रघुकुलति-लकाचादूतराजप्रतापें ॥ न भरत पळ आला काळद्रोणागिरीपें ॥ नमुनि वचन बोले शैलराजापवित्रा ॥ दशमुखकरशक्तिभेद झाला सुमित्रा ॥ ३१ ॥ पद ॥ जोगी ॥ (मजला वरिल सुभद्रा काय, या चालीवर) यास्तव नमितों गिरिराया ॥ औषधि दे मजला ॥ ध्रु० ॥ सद्भावें मी धरितों पाय ॥ आतां कौतुक पाहसी काय ॥ विकळ संगरीं लक्ष्मणराय ॥ मोकलि धाय राम अहा ॥ यास्तव० ॥ १ ॥ उत्तमवल्ली देउनि पांच ॥ वारीं सौमित्राचा जांच ॥ तूंचि जीवनदाता साच ॥ न करीं नाच येकाळीं ॥ यास्तव० ॥ ॥ २ ॥ वल्ली देउनि पुरवीं आस ॥ विलंब लावुनि न करीं त्रास ॥ होतो सर्व सुखाचा ह्रास ॥ कृतांतपाश निवारीं ॥ यास्तव नमि० ॥ ३२ ॥ श्लोक ॥ भुजंगप्रयात ॥ वदे द्रोण तो मर्कटा मंदबुद्धि ॥ असा कोणरे रावणा रामद्वंद्वीं ॥ नये नाच दे अल्पही औ-षधीतें ॥ असें आश्रया वानरा तूंचि येथें ॥ ३३ ॥ म्हणे मारुती पाथरी शैलद्रोणा ॥ जडा नेष्ठुरा पामरा दीन हीना ॥ लवामाजि लंकेसि नेईन तूतें ॥ जगीं कोपल्या कोण वारील तातें ॥ ३४ ॥ बळें पर्वता घातले तीन वेढे ॥ करें कर्षिलें आंवरी पुच्छ गाढें ॥ कडाडे कडे सांडितां जेंवि लिंगा ॥ दशास्य स्वयें पाववी शैलभंगा ॥ ३५ ॥ चौदासहस्रांसि क-रुनि मारू ॥ चाले निराळीं सहशैल भारू ॥ मार्गीं अयोध्येवरि येत आहे ॥ तों रामबंधु गिरिसेंचि पाहे ॥ ३६ ॥ मालिनी ॥ भरत भटवरिष्ठें विघ्न मानूनि मोठें ॥ धरुनि मानुष्यपृष्ठीं सोडिला बाण नेटें ॥ रघुवर निजनामें बाण अंकीत लागे ॥ गिरिसहित कपींद्रू कष्ट साहेच वेगें ॥ ३७ ॥ साकी—राघव बांधव भक्त भरत तो पाहुनियां कपिराया ॥

रामनाम मुखिं चिंतन जाणुनि भावें वंदी पाया ॥ घडला अपराध माझा ॥ होईल कुपित राम राजा ॥ ३८ ॥ **अंजनीगीत** ॥ रघुपतिकार्या विघ्न आणिलें ॥ नेणुनि सखया तुजसी वधिलें ॥ रामदास तूं दैवत पहिलें ॥ माझें करि राया ॥ ३९ ॥ बाणाग्रावरि बसवुनि तुजसी ॥ रामासन्निध बहुवेगेंसी ॥ धाडुनि देतों ये समयासी ॥ चिंता न करिं बा ॥ ४० ॥ ॥ **श्लोक** ॥ मालिनी ॥ परि मज हनुमंता निंद्य कैसेनि साजे ॥ अभिनव बळ माझें जाणिजे रामराजें ॥ म्हणवुनि अतिवेगें वंदिला रामबंधू ॥ कपि जयजयकारें कोंदला एक नादू ॥ ४१ ॥ **पद** ॥ हनुमंता लौकर जाई ॥ भेट त्या श्रीरघुनाथा ॥ ध्रु० ॥ सांगरे निरोप माझा ॥ भरताच्या भेटी त्वरा जा ॥ सांग त्या प्रभु रघुराजा ॥ हें करि बा सखया माझ्या ॥ हनु० ॥ १ ॥ ४२ ॥ **श्लोक** ॥ **मालिनी** ॥ उशिर बहुत झाला मारुतीलागिं पाहों ॥ म्हणउनि करि चिंता जानकी प्राणनाहो ॥ तंव झळकत व्योमीं तेज फाके झळाळी ॥ म्हणति कपि उदेला मित्र जाळी उसाळी ॥ ४३ ॥ **भुजंगप्रयात** ॥ अगा मित्र तूं आजि-आम्हां अमित्रू ॥ कुला घातकी पातकी बालशत्रू ॥ नव्हे राजधन्वंतरी देवपाळा ॥ नव्हे भानु हा मारुतीराज आला ॥ ४४ ॥ **मालिनी** ॥ नमुनि गिरि सुषेणें हस्तकीं दैवराणा ॥ निवडुनि रसवल्ली काढिली सार जाणा ॥ लपवुनि जनदृष्टि सूदली भिन्न पात्रीं ॥ सुखमय मन आला जेथ घायाळ क्षेत्रीं ॥ ४५ ॥ **भुजंगप्रयात** ॥ मुखीं ओतिलें तोय संजीवनीचें ॥ व्रणीं लाविलें सार संजीवनीचें ॥ विशल्येंहि नेलें महादुःखभंगा ॥ उरीं लेपिली हेमवल्ली सुरंगा ॥ ४६ ॥ **श्लोक** ॥ आलेपितो हनुमता गिरिजौषधीभिर्मूर्च्छां विहाय सशरं धनुरादधानः ॥ रामारविंदतरणिर्धरणीधरात्मा लंकापतेः कुपित काल इवोपतस्थौ ॥ ४७ ॥ अर्थः—मारुतीनें द्रोणागिरिवरील संजीवन्यादि औषधींनीं लेपन केलेला, मूर्च्छा टाकून बाणासहित धनुष्य धारण करणारा रामचंद्ररूपी कमलास सूर्यासारखा (आल्हादक) शेषाचा अवतार आणि लंकापति जो रावण त्याचा पूर्ण काळच असा लक्ष्मण सावध होऊन रामासमोर उभा राहिला. ॥ **श्लोक** ॥ **भुजंगप्रयात** ॥ निजेलाउठेतेंविधांवेसुमित्र ॥ म्हणेकेउतापापरूपाआमित्र ॥ करेंकर्षिलाराघवेंप्राणमित्र ॥ दृढालिंगनेंहर्षदोघांविचित्र ॥४८॥ (मंदाक्रांतावृत्त) ॥ तातस्नेहोभरतमहिमापौरुषंवायुसूनोःसख्यंचापिप्लवगनृपतेःकाऽपिसौमित्रिभक्तिः ॥ सीतासत्यंनिजभुजबलंवैरिणांवैरिभावोज्ञातंसर्वंतवचरणयोर्मातरेषप्रसादः ॥ ४९ ॥ अर्थः—लक्ष्मणास आलिंगन दिल्यानंतर कैकयीचें स्मरण करून राम म्हणतात, हे माते कैकेयी, तात दशरथाचा स्नेह, भरताचें माहात्म्य, मारुतीचा पराक्रम, वानराधिराज जो सुग्रीव त्याची मैत्री, लक्ष्मणाची अलौकिक भक्ति, सीतेचें सत्यत्व, स्वतःचें बाहुबल आणि शत्रूचें वैर या सर्व गोष्टींची आज परीक्षा झाली, हा तुझ्या चरणांचा प्रसाद होय. ॥ **आर्या** ॥ ऐसेंवदूनिश्रीमद्रःमानेंलक्ष्मणाख्यतनयाचें ॥ अवलोकिलेंमुखांबुज मगकपिचें अश्रुपूर्णनयनाचें ॥ ५० ॥ तेव्हांरघुवीराला वंदुनिउडेतनूजपवनाचा ॥ झालाअतिथिमुहूर्तीं महौषधीच्याप्रतापभवनाचा ॥ ५१ ॥

उपसंहार.

असो. तात्पर्य, केवढा असंभाव्य उद्योग ? कीं साठ लक्ष योजनें दूर असा द्रोणाचल अत्यल्प कालांत आणून आसन्नमृत्यु जो महावीर लक्ष्मण याचें प्राणसंजीवन करणें,

परंतु त्याविषयीं ज्याच्या मनांत किंकर्तव्यं, कथं कर्तव्यं, या मंत्राचें एकही बिज शिरलें नाहीं. आणि ज्याच्या त्या महोत्सवाच्या पूर्ण सामग्रीमुळेंच मध्यंतरीं आलेली कालनेमिप्रभृति प्रचंड अकाल प्रलयमेघडंबरें क्षणांत विध्वस्त करून एवढा द्रोणागिरि परंतु खऱ्या पत्रद्वयनिर्मित द्रोणाप्रमाणें हातावर घेऊन आणिला आणि इष्टकृत्य ' लक्ष्मण–संजीवन ' सिद्धीस नेलें. त्या महात्म्या अंजनी–नंदनाजवळ पूर्ण भरंशाचें व सर्वानर्थपरंपरानिवारक एक मोठें भांडवल होतें. कोणतें म्हणाल तर, श्रीरामचंद्र प्रभूच्या चरणांचें नित्य स्मरण. तस्मात् श्रीहरीचें सतत स्मरण करणारा जो जीव त्यासही नानाविध अनर्थकारण माया कांहीं एक अनर्थ करीत नाहीं. हा अभिप्राय मनांत आणून रंगनाथ स्वामी पूर्व पदांत म्हणतात ॥ स्मरतां नित्यहरी मगतीमायाकायकरी ॥ हेंचिदान देगादेवा तुझा विसर न व्हावा ॥ आरती० ॥ कायेनवा० ॥ पुंडरीकवरदेहरिविठ्ठल ॥ पार्वतीपते० ॥ जानकीजीवनस्मरण ॥ जयज० ॥ संपूर्ण.

पूर्वरंग.

श्रीमंगलमूर्तयेनमः ॥ अविरलमदजलनिवहमित्यादिनमनम् ॥ नारायणहरि ॥ इतिभजन ॥ पुंडरीकवरदे० ॥ पार्वतीपते० ॥ जानकीजीव० ॥ पद ॥ भावधरारे ॥ आपुलासा देव करारे ॥ ध्रु० ॥ कोणी कांहिं म्हणो यासाठीं ॥ बळकट प्रेम असावें गांठीं ॥ निंदास्तुतिवर लावुनिकांटी ॥ मी तूं हरारे ॥ आपुलासा० ॥ भा० ॥ १ ॥ सकाम साधन सर्वहि सांडा ॥ निष्कामे मूळ भजनीं भांडा ॥ नानाकुतर्कवृत्तीसी दवडा ॥ आली जरारे ॥ आपुला० ॥२॥ दुर्लभनरदेहाचीप्राप्ती ॥ पुन्हा न मिळे हा कल्पांतीं ॥ ऐसा विवेक जाणुनि चित्तीं ॥ गुरूसिवरारे ॥ आ० ॥ ३ ॥ केसरीनाथ गुरूचे पायीं ॥ सृष्टी आज बुडाली पाही ॥ शिवदिनीं निश्चय दुसरा नाहीं ॥ भक्त खरारे ॥ आपुला० ॥ ४ ॥ टाळी महाराज, पुंडली० हरिविठ्ठल ॥ पार्वतीपते हरहरमहादेव ॥ जानकीजीवनस्मरण जयजयराम ॥ येथें ध्रुवपद म्हणावें ॥ भावधरारे ॥ आपुलासा देव करारे ॥ आदौ कीर्तनारंभीं भगवज्जनचूडामणि शिवदिनकवि मुमुक्षुजनांस उपदेश करतात. बाप हो, तुम्ही अदृष्टयोगानें या दुर्लभ व क्षणिक अशा नरदेहास प्राप्त झाला आहां तर पश्वादिकांसारखे विषयभोगांत लंपट न होतां मनुष्यजन्मांत अवश्य संपादनीय जें ईशतत्त्वज्ञान तें संपादन करून सर्वव्यापक जो परमात्मा तो आपलासा करून घ्या. त्यास साधन कोणतें म्हणाल तर (पद) भाव धरारे ॥ आपुलासा देव करारे ॥ १ ॥ प्रभु सच्चिदानंद परमात्मा जो त्याचे ठिकाणीं भाव म्हणजे भक्ति धारण करा. म्हणजे तो सहज आपलासा होईल. आणि भक्तीशिवाय इतर साधनें पुष्कळ केलीं तरी प्रभु वश होत नाहीं. याविषयीं कवि म्हणतात— ' शत पथ आहेत परी योग्य पथ नसेचि या पथा परिस. " याप्रमाणेंच भगवान् श्रीकृष्ण उद्धवास सांगतात. ॥ श्लोक ॥ नसाधयतिमांयोगोनसांख्यंधर्मउद्धव ॥ नस्वाध्यायस्तपस्त्यागोयथाभक्तिर्ममोर्जिता ॥ १ ॥ अर्थ ॥ हे उद्धवा, योगः ' योगश्चित्तवृत्तिनिरोधः ' चेत्तवृत्तिरोध' यास योग म्हणतात. तो योग, मां न साधयति म्हणजे मला वश करीत नाहीं. तसेंच ' सांख्यंनाम प्रकृतिपुरुषविचारात्मकं शास्त्रं. ' सांख्य शास्त्राचें अध्ययन

केल्यानेंही मी वश होत नाहीं. याचप्रमाणें धर्म म्हणजे वर्णाश्रमविहित वेदोक्त आचरण. तसाच स्वाध्याय म्हणजे वेदाध्ययन यानेंही. वश होत नाहीं. त्याचप्रमाणें तप आणि त्याग (संन्यासही) मला वश करण्यास समर्थ नाहीं. तर ' यथा भक्तिर्ममोर्जिता ' जशी माझी प्रेमलक्षणा वृद्धिंगत झालेली भक्ति मला वश करिते, त्याप्रमाणें मी कशानेंही वश होत नाहीं. हाच अभिप्राय मनांत ठेवून शिवदिन कवि म्हणतात. भाव धरारे० ॥ आतां ईश्वरभक्ति करण्याला प्रतिबंधक ही लोकेषणा आहे. तीविषयीं प्रथमचरणांत कवि सांगतात—' कोणी कांहिं म्हणो० ' अशाविषयीं कवीची एक उक्ति आहे ती अशी:— **आर्या** ॥ मंदा विदधतु निंद्यं निपुणो हरिपादसेवनं तनुते ॥ मंडूकेषुरटत्स्वपि मधुपो मकरंद-सेवनं कुरुते ॥ १ ॥ **अर्थ**—मूर्खलोक निंदा करोत परंतु बुद्धिमान मनुष्य हरिचरणाचें सेवनच करितो, तें सोडीत नाहीं, यास दृष्टांत—मंडुक (बेडुक) ओरडत असतांनादेखील त्यांची भीति मनांत न आणतां भ्रमर कमलांतिल मकरंदच सेवन करितो. आणि ते मंडुक चिखलच खातात. तद्वत् या हरिभजनासाठीं कोणी कांहीं म्हणो परंतु आपलें भगवंताचे ठिकाणीं दृढ प्रेम असावें. तें कोणाच्या निंदेनें न्यून किंवा कोणाच्या स्तुतीनें अधिक न होतां स्वाभाविकच ईश्वराचे ठिकाणीं वृद्धिंगत होत असावें. म्हणजे त्या योगानें ईश्वर आपलासा होतो. म्हणून शिवदिन कवि म्हणतात—भाव धरारे ॥ आपुलासा देव करारे ॥ आतां ईश्वराचे ठिकाणीं भाव ठेवून पुनःपुन्हां ह्या विषयमृगजलांत मन सक्त न होईल असें करा म्हणजे निष्कामत्वानें भजन करा. हा आशय दुसरे चरणांत कवि सांगतात. नाहींपेक्षां असा प्रकार होईल. सुभाषितकार म्हणतात. ॥ **श्लोक** ॥ मोक्षदंहरिमाराध्यविषयान्य: समीहते ॥ सरत्नाकरमाश्रित्य संचिनोति कपर्दकान् ॥ १ ॥ **अर्थ**—मोठमोठ्या योगी जनांना जो दुराराध्य म्हणजे आराधन होण्यास कठीण, मोक्षदात्या अशा ईश्वराचें आराधन करून जो विषयसुख संपादन करतो तो मनुष्य नानाविध रत्नांची खाण जो समुद्र ज्यास रत्नाकर म्हणतात त्याचा आश्रय करून कपर्दक म्हणजे कवड्या सांचवून ठेवतो. अशाविषयीं एका प्राकृत कवीचें म्हणणें आहे. ॥ श्लोक ॥ लक्ष्मीकांत अनंत हस्तकमलीं देतां न मागे कदा, मागे स्वल्प तयासि कल्पतरु दे संतुष्ट भावें सदा ॥ निष्कामें भजतां समर्पण करी मोक्षादिका संपदा, ऐसा स्वामि असोनि क्षुल्लकपदा कां इच्छिसी दुर्मदा ॥ २ ॥ तात्पर्य—हा प्रभु भजकांच्या इच्छा सर्व पूर्ण करितो; परंतु भक्तांनीं सकामपणानें भजन कधींहीं करूं नये. कारण कामानुरूप उपाधि असून केलेलें भजन हें व्यापारासारखें होतें; त्यांत ईश्वरनिष्ठा, निर्मल प्रेमाचें अस्तित्व फारच दुर्लभ. याकरितां ईश्वराचे भजन निष्कामपणानें करा. आणि सर्व कुतर्क सोडून आयुष्य क्षणभंगुर आहे, जरा निकट आली आहे हा विचार मनांत ठेऊन एकनिष्ठ भावानें देव आपल्या स्वाधीन करून द्या. ॥ भाव धरारे ॥ आपु० ॥ ध्रु० ॥ याप्रमाणें ईश्वरभक्ति एका या नृदेहांतच होणारी आहे. आणि हा देह तर एकदां गेला म्हणजे पुनः मिळण्याचें कठिण. याविषयीं पुष्कळ कवींनीं वर्णन केलें आहे. त्यांत वासिष्ठांत रामचंद्राची उक्ति आहे, " तडित्सु शरदभ्रेषु गंधर्वनगरेषु च ॥ स्थैर्यं येन विनिर्णीतं स विश्वासितु विग्रहे ॥ " अर्थ—विद्युल्लतांचे ठिकाणीं, शरदृतूंतील अभ्रांचे ठिकाणीं आणि गंधर्वनगरांचे ठिकाणीं ज्या मनुष्यानें स्थिरत्वाचा निश्चय केला असेल त्यानें या देहावर

स्थिरत्वाचा विश्वास ठेवावा. तात्पर्य—विद्युल्लतादिकांप्रमाणें हा देह क्षणभंगुर आहे, असें जाणून सद्गुरूस शरण जा, आणि त्याच्या उपदेशानें ईश्वरतत्त्व समजून घेऊन त्याचे ठिकाणीं—भाव धरावे ॥ आपुलासा देव करारे ॥ध्रु०॥ भजन ॥ राधाकृष्णजयकुंजविहारी ॥ मुरलीधर गोवर्धनधारी ॥ टाळी महाराज ॥ पुंडलीक वरदे हरिविठ्ठल ॥ पार्वतीपते हरहर महादेव ॥ जानकीजीवन स्मरण जयजयराम ॥ आतां असा पूर्ण भाव ठेवून ईश्वराला कोणीं स्वाधीन केलें व तो ईश्वर त्यांस संकटसमयीं कसा साह्य झाला अशाविषयीं द्रौपदी-स्वयंवराख्यान कवि निरूपण करितात.

द्रौपद्रीस्वयंवरआख्यान.

भारत ॥ **श्लोक** ॥ अस्माकमनुरूपोवैयःस्याद्गंधर्ववेदवित् ॥ पुरोहितस्तमाचक्ष्व सर्वंहि विदितं तव ॥ १ ॥ **अर्थ** ॥ पांडव लाक्षागृहांतून मुक्त होऊन चित्ररथगंधर्वास भेटले त्या कालीं त्यास विचरतात, हे गंधर्वा, आम्हांस योग्य वेदवेत्ता असा कोणी पुरोहित असेल तर सांग, कारण तुला सर्व विदित आहे. ॥ १ ॥ **गंधर्वउवाच** ॥ यवीयान् देवलस्यैष वने भ्राता तपस्यति ॥ धौम्य उत्कोचके तीर्थे तं वृणुध्वं यदृच्छया ॥ **अर्थ**—गंधर्व म्हणतो, देवलऋषीचा कनिष्ठ बंधु धौम्यऋषि हा उत्कोचकनामक तीर्थाचे ठिकाणीं तपश्चर्या करीत आहे. तर तुम्ही स्वाभाविकपणें तिकडे जाऊन त्यास उपाध्यायत्व द्या ॥ २ ॥ **साकी** ॥ मग उत्कोचक तीर्थीं जाउनि पांडव धौम्यावरती ॥ पुरोहिताशीं घेउनियां मग द्रुपदपुरा अनुसरती ॥ **अभंग** ॥ मार्गीं जातां जातां भेटती ब्राह्मण ॥ तयासी ते सूज्ञ पुसताती ॥ १ ॥ कोठूनियां आलां कोणाकडे जातां ॥ आम्हांसी वाटतां देवांपरी ॥२॥४॥ भा० ॥ **श्लोक** ॥ **धर्मउवाच** ॥ आगतानेकचक्रायाः सोदर्यानिकचारिणः ॥ भवंतोवैविजानंतुसहमात्राद्विजर्षभाः ॥ ९ ॥ अर्थ—धर्मराज म्हणतात, अहो श्रेष्ठ विप्रहो, आम्ही पांच बंधु मातुश्रीसह पदचारी असून एकचक्रानगरींतून आलों आहोंत, असें आपण जाणावें. ॥ ९ ॥ **पद** ॥ द्रुपद-पुराप्रतिजाऊं ॥ तेथेंमहोत्सवपाहूं ॥ ध्रु० ॥ सुकुमारसांवळीद्रुपददुहिता ॥ पाहुनिदृक्सुखघेऊं ॥ १ ॥ वाटतें आम्हांवरिलतुम्हांसी ॥ आम्हीबहुधनलाहूं ॥ २ ॥ वधुवरदेखुनिसंतोषपावुनि ॥ आशीर्वादहृदिदेऊं ॥ ३ ॥ भा० **श्लोक** ॥ यज्ञसेनस्य कामस्तुपांडव्यकिरीटिने ॥ कृष्णांदद्यामितिसदानचैतद्विवृणोतिसः ॥ ६ ॥ अर्थ—ब्राह्मण सांगतात,—द्रुपदराजाची इच्छा अशी आहे कीं, पंडुपुत्र जो अर्जुन त्यास कृष्णा (द्रौपदी) द्यावी. परंतु ही गोष्ट तो उघड दर्शवीत नाहीं. ॥ **दिंडी** ॥ मनीं ऐसें आणुनिद्रुपदराजा ॥ सशरचापहिठेवितोयाचिकाजा ॥ मत्स्ययंत्रानभेदकरीलबाणीं ॥ तयावीराचीहोयसुताराणी ॥ ८ ॥ **आर्या** ॥ गेलेधन्यकरायापंडुचेनंदनद्रुपदराजा ॥ तोगुरुहिजायसमुचितपसरायानंदनद्रुपदराजा ॥ ९ ॥ **भारतचंपु** ॥ भूदेवस्वतिनिबिडेषु मध्यभाजां पंचानामपि युगपत्पृथासुतानाम् पुस्फोरद्रुपदपुरंपुरःप्रवेशे वक्त्राब्जेसरभसमक्षि दक्षिणंच ॥ १० ॥ अर्थ—अतिशय दाटीनें चाललेल्या ब्राह्मणसमूहांत मध्यभागीं असलेल्या पांडवांच्या समीप प्रदेशाचे ठायीं द्रुपदपुर स्फुरण पावलें (प्रकाशमान झालें)

आणि मुखकमकाचे ठिकाणीं वेगानें दक्षिणनेत्रही स्फुरण पावले ॥ तात्पर्य-द्रुपदनगराजवळ जातांच पांडवांना शुभ शकुन झांले ॥ १० ॥ आर्या—राजसुतांसि रहाया त्या द्रुपदपुरीं कुलाल देशाला ॥ कालगति पहा बुधहो वा एखादे भुलाल देशाला ॥ ११ ॥ मिरवायासिनउरला स्वमहत्त्वाचाकुलालवसतींत ॥ रत्नगृहोचितपृथ्वीपतिसुतवसलेकुलालवसतींत ॥ १२ ॥ भारतचंपू ॥ कुमारिकाया द्रुपदस्य भूपतेः कुचोपमद्रव्यमिवाभिवीक्षितुम् ॥ कुरूद्वहास्तस्यपुरे कुतूहलात्कुलालगेहं प्रथमं समाविशन् ॥ १३ ॥ अर्थ—द्रुपद राजाच्या कन्येच्या (द्रौपदीच्या) कुचांस ज्याची उपमा देतात तें द्रव्य (कुंभ) पाहण्याकरितांच कीं काय ते पांडव द्रुपदनगरींत प्रथम कुंभाराच्या घरीं गेले. ॥ १३ ॥ आर्या ॥ सेवुनिभिक्षान्नसुखें रतहोतेदेवविप्रभजनांत ॥ कोणींहिनओळखिले कींतेदाटूनिविप्रभजनांत ॥ १४ ॥ वरबुद्धिअर्जुनींच स्थिरहोतीसर्वदापरिपुराजे ॥ आलेतेआदरिले द्रुपदें पहिलेजरीस्वरिपुराजे ॥ १५ ॥ सर्व मिळाले रंगीं विप्र नृपांहीं सुमंच शोभविले ॥ रंगींते लोकतसे कमलवनीं जेंविभृंग लोभविले ॥ १६ ॥ भा० चं० ॥ तदनुपरितःकीर्णैःपुष्पैस्तरंगितसौरभं मणिमयमहामंचारूढावनींद्रपरंपरं ॥ अगरुजनितैर्धूपैरालिह्यनानाबितानकंस्वनितपटहंप्रापुः पार्थाःस्वयंवरमंडपम् ॥ १७ ॥ अर्थ ॥ तदनंतर पांडव स्वयंवरमंडपास जाते जाहले. तो स्वयंवरमंडप कसा आहे, तर 'परितःकीर्णैःपुष्पैः तरंगितसौरभं' म्हणजे चोहींकडे पसरलेल्या पुष्पांनीं ज्या स्वयंवरमंडपांत सुगंध भरला आहे. तसेंच मणि(रत्न) मय महासिंहासनावर ज्या ठिकाणीं राजसमूह बसले आहेत आणि कृष्णागरूपासून उत्पन्न झालेल्या धूपांनीं जेथील वितानें (छतें) स्पर्शिलीं जात आहेत व जेथें पटहनामक वाद्य वाजत आहे अशा त्या मंडपांत पांडव गेले. ॥ १७ ॥ ओंव्या ॥ कुंती कुलालशाळेंत ठेवून ॥ सभेंत पातले पांचहीजण ॥ वेष पालटून पंडुनंदन ॥ विप्रसभेंत बैसले ॥ १८ ॥ मनांत भाविती पांडव ॥ आजि शल्य आणि कौरव ॥ त्यांचे झाडूनियां गर्व ॥ निस्तेज करूं निर्धारें ॥ १९ ॥ पांडवीं वल्कलें वेष्टून ॥ केलें असे भस्मोद्धूलन ॥ परी ते दिव्यस्वरूपें पूर्ण ॥ पंचादित्यजैसेकां ॥ २० ॥ भा० चं० ॥ इदं धनुर्लक्ष्यमिमेच बाणाः शृण्वंतुमे भूपतयः सुमंतः ॥ छिद्रेण यंत्रस्य समर्पयध्वं शरैः शितैर्व्योमचरैर्दृशार्धैः ॥ २१ ॥ एतन्महत्कर्मकरोतियोवैकुलेनुरूपेणबलेनयुक्तः ॥ तस्याद्यभार्या भगिनी समेयं कृष्णाभवित्रीनमृषा ब्रवीमि ॥ २२ ॥ तेऽलकृताः कुंडलिनो युवानः परस्परं स्पर्धमाना नरेंद्राः ॥ अस्त्रं बलं चात्मनिमन्यमानाः सर्वे समुत्पेतुरुदायुधास्ते ॥ २३ ॥ अर्थ--स्वयंवरमंडपांत सर्व राजे जमले असतां धृष्टद्युम्न सर्वांस पाहून म्हणतो, हें धनुष्य, हें लक्ष्य, हे बाण, हे सामंत भूपालहो, सर्वांनीं ऐकावें. या यंत्राच्या छिद्राच्या मार्गानें आकाशगामी अशा पांच तीक्ष्ण बाणांनीं या लक्ष्याचा (मत्स्याचा) भेद करा. ॥ २१ ॥ कुलीन, रूपवान्, बलवान् असा जो मनुष्य हें महत्कर्म करील, त्याची ही माझी भगिनी, भार्या होईल. हें मी मिथ्या बोलत नाहीं. ॥ २२ ॥ नंतर ते अलंकार घातलेले व कुंडलें धारण करणारे तरुण अस्त्रांमुळें परस्परांशीं स्पर्धा करणारे सर्व राजे लोक आपआपले ठिकाणीं अस्त्रविद्या व पराक्रम यांचा अभिमान धरून आणि आयुधें उचलून उभे राहिले. ॥ २३ ॥ आर्या ॥ रंगीं धृष्टद्युम्नें धरुनि करीं आणिली स्वभा रमणी ॥ जणों भुजगें प्रेक्षकजननयनमनोहर स्वसारमणी ॥ २४ ॥ करीं वळविला अजें जें विष्णुधृतस्त्री स्व-

रूप कित्तातें ॥ चित्र तसेंचि उतरिलें चतुरें वाटे कवींद्रचित्तातें ॥ २५ ॥ कृष्णेसि म्हणे वत्से दे माला लक्ष्यभेद करि त्यातें ॥ कुलशील रूप सद्गुण असतील स्वानुरूप जरि त्यातें ॥ २६ ॥ हा दुर्योधन नृप हे व्यास रें बंधु जन्मले शतगे ॥ हा कर्ण ज्यापुढें परचापश्रुति कुलशता न लेश तगे ॥ २७ ॥ हा शल्यमद्रपति हा, चेदिप शिशुपाल हा जरासंध ॥ गंधद्विप गंध तसा दुःसह याचाहि शत्रुला गंध ॥ २८ ॥ हे रामकृष्ण यदुपति हे दोघे साधु उद्धवाकूर ॥ गमले रिपु गोपस्त्रीहृदया जे परम शुद्धिवाकूर ॥ २९ ॥ ऐसें सभागतांचें कळवी कुलशील कर्म जन्म तिला ॥ कीं लक्ष्यभेदकरही अकुलज कोणी रुचो न सन्मतिला ॥ ३० ॥ दुर्योधनादिकांची कन्यारत्नींच लागली दृष्टी ॥ वृष्टि जशि चातकाला त्याला तशि ती विरंचिची सृष्टी ॥ ३१ ॥ बलदेवासि म्हणे प्रभु आर्या त्या ब्राह्मणांत तो धर्म ॥ तो भीम तो धनंजय ते यज्ञ म्यां वळखिले नव्हे नर्म ॥ ३२ ॥ ब्राह्मण वेष असूंद्या तेज पहा चातकास दादा ते ॥ घनसे निविविति मज वश झालेचि न घातकां सदा दाते ॥ ३३ ॥ देशोदेशींचे नृप झटले परि परशुरामसें चाप ॥ न ढळे त्वे भुजबळें तत्खंडित बहुत पावले ताप ॥ ३४ ॥ भा० चं० ॥ दमघोषसुतो धीरः शिशुपालो महामतिः ॥ धनुरायच्छामानस्तुजानुभ्यामगमन्महीम् ॥ ३५ ॥ ततोराजामहावीर्य जरासंधो महाबलः ॥ धनुषोभ्याशमागत्य तस्थौगिरिरिवाचलः ॥ ३६ ॥ धनुषापीड्यमानस्तुजानुभ्यामगमन्महीम् ततउत्थाय राजासस्वराष्ट्राण्यभिजग्मिवान् ॥ ३७ ॥ आर्या ॥ चोळुनि करकरकररद खाऊनिदंतओष्ठ मोघ चापलते ॥ हतदर्प भूप म्हणती हंतहताःस्वत्वयाद्यचापलते ॥ ३८ ॥ ॥ ओंवी ॥ तैसा कर्ण बोले तेक्षणीं ॥ द्रौपदी आहे माझीच राणी ॥ पण भेदितों पहा नयनीं ॥ समस्त नृप आतांची ॥ ३९ ॥ आर्या ॥ स्वमनीं पांडव म्हणती हा हा या दुष्कलप्रसूतानें ॥ नेलेंचि लक्ष भेदुनि सहकन्यारत्न यशहि सुतानें ॥ ४० ॥ जों कर्ण म्हणे न शिवों देईन इला दुज्या नवरया मी ॥ तोंचि म्हणे ती कृष्णा सूतमहं जातुचिन्नवरयामि ॥ ४१ ॥ कर्ण सगुण धनु टांकुनि पाहुनि रविला चुरूनि हातांतें ॥ चित्तीं म्हणे कशाला केला निर्माण पुत्र हा तातें ॥ ४२ ॥ दिंडी ॥ सूर्यपुत्रें तैं धनु टाकियेलें ॥ भूप चिंतासागरीं पडीयेले ॥ धृष्टद्युम्नें तातासि कथियेलें ॥ कोणि नाहीं हें लक्ष वेधियेलें ॥ ४३ ॥ पद–॥द्रुपदम्हणे भूमिपाळा ॥ कैसी वरील माझी बाळा ॥ ध्रु० ॥ पाहुनि लक्ष्य उगेंचि बसती ॥ धनुष्य घेउनियां पडती ॥ किती एक देशासी जाती ॥ अंतरीं विचार बहु करिती ॥ होतसे रती प्रतिकूळा ॥ कैसी० ॥ १ ॥ कर्णें धनू सज्य केलें ॥ तयासि बाण योजियेले ॥ मग तें यंत्र मनीं आणिलें ॥ द्रौपदीनें निषेधिलें ॥ सूतपुत्रा दुष्कुळाला ॥ कैसीव० ॥ २ ॥ यादवकृष्णासहीत आले ॥ पणाला नाहीं अनुसरले ॥ इतर स्वरूपीं व्यर्थ भूलले ॥ नवरीविणें श्रमी झाले ॥ जाऊं पाहती देशाला ॥ कैसी वरील माझी बा० ॥ ३ ॥ वदतां ऐसी द्रुपदवाणी ॥ पडली पार्थाचे कर्णीं ॥ झालें दुःख जसें मरणीं ॥ जाळी अग्नि जसा अरणी ॥ आतां सोडी ऋषि माळा ॥ कैसी वरिल० ॥ ४ ॥४४॥ ओंवी ॥ तों विप्रसभेंमधून ॥ उठे तेव्हां अर्जुन ॥ गिरिदरींतून पंचानन ॥ निघे तैसा जाहला तयेवेळीं ॥ ४५ ॥ आर्या ॥ कोणि म्हणति निवारा आम्हां क्षत्रियकृतापहासाचें ॥ पात्रत्व नवें द्याया सुचपळ बहु जोडितो पहा साचें ॥ ४६ ॥ ओंवी ॥ एकला ब्राह्मण परशुधर ॥ निक्षेत्री धरा केली समग्र ॥ कीं बळीचे

द्वारीं वामन विप्र ॥ देंगेंत त्रिभुवन आटिलें ॥ ४७ ॥ आर्या ॥ नमिला आधीं पार्थें विश्वप्रिय सत्पद्मकृत्रिम पिनाकी ॥ म्हणती यद्यश सेवुनि अमृतीं गोडी नसे किमपि नाकीं ॥ ४८ ॥ ओंवी ॥ स्मरूनियां रुक्मिणीरमण ॥ वेगें घेतले धनुष्यबाण ॥ प्रथम शरेंचि यंत्र भेदून ॥ मत्स्यनयन भेदिला ॥४९॥ भारत ॥ यत्पार्थिवै रुक्मिशिनीशवक्रराधेयदुर्योधनशाल्वशल्यैः ॥ तदा धनुर्वेदपरैर्नृसिंहैः कृतंनमज्यं महतोपियत्नात् ॥ ५० ॥ तदर्जुनो वीर्यवतांप्रवर्ग्यस्तदैंद्रिरिंद्रावरजप्रभावः ॥ सज्यंप्रचक्रेंनिमिषांतरेणशरांश्चजग्राहदशार्धसंख्यान् ॥५१॥ अर्थ—रुक्मि, शिनिप्रमुख, कर्ण, दुर्योधन, शाल्व, आणि शल्य, इत्यादि धनुर्वेदांत निष्णात अशा वीरश्रेष्ठांनीं मोठ्या प्रयत्नानें जें सज्यहीं केलें नाहीं ॥ ५० ॥ तें धनुष्य बलवानांत श्रेष्ठ व विष्णूसारखा पराक्रमी अर्जुन एका निमिषाच्या अवकाशांत सज्ज करिता झाला, आणि पांच बाण घेता झाला. ॥ ५१ ॥ आर्या ॥ यंत्रच्छिद्रद्वारें पांचहिशर एकदांचि सोडूनी ॥ पाडी पळांत पृथ्वीवरि पुरुषप्रवर लक्ष्य तोडूनी ॥ ५२ ॥ ओंवी ॥ जाहला एकची विजयकार ॥ विमानींहूनी पुरंदर ॥ वर्षे सुमनसंभार ॥ होय गजर दुंदुभीचा ॥ ५३ ॥ तंव ती द्रौपदी पद्मनयना ॥ करिणीखालीं उतरुनी ॥ पार्थाच्या गळां नेऊनी ॥ दिव्य माळ घाली ती ॥ ५४ ॥

उपसंहार.

असो, याप्रमाणें परमात्मा श्रीकृष्ण जो त्याचे ठिकाणीं अर्जुनप्रभृति पांडवांचा पूर्ण भाव असल्यामुळें तो लाक्षागृहादि संकटकालीं पांडवांस रक्षण करून द्रौपदीच्या स्वयंवरमंडपांतही स्वतः प्राप्त झाला आणि आपल्या सान्निध अर्जुनाचे हातून मत्स्ययंत्र भेदनाचा पण सिद्धीस नेला व सर्व राजमंडळांत त्यास यशस्वी केलें. त्यामुळें द्रौपदीसारखें सुरूप व सुशील भार्यारत्न प्राप्त झालें. तर याचें कारण अर्थात् हेंच कीं, प्रभु श्रीगोपालकृष्ण हा त्यांच्या एकनिष्ठ प्रीतीमुळें अगदीं स्वाधीन झाला होता. यास्तव शिवदिन कवि म्हणतात—तुम्हांला मोक्षादि चतुर्विध पुरुषार्थ संपादन करावे अशी इच्छा असेल तर एवढें करा ॥ भाव धरारे आपुलासा देव करारे ॥ ध्रु० ॥ ॥ हेंचि दान देगा देवा ॥ तु० ॥ आरती० ॥ कायेनवा० ॥ अच्युतं० ॥ हरेराम० ॥ हरेकृष्ण० ॥ पुंडरीग० ॥ पार्वतीपते हर हर महादेव ॥ जानकी जीवनस्मरण जय जय राम ॥ संपूर्ण.

पूर्वरंगनिरूपण.

श्रीमन्महागणाधिपतयेनमः ॥ अविरलमदजलनिवहमित्यादिमंगलाचरणम् ॥ भजनं ॥ रामकृष्ण हरिराम जय हरिरामराम हरिराम ॥ पुंडरीक वरदे हरिविठ्ठल ॥ पार्वतीपते हर हर महादेव ॥ जानकीजीवनस्मरण जयजयराम ॥ दत्तात्रय महाराजकीजय ॥ ॥ पद ॥ गेला मान सांवरील कोण हरिविणें ॥ ध्रु० ॥ भक्तांचा पूर्ण काम, करितां निजमूर्ति राम ॥ पडों नेदी सर्वथा उणें ॥ गेला० ॥ १ ॥ शरण मनोभावें तया हरीलागी जावें ॥ मग कैचें येणें जाणें ॥ गेला० ॥२॥ निजरंगीं रंग जडो कीर्तनही हेंचि घडो ॥ सार्थकता तरिच हें जिणें ॥ गेला मान० ॥ ३ ॥ नंतर ध्रुवपद म्हणावें ॥ पुंडरी० ॥ पार्वती० ॥ जानकीजीवनस्मरण जय जय राम ॥

उपोद्घात.

गेला मान सांवरील कोण हरिविणें ॥ध्रु०॥ आदौ कीर्तनप्रारंभाचे ठायीं सज्जन-शिरोमणि व कविप्रवर रंगनाथ स्वामी हे जीवांस उपदेश करितात कीं, बापहो, तुम्ही सर्व संपत्ति, संतति इत्यादि प्रापंचिक सुखांत रममाण आहां आणि जगांत आपला मान (महत्त्व०) असावा ही तुम्हां सर्वांची इच्छा आहे. त्याप्रमाणें संपादन केलेल्या मानांत न्यूनता अदृष्टयोगानें झाली असतां त्यापासून अंतःकरणास द्रव्यनाशापेक्षांही अधिक दुःख होतें. कारण ' मानोहि महतां धनं ' तर आपला मान अथवा महत्त्व जाऊं नये, किंवा दैवयोगानें कांहीं कारण उत्पन्न होऊन तो जाण्याचा प्रसंग आला तर तो टळून आपलें महत्त्व आपणास चिरकाल रहावें अशी इच्छा असल्यास मनोभावानें ईश्वरास शरण. जा; कारण त्यावांचून गेलेला मान देणारा कोणी नाहीं. गेला मान सावरी० ॥१॥ आतां ज्यांचा मान गेला असेल त्यांणीं ईश्वरास शरण जावें. आमचा जो मान आहे तो आहे. मग आम्ही कांहीं या उपदेशाचे अधिकारी नाहीं, असें म्हणाल तर याविषयीं प्रबोधसुधाकरांत उक्ति आहे ती ऐकिल्यीं म्हणजे आपलें केवढें महत्त्व (मान) होतें आणि आपण सांप्रत कोणत्या स्थितींत आहोंत याचें अनुमान करितां येईल. ती उक्ति ही ॥ श्लोक ॥ असावहंकारपरैर्दुरात्मभिर्निबध्यतैःपाशशतैर्मदादिभिः ॥ चिरंचिदानंदमयोनिरंजनोजगत्प्रभुर्दीनदशामनीयत ॥ १ ॥ अर्थ.—सर्व जगत्प्रकाशक अज्ञानरूप कज्जलाचा स्पर्श ज्यास नाहीं असाही सच्चिदानंदघन हा आत्मा अहंकारप्रमुख जे मद, मत्सर, मोह, हे दुष्ट विकार यांणीं अगदीं दीन दशेस प्राप्त केला आहे. खरेंच, आत्मा सर्वकाळ आनंदस्वरूप असून आम्ही आपले जन्मभर विषयसुखाच्या लेशासाठीं दिगंतास पर्यटन करीत आहों. तसाच आत्मा अजरामर असून आम्हांस यत्किंचित् कारण झालें असतां लागलेंच यमनगरीचें प्रस्थान ठेवावें लागतें. तस्मात् आपलें महत्त्व किती नाहींसें झालें आहे याचा विचार करा. ॥ १ ॥ याचप्रमाणें चंद्रोदयकारांनीं आणखी एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, या जीवांस मायेच्या योगानें आपल्या स्वरूपाचेंही विस्मरण झालें आहे ॥ श्लोक ॥ सततधृतिरप्युच्चैःशांतोप्यवाप्तमहोदयोप्यंतःस्वस्थोप्युदीरितधीरपि ॥ त्यजतिसहजंधैर्यस्त्रीभिःप्रतारितमानसः स्वमपि यदयंमायासंगात्पुमानिह विस्मृतः ॥ १ ॥ अर्थ—हा पुरुष (जीव) सर्वकाळ संतुष्ट, अतिशय शांत, सर्वोपेक्षां उत्कृष्ट, सर्व न्यायास जाणता, अंतःकरणांत सदा स्वस्थ, बुद्धीस प्रेरणा करणारा असाही असून स्त्रियांनीं (मनोवृत्तींनीं) यास फसविल्यामुळें स्वाभाविक धैर्य सोडतो. किंबहुना मायेच्या समागमानें हा जीव आपल्या स्वरूपासही विसरला आहे. ॥ १ ॥ तस्मात् असें शांत नित्यानंदघन आपलें निरुपाधि स्वरूप असून आपण तुच्छ विषयसुखाच्या लेशाकरितांही दीनत्वाणें होऊन दारोदार लागत आहों. यावरून आपलें महत्त्व किती गेलें याचा विचार प्रत्येकाच्या मनांत येईल, तर हा जो मान गेला आहे तो परमात्म्याची कृपा झाल्यावांचून पुनः प्राप्त होणार नाहीं. हा आशय मनांत आणून रंगनाथ स्वामी म्हणतात—गेला मान सांवरिल० ॥ आतां हा श्रीहरि आपल्या अनन्य भक्तांचे सर्व काम पूर्ण करितो याविषयीं महा भागवत जो प्रल्हाद याची श्रीमद्भागवतांत उक्ति आहे ॥ श्लोक ॥ तुष्टे च तत्र किमलयमनंत आद्ये किं नैर्गुण्यव्यतिकरादिह ये

स्वसिद्धाः ॥ धर्मादयः किमगुणे नच कांक्षितेन सारं जुषां चरणयोरुपगायतां नः ॥ १ ॥ अर्थ– प्रल्हाद म्हणतात हे दैत्यबालकांनो, तो अनंत आणि सर्वादि असा परमात्मा श्रीहरि संतुष्ट झाला असतां कोणता पदार्थ अलभ्य आहे ? तर सर्व कांहीं प्राप्त होतें. परंतु श्रीहरीस प्रसन्न करून मागण्यासारखें कांहीं नाहीं. कोणी म्हणेल धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत आणि हे पुरुषांना अवश्य संपादनीय आहेत, मग हेच श्रीहरीस मागून घ्यावे. तर याविषयीं प्रल्हाद म्हणतात कैतै० ॥ धर्मादिक पुरुषार्थ हे सत्वादि गुणांच्या संबंधानें आपले आपणच सिद्ध होतात. म्हणजे जेव्हां बुद्धीचे ठायीं सत्वगुणाचा उत्कर्ष होतो त्या वेळेस धर्मवृत्ति उदय पावते. ज्यावेळेस रज आणि तम या गुणांचा उदय होतो तेव्हां अर्थकामविषयक वृत्तींचा उद्भव होतो. याप्रमाणें गुणसंबंधानें स्वतःसिद्ध जे धर्म, अर्थ व काम यांचें काय प्रयोजन आहे ? आतां मोक्षाची इच्छा करावी तर भगवच्चरणांचे ठिकाणीं निरंतर रममाण असून त्यांतील सार सेवन करणारे व त्यांचेंच सतत गान करणारे अशा आम्हां प्रेमभक्तिरसिकांस गुणरहित जो मोक्ष त्याची इच्छा करून तरी काय फळ ? तात्पर्य—खरे हरिभक्त ते भगवद्भजनानेंच पूर्णकाम होतात. कारण श्रीहरि त्यांस कांहीं उणें पडूं देत नाहीं. म्हणून म्हणतात. भक्तांचा पूर्ण काम० ॥ पडों नेदी सर्वथा०-॥ आतां दुसरे चरणांत त्यालाच अनन्य शरण जावें असें सांगतात ॥ शरणमनो०॥ याचप्रमाणें प्रल्हादाची उक्ति आहे ॥ **श्लोक** ॥ अधोक्षजालंभमिहाशुभात्मनः शरीरिणः संसृतिचक्रशातनं ॥ तद्ब्रह्म निर्वाणसुखं विदुर्बुधास्ततो भजध्वं हृदये हृदीश्वरं ॥ १ ॥ **अर्थ** ॥ ह्या नृजन्मांत येऊन अधोक्षज म्हणजे (अधःअक्षजं यस्मादित्यधोक्षजः) इंद्रियजन्य ज्ञान ज्यापासून खालीं आहे अर्थात्, 'यतो वाचो निवर्तंते,' इत्यादि श्रुतिप्रतिपादित जो सर्वेंद्रियांस अगोचर परमात्मा त्याची प्राप्ति करून घेणें हेंच या मानवदेहधारी दुःखी जीवास जन्ममरणरूप संसारचक्राचा नाश करणारें मुख्य साधन आहे. व तेंच ब्रह्मसुख आणि मोक्षसुखही होय. असें ज्ञाते म्हणतात. यास्तव बापहो, आपल्या हृदयाचे ठिकाणीं बुद्धिनियंता जो परमेश्वर त्यासच भजा. ॥ १ ॥ तात्पर्य, अनंतावधि योनींत जन्म घेऊन या भवप्रवाहांत अनादिकाळापासून आजपर्यंत भ्रमण करीत आपण आलों आहों, आणि आपलें सर्वाधिक महत्त्व नाहींसें झालें आहे. तर ती जन्ममरणपरंपरा चुकवून आपलें निरतिशय महत्त्व किंवा मान आपल्यास प्राप्त व्हावा अशी इच्छा असल्यास त्या श्रीहरीलाच अनन्य भावानें शरण जा. कारण त्याजवांचून आपलें नाहींसें झालेलें महत्त्व कोणी देणारा नाहीं. असा आशय मनांत आणून रंगनाथ स्वामी म्हणतात, गेला मान सांवरील कोण हरिविणें० ॥ ध्रु० ॥ आतां परमात्म्यानें महासंकटसमयांत कोणाचा मान राखिला अशाविषयीं कवि हरिश्चंद्रसत्वाख्यान निरूपण करितात.

हरिश्चंद्रसत्वाख्यान.

आर्या ॥ श्रीमान् गुणरत्नाकर भूपहरिश्चंद्र भानुचे वंशीं ॥ ज्याची कीर्ति सुरनदिहुनि एकीही उणी नसे अंशीं ॥ १ ॥ साकी ॥ एक समें श्रीविधिसुत नारद अयोध्यापुरमो

आया ॥ निरखिभूपकी भाग बढाई अतिसुख मनमो पाया ॥ २ ॥ दिंडी ॥ जाउनीयां सन्मुख तये वेळे वरासनीं आणूनि पूजियलें ॥ रायें प्रेमें सत्कार बहु केला ॥ मुनी तुष्ट होऊनि नभीं गेला ॥ ३ ॥ आर्या ॥ तो मग सुरराजर्षि बसले असतां सभेंत देवर्षी ॥ कथि तें परिसुनि त्यातें डोलवि माथा वसिष्ठ बहुवर्षी ॥ ४ ॥ ओंवी ॥ ऐकुनि नारदवचनातें ॥ गाधिजहृदयीं क्रोधाग्नि चेते ॥ वरी वसिष्ठवाक्याचेनि वृतें ॥ शिखा नभातें कळविती ॥ ५ ॥ साकी ॥ येरु म्हणे त्वां नष्टसत्व रे करितां त्या नृपनाथा ॥ पूर्वज निरयीं पचूनि माझे पापें अगणित माथां ॥ कौशिक बोले वर्तमान हें न करीं श्रुत रायासी ॥ बरें म्हणूनी वसिष्ठ गेला भूपयशार्थ तपासी ॥ ७ ॥ इकडे विश्वामित्र अयोध्ये निकटीं सत्वर आला ॥ अनुष्ठान तें क्रूर करूनि माया रचिता झाला ॥ ८ ॥ ओंवी ॥ हरिश्चंद्राचिये राष्ट्रीं ॥ व्याघ्र सोडिले अकरा कोटी ॥ तेव्हां प्रजा होऊनि हिंपुटी ॥ पीडित झाल्या अतिशयें ॥ ९ ॥ आर्या ॥ ग्रामकपाटें लावुनि बसती पशु नर गृहांत उपवासी ॥ कळविति नृपा महाजन वृत्त तदा जे सदा नगरवासी ॥ १० ॥ ओंवी ॥ राजा म्हणे प्रजा पीडिती ॥ मग मी कासया नृपती ॥ लेकराऐशाप्रीती ॥ प्रजा निश्चयें प्राळीन मी ॥ ११ ॥ श्लोक ॥ तदा गाधिजें स्वाश्रमा भूप यावा ॥ म्हणूनि त्वरें योजिला थोर कावा ॥ सुवर्णापरी अंगदीप्ती सुरंगा ॥ अशा निर्मुनी पाठवीलें कुरंगा ॥ १२ ॥ आर्या ॥ तों सम्राट् शूर वनीं गेला कुतुकें करावया मृगया ॥ दैवें व्यसन भरीं मन भरतां ओढूनि दूर ने मृग या ॥ १३ ॥ ऐके त्रायस्व असा तरुण स्त्री शब्द तो अरण्यांत ॥ हरिणातें त्यजुनि म्हणे माभैषीः ख्यात जो शरण्यांत ॥ १४ ॥ तोंचि त्रायस्व असा विद्यांच्या ऐकतांचि हांकेला ॥ धांवें विघ्नेश म्हणे या गाधिसुतें अनर्थ हा केला ॥ ॥ १५ ॥ भूप म्हणे स्त्रीपीडक माझे राज्यांत खळ असा कोण ॥ निबिड तमाचा आश्रय शून्यांतर वास्तुचा जसा कोण ॥ १६ ॥ दिंडी ॥ विश्वामित्रें देउळा तये क्षणीं ॥ शीकवूनि धाडिल्या मातंगीणी ॥ अप्सरांची लावण्यगुणें तैशा त्यांणिं ॥ केलें प्रसन्न नराधीशा ॥ १७ ॥ वरंब्रूहि ऐकतां म्हणति राया ॥ वरी आम्हां त्यागुनी पट्टजाया ॥ ऐकतां हे तन्मंत्री पिटिति त्यांसी ॥ येउनी त्या सांगती मुनीपाशीं ॥ १८ ॥ ॥ ओंवी ॥ ऋषी क्षोभुनि आला देउळा ॥ म्हणे राज्य मदें तूं नृपाळा ॥ मम दासींचा अपमान केला ॥ आणि श्वापदें वधियेलीं ॥ १९ ॥ आर्या ॥ श्रीविश्वामित्रातें विनवी जोडुनि कर कसें राजा ॥ स्वामी अपराध नव्हे वेदगुरुप्रोक्तधर्म हा राजा ॥ २० ॥ ओंवी ॥ राव परम चिंताक्रांत ॥ निद्रा करी एक मुहूर्त ॥ तारामती मांडी देत ॥ उसा रायासी तेधवां ॥ २१ ॥ तेव्हां रायें देखिलें स्वप्न ॥ एक तपस्वी आला ब्राह्मण ॥ तयाचे चरण धुवून ॥ राज्यदान दिधलें ॥ २२ ॥ ब्राह्मण म्हणे तेच क्षणीं ॥ अंकुश मुद्रिका लगाम लेखणी ॥ राया दे मजलागुनी ॥ रायें ते क्षणीं दीधलीं ॥२३॥ सर्वेंचि नृप झाला जागृत ॥ तारामतीतें स्वप्न सांगत ॥ तों आणीक वेष पालटुनि त्वरित ॥ विश्वामित्र पातला ॥ २४ ॥ ॥ दिंडी ॥ म्हणे राया तूं नाथ अनाथांचा ॥ पांग फेडी मज दुबळियाचा ॥ औटभार हेम तें मला द्यावे ॥ राव बोले देईन गृहा यावें ॥ २५ ॥ वदुनियां यापरी सर्वे त्यासी ॥ भूप आला घेऊनि मंदिरासी ॥ प्रवेशतां अंतरीं भूपतीसी ॥ राणि विनवी अर्पिजे उदकासीं ॥ २६ ॥ छंद ॥ स्वाग्नि मागती दान तूजसी ॥ अखिल राज्य त्वां अर्पिलें मसीं ॥

कायरे तुझें मेदिनी वरी ॥ राहिलें असे पाहिं अंतरीं ॥ २७ ॥ **साकी** ॥ द्विज तंव क्रोधें बोले दक्षिणा देईं राया त्वरित ॥ म्हणवुनि दंडें ताडन करितां नृपसुत चरण धरित ॥ २८ ॥ छंद ॥ द्विज तदा म्हणे कोण कारटें ॥ पातलें मधें ताडि त्या हटें ॥ भूपती म्हणे मत्सुता पहा ॥ द्विज वदे पुढें शत्रु जाण हा ॥२९॥ **साकी** ॥ दिलहें पित्यानें राज्य तुम्हांला घेइन मी द्विजराया ॥ विप्र म्हणे जा तिघे दक्षिणा फेडा हो लवलाह्या ॥ ३० ॥ ॥ **श्लोक** ॥ नृपालागीं तेव्हां वदत मुनि तो क्रोध वचनीं ॥ न राहें या देशीं निकट अथवा जाण विपिनीं ॥ तदा राजा बोले नवशकल धात्रीहि परती ॥ असे काशी तेथें चलुनि ऋण फेडीन निगुती ॥ ३१ ॥ **आर्या** ॥ घे वल्कलें वपुवरुनि तो नृपवस्त्रें विभूषणें उतरी ॥ कीं निस्पृहंताचि हिता काळीं विपमीं नदी जशी सुतरी ॥ ३२ ॥ **दिंडी** ॥ तिघें तेव्हां चालतां घोर पंथीं ॥ सकुमारा करपूनि गेली कांती ॥ कडे पुत्र घेउनि राज्ञि आंगें ॥ हळूहळू जातसे नृपा मागें ॥ ३३ ॥ **ओंवी** ॥ रोहिदास तेधवां म्हणे ताता ॥ तृषेनें गा चालिला प्राण आतां ॥ मग कडेहूनि पडुनि खालतां ॥ लोळे गडबडा रडुनियां ॥ ३४ ॥ **गीत** ॥ उष्णें पोळुनियां प्रबळ ॥ कोमाइलें श्री मुखकमळ ॥ कटीं खरसी दाटुनि विकळ ॥ झाली तनु भारी ॥ १ ॥ तेव्हां माता धरूनि पोटीं ॥ कुरवाळी मुख करसंपुटीं ॥ म्हणे बाळा उघडुनि दृष्टी ॥ मजकडे पाहे ॥ २ ॥ राजा धुंडी जळ कांतारीं ॥ तडागसरिता सरोवरी॥ विंदुमात्रही न दिसे वारी ॥ परतुनि ये कष्टी ॥ ३ ॥ कवळुनि स्नेहें बालकासी ॥ वारा घालिती पल्लवेसीं ॥ रडंती देखुनियां त्यासी ॥ दुःखी पशुपक्षी ॥ ४ ॥ ३५ ॥ **साकी** ॥ वणवा येऊनि अंगीं झोंवतां बालक मातेकंठीं ॥ मिठी घालुनी रडतां जननी धरि त्या कवळूनि पोटीं ॥ ३६ ॥ भूप म्हणे मग मरण तिघांही आलें निश्चय आतां ॥ विप्रऋणाचें मोचन नोहे वसलें दृढतर माथां ॥३७॥ बालक कडिये घेउनियां मग भूपति अग्रीं जात॥ भांडरानिं ते एकट राज्ञी चुकलीच अरण्यांत ॥ ३८ ॥ **ओंवी** ॥ सवोंवतीं पाहे घाबरूनी ॥ म्हणे पनि पुत्र गेले जळूनी ॥ आतां काय मी वांचूनी ॥ दे बा वन्हे ठाव पोटीं ॥ ३९ ॥ म्हणे तान्हया रोहिदासा ॥ कोठें चुकलासी गा राजसा ॥ हे प्राणपते रविवंशावतंसा ॥ कांहो मजशीं उपेक्षिलें ॥ ४० ॥ **आर्या** ॥ ऐसा विलाप करुनी द्याया स्वप्राण होय सिद्ध सती ॥ धर्मशिळेवरि प्रार्थुनी जाया अनलीं उभी प्रसिद्ध सती ॥ ४१ ॥ ऐसें देखुनि मुनिनें वैश्वानर शुद्ध शांत तो केला ॥ वृद्धब्राह्मणवेषें सतिसन्मुख येउनी उभा ठेला ॥ ४२ ॥ **दिंडी** ॥ अहो मजला टाकूनी कुठें गेलां ॥ पितापुत्र तुम्हि एकमती झालां ॥ उदक नाहीं दिधलें रोहिदासा ॥ म्हणूनियां रुसलास बा उदासा ॥ ४३ ॥ **ओंवी** ॥ ऐसा विलाप करितां सती ॥ अस्तमाना गेला गभस्ती ॥ ऋषी म्हणे वृथा शोक किती ॥ करिसी चाल ममगृहीं ॥ ४४ ॥ पतीसवें अग्नि घेईन ॥ येरू म्हणे तुझे पतीस ऋण ॥ आहे म्हणून केलें श्रवण ॥ फेडिल्यावीण गती नाहीं ॥४५॥ सती तळमळूनी तयेवेळे ॥ अकस्मात उघडी डोळे ॥ तों हरिश्चंद्र रोहिदास आले ॥ त्याच वाटे तात्काळीं ॥ ४६ ॥**पद**॥ चरण चालिचालतां तिघें तीं काशीं क्षेत्रीं आलीं ॥ श्रीविश्वेश्वर बिंदुमाधवा चरणाप्रति लागलीं ॥ भागिरथीचें स्नान करुनिया शुद्ध वपु जाहली ॥ विश्वामित्रें त्वरा करुनियां धांव तेथें घेतली ॥ चाल ॥ मग रायाप्रति तो म्हणे ॥ हिंडावें किती ब्राह्मणें ॥ कासया द्यावें दक्षिणें ॥ मर्यादेचा दिवस आज मम द्रव्य अखिल दे मणें ॥ सत्वशील हरिश्चंद्र सतीसह जगीं

धन्य जाहला ॥१॥ ४७ ॥ आर्या ॥ भूप म्हणे द्विजवर्या भरला कृतपूर्ण वायदा साचा ॥ आजी सूर्यास्तवरी नाहीं विश्वास काय दासाचा ॥ ४८ ॥ गाधिज म्हणे बहू बरें जातों येतों फिरोनि आजि मला ॥ देतां न दक्षिणा तूं शापिन मग मी नृपा नव्हेंचि भला ॥ ४९ ॥ १ ॥ भाग ॥ आर्या ॥ मुनि कोपूनि म्हणेरे दे माझी दक्षिणा अगा राया ॥ रक्षीं सत्या सद्गति सत्कीर्ति सुखाचिया अगारा या ॥ १ ॥ दिंडी ॥ नृपाहस्तीं मुद्रिका त्रिशंकूची ॥ विकूनी ती घे तृण पेंढि त्याची ॥ हाटवाटीं बांधि घे तृण माथां ॥ राव बोले आमुते घ्याचि आतां ॥ २ ॥ सभोंवते पावले लोक पाहीं ॥ विलोकाया कौतुक तये ठायीं ॥ राज्ञि बोले रायासि तेधवां ते ॥ विका आधीं निजकरें स्वयें मातें ॥ ३ ॥ आर्या ॥ भूप म्हणे मीं झालों निष्ठुर तुजकारणें विकायाला ॥ राक्षस पिशाच येतिल मजपाशीं कठिणपण शिकायाला ॥ ४ ॥ ज्या कोणाला दासी व्हावी कार्यें करावया गेहीं ॥ तो येउनि घेवो हे जोंवरि आहेत मदसु या देहीं ॥ ५ ॥ छंद—मग सतीचिया मस्तकीं तृणा ॥ बांधुनी उभी केलि त्या क्षणा ॥ देखतां जिचें वदन लोचनीं ॥ होय क्षीण तो चंद्र लाजुनी ॥ ६ ॥ साकी ॥ तो त्यासमयीं काल कौशिक नामें द्विजवर आला ॥ घेउनि सतिला एक भार तें कांचन देता झाला ॥ ७ ॥ आर्या ॥ न वदे करी कर पुढें होय हरिश्चंद्र शोक हतचित्त ॥ तद्वल्कलांचलीं तो बांधी आपणाचि भूमिसुर वित्त ॥ ८ ॥ श्लोक ॥ तो विप्र बोले तिस चाल बाई ॥ येरी निघे लागुनि कांत—पायीं ॥ आतां म्हणे दुर्लभ पाय झाले ॥ बोलूनि कष्टें मग शीघ्र चाले ॥ ९ ॥ शिशु म्हणे मज दाखवि एकदां ॥ जननि पाहिन यावरि ते कदा ॥ नृप म्हणे नटला अनुबंध बा ॥ बडवि वक्ष कुमार धबधबा ॥ १० ॥ आर्या ॥ विप्रें सतीस नेतां शिशु शोकें म्हणुनि अंब अंब रडे ॥ पाहुनि वत्सा सम त्या फोडितसे माय गाय हंबरडे ॥ ११ ॥ पद ॥ आई नको त्यजुनि तूं जाऊं मला ॥ध्रु०॥ येतों तुझीया संगती मातें ॥ गहिवर येतो मला ॥ आई० ॥ घेउनि बाळा स्तनपान देई ॥ घालित मीठि गळां ॥ आई० ॥ २ ॥ कौशिक ताता परिसे विनति ॥ बाळक घेई दयाळा ॥ आई० ॥ ३ ॥ १२ ॥ ओंवी ॥ करुणा येउनि द्विजोत्तमा ॥ त्याचे अर्धभार देऊनि हेमा ॥ कुमरासहित राजभामा ॥ स्वकीय धामा आणिली ॥१३॥ आर्या ॥ स्त्रीसुत घेउनि गेला द्विज झाला तेधवां दिसेनासा ॥ नृप रडूनि म्हणे मजही अद्यापि तशीच कीं दिसे नासा ॥ १५ ॥ साकी—मग तो आपुले माथां तृण तें बांधी विकून घ्याया ॥ चहुटीं राहुनि उभा जनांसी बोले मजसी घ्या या ॥ १५ ॥ पद ॥ घ्यारे विकत मला विकत मला ॥ सुखें देह हा विकला ॥ घ्यारे० ॥ध्रु०॥ ब्रह्मस्वाचे साठीं, विकतों शरीर हें जगजेठीं ॥ १ ॥ विप्रापासुनि सोडा ॥ उचलिन पायींचा करिं जोडा ॥ २ ॥ देउनि विप्र सुवर्णा ॥ घ्या मज लागतसें मी चरणा ॥ ३ ॥ धन्य धन्य नृपराया ॥ लागे नारायण हरिपायां ॥ ४ ॥ १६ ॥ आर्या ॥ ऐसी संसाराची होतां दैवें करूनि बंडाळ ॥ ये विकत हरिश्चंद्र प्रभुला घ्यायासि उग्र चंडाळ ॥ १७ ॥ साकी ॥ धनाढ्य मोठा वीरबाहु तैं महार ग्राहक आला ॥ दोन भार तें कांचन देउनि नृपास घेता झाला ॥ १८ ॥ ओंवी ॥ औंट भार सुवर्ण ॥ विश्वामित्रासी अर्पून ॥ रायें धरिले चरण ॥ म्हणे म्यां श्रमविलें स्वामीसी ॥ १९ ॥ श्लोक ॥ झाडूनी सदनांगणासि गदळा नेऊनि टाकी दुरी ॥ घेऊनी शिरिं घागरी जळ भरीं धांवूनि गंगातिरीं ॥ गार्धीजें तंव गुप्तरूप घटतो भंगूनियां पाडिला ॥ तेव्हां आणिक डोंबपत्निजवळी मागूनियां

घेतला ॥ २० ॥ ओंवी ॥ तोही फोडुनी टाकित ॥ राजा थरथरां कांपत ॥ महारीण येऊ-
नियां लाथ ॥ मारी हरिश्चंद्रातें ॥ २१ ॥ आणिक घट दिला ते क्षणीं ॥ मग पाणी भरीत
रांजणीं ॥ २ ॥ विश्वामित्रेंतेचक्षणीं ॥ रांजणीं छिद्र पाडिलें ॥ २२ ॥ अभंग ॥ हरिश्चंद्र
राजा ख्यात ॥ डोंबा घरीं पाणी भरीत ॥ १ ॥ दैव असतां प्रतिकूळ ॥ काय करितो भू-
पाळ ॥२॥ ऐसा प्रारब्ध महिमा ॥ तुका म्हणे नकळे सीमा ॥ ३ ॥ आर्या ॥ नित्यनवा
वेष मुनी भक्षी घेऊनि पानगे चारी ॥ बोले ऐसी तृप्ती प्राप्त नव्हे स्वर्गिच्याहि उपचारीं ॥२३॥
दिंडी ॥ ऐसें वर्ष लोटतां जाण त्याला ॥ हरिश्चंद्र अत्यंत रोड झाला ॥ म्हणति डोंब ला-
गला रोग यासी ॥ व्यर्थ गेल्या आमुच्या हेमराशी ॥ २४ ॥ साकी ॥ इकडे तेव्हां
काळकौसिकासदनीं राज्ञी असतां ॥ उसंत नोहे अहोरात्रही कष्टें धंदा करितां ॥ २५ ॥
शिष्य तयाचे असति त्यांत तो बाळक रोहिदास ॥ तयां संगतीं काळ क्रमुनि शिण-
वितसे देहास ॥ २६ ॥ छंद ॥ पातलीं वना सर्व-बाळकें ॥ तुळसिदर्भ ते घेति कौतुकें ॥
कमळ देखुनी वनसरोवरीं ॥ रोहिदास तो शिरत अंतरीं ॥ २७ ॥ ओंवी ॥ तव
सर्पें डंखिला हातास ॥ हाक फोडी रोहिदास ॥ बत्तीस लक्षणी डोळस ॥ मूर्छित पडे
धरणीवरी ॥ २८ ॥ गीत ॥ तंव बोले तुम्ही गृहासी ॥ जातां माता पुसेल मजसी ॥
माझा प्रणाम सांगा तिजसी ॥ न करूं द्या शोका ॥ १ ॥ ऐसें बोलत असतां आला ॥
झेंडू त्याचिया वदनाला ॥ वेगासरिसा त्यजिता झाला ॥ पंच प्राणांसी ॥२॥ बाळें रडतचि
सदना आलीं ॥ तारामतिते कथितीं झालीं ॥ परिसुनि माता शरीर घाली ॥ धरणीवरि दुःखें
॥ ३ ॥ २९ ॥ आर्या ॥ एकुलतें मम बालक नेलें तें केवि निष्ठुरें काळें ॥ काळें
करुनि नृपासी भेटलिया द्यावु काय मुख काळें ॥३०॥ ओंवी ॥ धांवते अंधारी चहूंकडे ॥
क्षणक्षणा अडखळूनि पडे ॥ भाळीं आदळतो वृक्ष रोकडे ॥ अशुद्ध वाहे न कळे तें
॥ ३१ ॥ दिंडी ॥ सरोवरीं बालकप्रेत-होतें ॥ सतीपुढें टाकिलें गाधिजें तें ॥ लागतांचि
पायांस चाचपूनि ॥ ओळखिलें सुतशवा तयेक्षणीं ॥ ३२ ॥ ओंवी ॥ आडवें घेतलें प्रेत
प्रेमपान्हा स्तनीं दाटत ॥ मुखीं तयाचे स्तन घालीत ॥ हृदयीं दृढ आलिंगी ॥ ३३ ॥
मग रूप पालटोनि ॥ विश्वामित्र पुढें येऊनी ॥ म्हणे तूं कोण या वनीं ॥ रडसी किमर्थ
आक्रोशें ॥ ३४ ॥ साकी ॥ सती म्हणे बा सर्पें खंडुनि वधिलें मम पुत्रासी ॥ विप्र वदे
तरि आतांचि रात्रीं दहन करावें यासी ॥ ३५ ॥ डोंब देखतां जाळूं न देती ऐसें बोलुनि
वेगें ॥ गंगातीरीं प्रेत आणुनी करी सिद्धता अंगें ॥ ३६ ॥ ओंवी ॥ पुत्र घातला सरणांत ।
म्हणे तूं रुदन न करीं येथ ॥ पैल तो स्मशान रक्षित ॥ आलिया जाळूं न देची
॥ ३७ ॥ ब्राह्मण तेथें गुप्त झाला ॥ तारामतीनें शोक मांडिला ॥ कोलाहल हरि-
श्चंद्रें ऐकिला ॥ धांवूनिया आला ते स्थाना ॥ ३८ ॥ छंद ॥ केश धरुनियां ओढिली
तिशीं ॥ धन दिल्याविण काय जाळिशी ॥ लाथ दीधली तीस क्षोभुनी ॥ सरण विझ-
विलें तोय शिंपुनी ॥ ३९ ॥ सतिपुढें तदा प्रेत टाकिलें ॥ केश जळुनियां अंग भा-
जलें ॥ विरुप होउनी पडिलें लेकरूं ॥ सति म्हणे अहा कर्म दुस्तरू ॥ ४० ॥
॥ आर्या ॥ राजा म्हणे अहाहा कोण कसाहो महा-मही-पतिचा ॥ बालक काळकवळ
हा, नाहीं परिहार मृत्युच्या गतिचा ॥ ४१ ॥ राव अयोध्यापतिची, भार्या मी रो-

हिदास सुत त्याचा ॥ तक्षकदंशें मेला, मालवला वंशदीप सावित्याचा ॥ ४२ ॥ ऐकुनि महिवर गहिवर मूर्च्छा येऊनि वृक्षसा पडला ॥ रडला दुःखभरें बहु न मरे जो डोंवहास्तिं सांपडला ॥ ४३ ॥ श्लोक ॥ तारामती बोलत जाण त्यांतें ॥ तूं कोण हें सत्य निरूपिं मातें ॥ सांगे हरिश्चंद्र असें तियेसी ॥ मातें जनीं बोलति निश्चयेसी ॥ ४४ ॥ ओंवी ॥ काळकौशिकें तुज नेलियावरी ॥ म्यां विकूनि घेतलें डोंबा घरीं ॥ मज अन्न नाहीं वर्ष-भरी ॥ सांप्रत स्मशान रक्षितों ॥ ४५ ॥ असो एकमेकांचे गळां पडून ॥ शोक करिती अत्यंत दारुण ॥ रायें पुत्रप्रेत कवळून ॥ मांडिला विलाप आक्रोशें ॥ ४६ ॥ मग आज्ञा घ्यावया डोंबसदनीं ॥ नृप जातां मुनीं येउनी ॥ तारामतीस म्हणे स्थानीं ॥ विवशी तुज भक्षील ॥ ४७ ॥ साकी ॥ देवालय तें पैल असे त्यामाजी क्षणभरी बैसे ॥ मग ती प्रेता घेउनि आली देउळिं ऐकुनि ऐसें ॥ ४८ ॥ दुःखनिजेनें तीस व्यापितां विप्रें फाडुनि प्रेत ॥ आंताडिं काढुनि तिचे मुखासी रक्ता लावी त्वरित ॥ ४९ ॥ शंखध्व-नि मग करित आपण बाहिर येता झाला ॥ वेसकरासी म्हणे लांव ही आलयिं भक्षित बाळा ॥ ५० ॥ दिंडी ॥ ऊफराटे हस्त ते आकळिले ॥ नेत्र दोन्ही तैसेचि बांधियेले ॥ ताडितांचि आणिली राजद्वारा ॥ अमित शोका तैं करीं राजदारा ॥ ५१ ॥ ओंवी ॥ डोंबातें आज्ञा करी चौधरी ॥ लांवेचें शिर छेदा सत्वरीं ॥ केशी धरूनी तदा निष्ठुरी ॥ पुरींबाहेर नेलीं चैं ॥ ५२ ॥ वीरबाहु म्हणे हरिश्चंद्रा लागुन ॥ इचें करी शिरच्छेदन ॥ येरू म्हणे आज्ञा प्रमाण ॥ ओळखी निधान तारामती ॥ ५३ ॥ छंद ॥ स्वर्धुनी जळीं स्नान सारुनी ॥ उभि वधासि ती केली तत्क्षणीं ॥ येरि अंतरीं स्मरुनि माधवा ॥ होय मागती हेंचि तेधवां ॥ ५४ ॥ आर्या ॥ नाथ हरिश्चंद्र असो जन्मोजन्मीं गुरू व-सिष्ठ मुनी ॥ सुत रोहिताश्व याचक कौशिक मागें असें सती नमुनी ॥ ५५ ॥ रावे वधाया उचली कर तंव हा हा म्हणूनि ये हरि तो ॥ नृपकर सशास्त्र आकळि स्मरणें अघनग समस्त जो हरितो ॥ ५६ ॥ ओंवी ॥ राया आलिंगी जगजेठी ॥ येरें चरणीं घातली मिठी ॥ रोहिताश्व उठवी अमृतदृष्टी ॥ हृदयीं धरी राज्ञीतें ॥ ५७ ॥ आर्या ॥ तव दम सत्य तितिक्षा प्रमुख गुणांही प्रसन्न मी झालों ॥ धालों सुखें असें मी तुजला म्हणवावया स्वयें आलों ॥ ५८ ॥ ओंवी ॥ विश्वामित्रें रूप प्रगटिलें ॥ हरिश्चंद्रा हृदयीं धरिलें ॥ तारामतीस आलिंगिलें ॥ कडे घेतलें रो-हिदासा ॥ ५९ ॥ आर्या ॥ साश्रु हरिश्चंद्र सुता आलिंगुनि सुचिर मस्तकीं हुंगी ॥ न सुटे मिठी तयाची मधुर रसीं जेंवि गुंतली मुंगी ॥ ६० ॥ साकी ॥ अयुताब्देंवरि सु-राज्य केलें राय हरिश्चंद्रानें ॥ स्वपुरीसह मग वैकुंठातें गेला आनंदानें ॥ ६१ ॥ ऐसें प्रेमळ चरित्र गातां अगाध दुरितें हरती ॥ कृष्णदास करि विनती यास्तव परिसा जनहो प्रीतीं ॥ ६२ ॥

उपसंहार.

असो. पहा या हरिश्चंद्रावर केवढें धर्मसंकट आलें कीं, विश्वामित्राची दक्षिणा दे-ण्याकरितां त्यास किती क्लेश भोगावे लागले ? आणि कसल्याही संकटकाळीं साधारण

मनुष्याच्याही मनांत न येणारीं स्त्रीसुतविक्रय, चांडालसेवा, श्मशानरक्षण इत्यादि नीच कृत्यें त्यास करावीं लागलीं. आणि इतकेंही करून शेवटीं कौशिककृत छलानें स्वस्त्री जी परम पतिव्रता तारामती तिचा शिरच्छेद करण्याचाही प्रसंग आला. तरी परम सत्वधीर असल्यामुळें तो पुण्यश्लोक त्याही प्रसंगास मागें सरला नाहीं; जगन्नियंता जो परमेश्वर त्यानें त्या समयीं प्रगट होऊन त्यास त्या अकृत्यापासून निवृत्त केलें; व रोहिताश्वासही जिवंत करून त्या त्रिवर्गांचा समागम केला. नंतर कौशिकऋणांतून मुक्त झालेला हरिश्चंद्र पुनः अयोद्धेस येऊन दहा हजार वर्षें राज्य करिता झाला.

तात्पर्य—त्या महासंकटांत परमात्म्याची कृपा नसती तर हरिश्चंद्राची काय मति झाली असती ? आणि त्याचा मान कसा राहिला असता ? तस्मात् श्रीहरिवांचून कोणीही गेलेला मान पुनः देणार नाहीं. हा आशय मनांत आणून प्रथमपदीं रंगनाथस्वामी म्हणतात, मान सांवरिल० ॥ आतां हा श्रीहरि हृदयस्थच आहे. त्याचे ठिकाणीं अंतःकरणाची प्रीति ठेवावी म्हणजेंच जन्माचें साफल्य होतें. अशाविषयीं शेवटले चरणांत सांगतात, ॥ निजरंगींरंग जडो० ॥ ३ ॥ गेला मान० ॥ हेंचि दान देगा देवा ॥ तुझा विसर न व्हावा ॥ तवकथामृतं तप्तजीवनं० ॥ आरती म्हणावी ॥ कायेनवाचा मनसेंद्रियैर्वा० ॥ हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥ पुंडरीक वरदे हरिविठ्ठल॥ पार्वतीपते हर हर महादेव ॥ जानकी जीवनस्मरण जय जय राम ॥ श्रीगुरुदेवदत्तात्रेयकी जय ॥ संपूर्ण. ॥

पूर्वरंगनिरूपण.

॥श्रीगणेशायनमः॥ अविरल-मदजल-निवहमित्यादि नमनम्॥ गोपाल राधाकृष्ण गोविंद गोपाल इति भजनं ॥ पुंडरीक वरदे हरिविठ्ठल ॥ पार्वतीपते हर हर महादेव ॥ सीताकांत स्मरण जय जय राम ॥ पद ॥ साधु गृहाप्रति आले ॥ भलें सार्थक झालें ॥ ध्रु० ॥ दसरा हा मज हीच दिवाळी ॥ अंतरीं संत निवाले ॥ भले० ॥ १ ॥ सर्व जयंत्या आजचि आम्हां ॥ स्वात्मसुखें मन धालें ॥ भलें० ॥ आनंदनंदन बोलति वाचें ॥ निशंक दैव उदेलें ॥ भलें सा० ॥ २ ॥ नंतर ध्रुवपद म्हणावें ॥ पुंडरीक वरदे—॥ पार्वतीपते० ॥ जानकी जीवन स्मरण० ॥ पूर्वपद ॥ साधु गृहाप्रति आले ॥ भलें सार्थक झालें ॥ ध्रु० ॥ आदौ कीर्तनारंभीं सत्कवितिलक आनंदनंदन कवि सत्समागमानें स्वात्मसुखास प्राप्त होऊन नंतर आत्मप्राप्तीस मुख्य साधन सत्संगतीच होय, असा निश्चय करून साधु समागमाची प्रशंसा करितात ॥ साधु गृहाप्रति आले ॥ भलें सार्थ० ॥ भगवत्परायण ब्रह्मनिष्ठ असे सज्जन: आपल्या घरीं आले म्हणजे त्यांचा समागम झाला त्या योगानें जन्माचें सार्थक झालें ! आतां याचप्रमाणें सत्संगतीविषयीं एका सुभाषितकाराची उक्ति आहे. श्लोक ॥ जाड्यंधियो हरति सिंचति वाचि सत्यं मानोनतिं दिशति पापमपाकरोति ॥ चेतःप्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिं सत्संगतिः कथय किं न करोति पुंसां॥ १॥

अर्थ—कवि म्हणतो, सत्संगति पुरुषाचें काय इष्ट करीत नाहीं ? तर सर्व कांहीं करिते. बुद्धीचें जाड्य म्हणजे अज्ञान नाहींसें करिते. वाणीचे ठिकाणीं सत्याचें सिंचन

करिते, सन्मानाची उन्नति म्हणजे उत्कर्ष देते, पापाचा नाश करिते, चित्तास प्रसन्नता करिते, आणि सर्व दिशांच्या ठायीं कीर्ति पसरिते, किंबहुना सत्संगति सर्व मनोरथ पूर्ण करिते. या सुभाषितकारांच्या उक्तीप्रमाणें सत्संगतीनें सर्व मानसिक हेतु पूर्ण झाल्यावर आनंदतनय सत्संगाविषयींचा आपला उद्गार प्रदर्शित करितात. साधु गृहाप्रति आले ॥ भलें सार्थक झालें ॥ असेंच सत्संगति आत्मलाभास कारण आहे अशाविषयीं सुंदरविलासांत एक कवित आहे. कवित—(इंदव छंद) ज्या दिनतें संतसंग मिल्यो तब त्या दिनतें भ्रम भाजिगयोहै ॥ और उपाय थके सबही तब संतनि अद्वय ज्ञान दयोहै ॥ पोत प्रवालही क्युं करि छुंवत एक अमूलक लाल लयोहै ॥ कौन प्रकार रहै रजनीतम सुंदर सूर प्रकाश भय है ॥ १ ॥ सुंदरदास म्हणतात, ज्या दिवसापासून सत्समागयाचा लाभ झाला त्या दिवसापासूनच ला अनादि देहात्मत्व भ्रम दग्ध झाला. आजपर्यंत जे जे उपाय आत्मप्राप्ति व्हावी म्हणून केले ते सर्व थकले, म्हणजे त्यापासून आत्मज्ञान झालें नाहीं. शेवटीं सत्समागम झाला तेव्हां त्या संतांनींच अद्वय जो आत्मा त्याचें ज्ञान दिलें. आतां असा सत्संगाचा अलभ्य लाभ झाला असतां मी इतर उपाय कशाकरितां करूं ? अशा अर्थी दृष्टांत देतात. ॥ पोत प्रवालही० एक अमूल्य असा लाल (रत्न) अर्थात सत्संग मीं मिळविला आहे. मग इतर साधनें यांस पोंवळ्यांच्या पोती यांस मी कशाला स्पर्श करूं ? आतां कांहीं अज्ञान किंवा भ्रम शेष राहिला असल्यास इतर उपायांचीं आवश्कता आहे असें म्हणाल तर त्याविषयीं कवि म्हणतात, एकदां सूर्योदय झाल्यानंतर रात्रीचा काळोख कसा राहील ? त्याप्रमाणें सद्गुरुकृपेनें एकदां आत्मस्वरूपाचा प्रकाश झाल्यावर मग अविद्यारूप अंधःकार कसा राहील ? तात्पर्य सत्समागमानें आत्मज्ञान होऊन या नृजन्माचें सार्थक्य झालें. याच आशयानें आनंदतनय म्हणतात.—साधु ग्रहाप्रति आले ॥ भलें सार्थक झालें ॥ १ ॥ आतां साधूचें लक्षण काय ? तर याविषयीं सुभाषितकार लिहितात.— ॥ श्लोक ॥ करे श्लाघ्यस्त्यागः शिरसि गुरुपादप्रणयिता ॥ मुखे सत्यावाणी विजयिभुजयोर्वीर्यमतुलं ॥ हृदिस्वस्थावृत्तिःश्रुतमधिगतैकव्रतफलं ॥ विनाप्यैश्वर्येण प्रकृतिमहतां मंडनमिदम् ॥ १ ॥ अर्थः—हस्ताचे ठिकाणीं दातृत्व, शिराचे ठायीं गुरुचरणवंदनाविषयीं प्रेम, मुखामध्यें सत्यवाणी, भुजांचे ठिकाणीं अनुपम आणि जयदायक असें वीर्य (पराक्रम), हृदयांत स्वस्थवृत्ति आणि शास्त्राध्ययन असून तदनुसार आचरण हें खऱ्या सज्जनांचें स्वाभाविक भूषण आहे. द्रव्यादि ऐश्वर्य नसलें तरी या मंडनांत कधींहि न्यूनता होत नाहीं. याचप्रमाणें सुंदरविलासांत साधूंचीं लक्षणें सांगितलीं आहेत. ॥ कवित ॥ धूलिजैसो धन ज्याके सूलि तो संसार सुखभूलि जैसो भाग देखो अंतकसी यारी है ॥ पाप जैसी प्रभुताई साप जैसो सन्मान बढाई बिछुन जैसी नागिनीसी नारी है ॥ अग्नि जैसो इंद्रलोक, विघ्न जैसो विधि लोक किरती कलंक जैसी सिद्धीसी ठगारी है ॥ वासना न कोई बाकी ऐसी मति सदा जाकी सुंदर कहत ताहि बंदना हमारी है ॥ १ ॥ असे साधु प्रारब्धानुकूल्यानें जर घरीं आले अथवा त्यांचा समागम झाला तर जन्माचें सार्थक्य होईल यांत कांहीं संशय नाहीं. अतएव आनंदतनय योग्य म्हणतात—साधु गृहाप्रति आले ॥ भलें सार्थक झालें ॥ साधु घरीं येऊन त्यांची

शुश्रूषा ज्या दिवशीं होईल तोच दिवाळी दसरा इत्यादि आनंदाचा दिवस होय. असें पुढिल चरणांत प्रतिपादन करीत आहेत दसरा हा मज हीच दिवाळी० ॥ आतां सत्संगतीपासूनं काय लाभ झाला याविषयीं दुसऱ्या चरणांत सांगतात–सर्व जयं० ॥ नृसिंह, राम कृष्ण इत्यादिकांच्या जयंत्या म्हणजे अवतारदिवस, ते आजच आहेत; कारण आत्मसुख प्राप्त होऊन माझें अंतःकरण तृप्त झालें म्हणजे सर्व आनंदाचा लाभ झाला. तस्मात् आजचा सुदिन सर्वांत श्रेष्ठ आहे. असेंच अन्य कवींचें मत आहे. ॥ श्लोक ॥ वंध्या खलु ते दिवसा न यत्र भगवज्जनैः सहालापः ॥ शून्यं किल तत्सदनं यत्र न वा सज्जनैः सहवासः ॥ अर्थः–ज्या दिवशीं भगवज्जन म्हणजे साधु यांच्याशीं संभाषण झालें नाहीं ते दिवस सर्व प्रकारानें सुखाचे जरी गेले असले तरी व्यर्थ होत. तसेंच ज्या गृहांत सज्जनाशीं सहवास नाहीं तें घर शून्यवत होय. ॥ १ ॥ तस्मात् आनंदतनय म्हणतात कीं, ज्या दिवशीं संतजन घरीं आले तोच मोठ्या आनंदाचा आणि सार्थकतेचा दिवस आहे. ॥ साधु गृहा० ॥ आतां साधु गृहीं येऊन त्यांची शुश्रूषा करणें हें महद्भाग्य होय. पहा षड्गुणैश्वर्यसंपन्न द्वारकाधीश श्रीकृष्ण यांनीं सज्जनसेवेकरितां किती क्लेश भोगिले आणि किती छळ सोसिले याविषयीं कवि श्रीकृष्णसत्वपरीक्षणाख्यान निरूपण करितात.

दुर्वासाख्यान

ओंवी—एके दिवशीं प्रद्युम्न ॥ गोमतीतिरीं करितां स्नान ॥ तों ब्राह्मण विनोदेंकरून ॥ बोलते झाले तयासी ॥ १ ॥ एक बोले ब्राह्मण ॥ तूं कां येथें करिशी स्नान ॥ तुझ्या अंगींचें जीवन ॥ आम्हांवरी उडेल ॥ २ ॥ पूर्वीं गोकुळीं करूनि चोरी ॥ भोगिल्या गवळियांच्या पोरी ॥ आतां सोळा हजार भोगितो नारी ॥ ऐसा व्यभिचारी कृष्ण हा ॥ ३ ॥ अरे तुझ्या कृष्णासी दोन माता ॥ तैसेचि दोघे जाण पिता ॥ एक गुराखी एक यादव तत्वता ॥ त्याचा पुत्र म्हणविशी ॥ ४ ॥ आर्या ॥ कृष्ण म्हणे म्हणतो जो, गर्व मजपुढें करून कोपविला ॥ प्रद्युम्न भूसुरांहीं, कांहीं विप्रिय करूनि कोपविला ॥ ५ ॥ तों प्रद्युम्न म्हणे मज आहे गुण कोण विप्र भजनांत ॥ जी जी म्हणुनि मुनिस कां व्हावें दाटूनि विप्र-भजनांत ॥ ६ ॥ वदलों मीं प्रद्युम्ना, सुज्ञा बापा असें कसें वदसी ॥ आम्हा मुख्य जयप्रद विप्राशीर्वाद नच असा सदसी ॥ ७ ॥ अभंग ॥ देवकी वसुदेव उग्रसेन राव ॥ वृद्ध ते यादव भजती विप्रां ॥ १ ॥ ऐसे ते समर्थ ब्राह्मणांचे पाय ॥ वाहें मी सदैव हृदयकमळीं ॥ २ ॥ ८ ॥ आर्या ॥ शतपथ आहेत परी क्षेमपथ नसेचि या पथापरिस ॥ पुत्रासानुभवाची कथितों ती आदरें कथा परिस ॥ ९ ॥ अभंग ॥ प्रद्युम्ना तूं ऐकें ब्राह्मणाची कथा ॥ जीणें सायुज्यता प्राप्त होय ॥ १० ॥ साकी ॥ एकसमें दुर्वास तापसी द्वारावतिमों आया ॥ कैसोही छल करिये याको विचार मनसों पाया ॥ ११ ॥ ॥ आर्या ॥ हिंडे राजपथांत प्रगटसभाचत्वरांत यदुनाथा ॥ प्रद्युम्ना तो गाय स्वाभिप्राय प्रकाशिका गाथा ॥ १२ ॥ सत्कारुनि दुर्वास ब्राह्मण कोणी घरांत वसवील ॥ बसवील देवता परिसुखवील न कोपवील हसवील ॥ १३ ॥ साकी ॥ ऐसो सवाल करत पुकारत मेरे गृहपर आया ॥

मैतव उनका अवाज सुनकर हात जोरकर धाया ॥ १४ ॥ अभंग ॥ ऐसा तो ब्राह्मण आणिला गृहासी ॥ चित्त पायापाशीं माझें त्याच्या ॥ १५ ॥ आर्या ॥ स्वगृहांत बसविला म्यां सफला व्हाया स्वसंपदा नमुनी ॥ स्वोग्रत्वें देतो जो प्रथमाचि सर्वांसि कंगदान मुनी ॥ १६ ॥ साकी ॥ रहे दुर्वासा मेरे सदनमों बडे हरख यह जानो ॥ जो मागेसो दियै पदारथ अन्न वसन धन तीन्हो ॥ १७ ॥ संध्या तर्पण पुस्तक बाचे वेदहि मुखसे बोले ॥ धूनि लगाकर ध्यान लगावे परब्रह्मसे डोले ॥ १८ ॥ आर्या ॥ नित्य उपासित होतों अंगें त्या हव्यभुग्न उग्रखरा ॥ परि तो न तुष्ट रुष्टचि रुद्रांशप्रभव विप्र उग्र खरा ॥ १९ ॥ तत्सेवेला जपली निजली क्षणही तव प्रसू नाहीं ॥ वर्णावी सुकुमारी जी जातीच्या नव प्रसूनांहीं ॥ २० ॥ साकी ॥ विप्र बचन अति गहन दहन सम जो चाहे सो करते ॥ निसिंदिनिं हमकों निंद नहीं घरिं पल छन उनसे डरते ॥ २१ ॥ आर्या ॥ ॥ अन्न बहु सहस्त्रांचें एके समयीं पळांत जेवि खरी ॥ प्रलयाग्नि शक्ति दावी ती काय कथूं पदार्थ जे विखरी ॥ २२ ॥ व्हावें गुप्त अकस्मात् प्रगट हंसावें उगेंच वरडावें ॥ नाचावें धांवावें जाळूनि गृहवस्त्रही न वरडावें ॥ २३ ॥ भलतें भलत्या समयीं युक्तायुक्तहि पदार्थ मागे जे ॥ ते तत्कालची देतां न स्वीकारी उगाचि रागे जे ॥ २४ ॥ सदनीं कन्या मृदुला शय्या धृततापस्सा सिता पाहे ॥ जाय पदार्थ म्हणे बहु होतेल मज तापसासि तापाहे ॥ २५ ॥ अभंग ॥ यादवांच्या स्त्रिया मिळूनियां सर्व ॥ म्हणे तुम्हां गर्व झाला भारी ॥ १ ॥ बालकें तुमचीं रडताती येथें ॥ विक्षेप ध्यानांत येतो माझ्या ॥ २ ॥ यासाठीं तीं सर्व आणुनियां द्यावीं ॥ आस न धरावी त्यांची आतां ॥ ३ ॥ ऐसें ऐकूनियां पडिल्या मूर्च्छित ॥ करिताती खंत बाळांसाठीं ॥४॥२६॥ आर्या ॥ जातां गेलाचि दिसे करि रुसव्याचा उदंड परि परतो ॥ सासुस जांवाईसा वाटे गेला रुसून परिपरतो ॥ २७ ॥ ओवी ॥ ऐसे दोघे सेवा करीत ॥ परीतुष्टला नाहीं ऋषिनाथ ॥ एकदां म्हणे कृष्णा त्वरित ॥ उष्णपायस आणावें ॥ २८ ॥ अभंग ॥ अवश्य म्हणूनी केलें तें पायस ॥ वाढियेलें त्यास रत्नताटीं ॥ १ ॥ २९ ॥ आर्या ॥ होउनि तृप्त मुनि म्हणे कृष्णा जें शेष राहिलें पात्रीं ॥ हें पायस लावावें सर्वत्र क्षिप्र आपुले गात्रीं ॥ ३० ॥ प्रभुस अवश्य म्हणुनियां पायसशेषें स्वकाय साराविला ॥ नक्षत्रांसि असोपरि विधुचा संकोच कायसा रविला ॥ ३१ ॥ भैष्मीचाही झाला मुनिवचनें काय पायसा मान्य ॥ मोडील कोण आज्ञा कृपा ते काय पाय सामान्य ॥ ३२ ॥ साकी ॥ तबकी हमको दुजवर बोलत लेआवो रथ तेरा ॥ जाते अब हम हरिद्वारकों जलदी प्रयान मेरा ॥ ३३ ॥ आर्या ॥ मग रुक्मिणीस योजी आधीं योजूनियां रथास मज ॥ विप्रप्रभुत्व पुत्रा सादर ऐकूनिही कथा समज ॥ ३४ ॥ वसुनि रथीं राजपथीं अति मिरवित चाल विप्रतोदानें ॥ लोकां शोकाचीं दे धरुनि तसीं चालवि प्रतोदानें ॥ ३५ ॥ साकी ॥ सब जादवकुल कांपन लागे दीनानाथ पुकारे ॥ अबतुम राखो लाज हमारी हमहीं दास तुम्हारे ॥ ३६ ॥ मातापिता सब सातचले तब हायहाय कर रोबे ॥ कैसा भेरा किसन बचेगा कत्तर भाल लगावे ॥ ३७ ॥ आर्या ॥ जी जातीपुष्पांच्या नवमाळेशींच सुतनु तोलावी ॥ त्या भैष्मीस नृपपथा विप्रप्रखर प्रतोद तो लावी ॥३८॥ टोंची मुनी प्रतोदें उघडि यशाचें कवाड वाटोच ॥ दीन जनांत परि म्हणे मी मनिं निःशंक वाडवा टोंच ॥३९॥ श्लोक ॥ पाहूनियां नगरिचे

मग सर्व लोक ॥ हा कृष्ण रुक्मिणी असें करितीच शोक ॥ कोणी द्विज्ञा म्हणति हा यम काय आला ॥ नेतोचि प्राण अमुचा करि थोर घाला ॥४०॥ आर्या ॥ मी नाकावरि ठेवीं वाराया लोक अंगुलीलाच ॥ धरिली सर्व जनीं त्या तापभरें स्पष्ट पंगुलीलाच ॥ ४१ ॥ होतों ध्यानस्थ म्हणे तद्भंग न होच बा असें चालें ॥ हें वाक्य भीमकीला दुस्तर हृदयांत ऐकतां झालें ॥ ४२ ॥ गीत ॥ रुक्मिणी बोले यादवराया ॥ झाली व्याकुळ माझी काया ॥ आतां अंतरलें मी पाया ॥ करूं गति कैसी ॥ ॥ आधीं रथाचाही भार ॥ त्यावरि बैसे ऋषीश्वर ॥ आंग माझें बहु सकुमार ॥ करूं गति कैसी ॥२॥ किति मी सांगूं चक्रपाणी ॥ गति खुंटलीसे चरणीं ॥ पदर ढळला शिराहूनी ॥ करूं गति कैसी ॥ ३ ॥ ४३ ॥ पद ॥ अबकैसो धीर धरो यदुबीर ॥ मेरा थरकत सबही शरीर ॥धृ०॥ आजदुजबर मोहे जमसम भावत ॥ कछुनहि उनसो मीर ॥ चलत प्रतोद आनिन सोनिकसत ॥ लोहुभीगो सबचीर ॥ ४४ ॥ आर्या ॥ भगवंताची सेवा कांहींसी द्वारकापुरीं घडली ॥ धांवडतां रथमंथर गति वैदर्भी सती पथीं पडली ॥ ४५ ॥ मुनिचे मनांत होतें कीं वहुवेगें रथा पिटाळावें ॥ माझ्या चित्तीं सत्वें दुस्तर संकट तथापि टाळावें ॥ ४६ ॥ ओंवी ॥ रुक्मिणी पडली हें पाहून । बोले ऋषि क्रोधें करून ॥ तुजलागीं छळिलें म्हणून ॥ टाकून दिधलें मजलागीं ॥ ४७ ॥ आर्या ॥ ऐसें वदला रुसला गेला टाकुनि रथावरूनि उडी ॥ मन्मति मिकळा झाली प्राणवियोगें करूनि जेंवि कुडी ॥ ४८ ॥ द्रुत दक्षिणेकडे मुनि पायानें उत्पथेंचि तो धावें ॥ होतां गुप्त तरि सुता कोठें तच्चरणपद्म शोधावें ॥ ४९ ॥ साकी ॥ कहे प्रियासो रोयरोय कर रूठे सामी मेरा ॥ काहा करू अब कोन बुलावे येहि दुःख तेहेरा ॥ ९० ॥ आर्या ॥ वैदर्भी ही धांवुनि ये प्रार्थी मंजु माजि याचितसे ॥ न घडेल स्खलन पुन्हा वैसा रथिं हेंचि आजि याचितसें ॥ ९१ ॥ पद ॥ रथ पर चलो चलो महाराज ॥ ध्रु० ॥ अबन परोगीं पथमों साधु ॥ राखो मेरी लाज ॥ रथ पर चलो चलो० ॥ १ ॥ येहि अचरज देखमैं आये ॥ सवही सासुसमाज ॥ रथ० ॥ २ ॥ मै अबलाहुं सामिजगतकुं ॥ तुम हूं गरिब नवाज ॥ रथ० ॥ ३ ॥ सुरशाम अवतार भयोहै ॥ धन्य विप्रकेकाज ॥ रथ० ॥ ४ ॥ ॥ ९२ ॥ आर्या ॥ तैसाचि पूर्ण पायसदिग्ध तनु विरोनि आपुल्या आंगें ॥ भगवन्प्रसीद ऐसें म्हणत द्रुत मीहि धांवलों मागें ॥ ९३ ॥ साकी ॥ कैसो हमको मृत्युन आवे क्रोध हमारा भारी ॥ जाके गुनकुं बेद बखानत सोकंपत गिरिधारी ॥ ९४ ॥ आर्या ॥ त्वत्कीर्ति पुण्यश्लोकीं नांदेल सदैव पूतनाकाला ॥ त्वत्पुण्य गुणश्रवणीं जातिल होऊनि पूत नाकाला ॥ ९५ ॥ सर्वी स्त्रियांत रुक्मिणि कन्ये होशील सद्यशा पात्र ॥ पावेल न रोग जरा वैवर्ण्यातें कधीं तुझें गात्र ॥ ९६ ॥ मुनिचा प्रसाद होतां वत्सा जों आंपणाकडे पाहें ॥ तों पहिल्याहूनि अधिक मी श्रीसंपन्न शतगुणें आहें ॥ ९७ ॥ ॥ आख्यान समाप्त ॥

उपसंहार.

असो, दुर्वासऋषींनीं फार कसोशीनें इतका छळ केला तथापि श्रीकृष्ण त्या ब्रह्मनिष्ठ साधूच्या शुश्रूषेस न कंटाळल्यामुळें त्यांचेच आशीर्वादानें सत्कीर्ति, अचल संपत्ति आणि तेज इत्यादिक फळें प्राप्त होऊन कृतकृत्य झाले. आतां श्रीकृष्ण स्व-

तः अवतारी पुरुष असून कोणत्याहि गोष्टीची न्यूनता नसून एक सत्सेवा घडावी याच उद्देशानें त्यांणीं त्यांचा समागम केला, त्यापेक्षां इतर अज्ञजनांस सत्समागम किती अवश्य आहे हें सांगावयास नको. कारण स्वात्मसुख जें आहे तें सत्समागमानेंच प्राप्त होणार आहे म्हणून आद्य पदांत आनंदतनय म्हणतात—साधु गृहाप्रति आले ॥ भलें सार्थक झालें ॥ ध्रु० ॥ आनंदतनय बोलती वाचे ॥ निसंग दैव उदेलें ॥ ३ ॥ हेंचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ तव कथामृत तप्त जीवनं० ॥ आरती ॥ कायेनवाचा० ॥हरे राम हरे० ॥ पुंडलीक वरदे हरि विठ्ठल ॥ पार्वतीपते हर हर महादेव ॥ जानकी जीवन स्मरण जयजय राम ॥ संपूर्ण.

पूर्वरंग निरूपण.

श्रीमन्मंगलमूर्तयेनमः ॥ अविरलमंदजलनिवहं भ्रमरकुलानिकसेवितकपोलं ॥ अभिमतफलदातारं कामेशं गणपतिं वंदे ॥ १ ॥ इत्यादि मंगलाचरणम् ॥ रामाहो जय रामाहो पतितपावन पूर्ण कामाहो ॥ इति भजनं ॥ पुंडरीक० ॥ पार्वती० ॥ जानकीजीवन स्मरण जय जय राम ॥ (नंतर साष्टांग नमस्कार घालावा.) ॥ पद ॥ नवविध भक्ति घडो ॥ तुझिये स्वरूपीं प्रीति जडो ॥ विषयोन्मुख मन होउनि उन्मन ॥ वृत्ति अशी मुरडो ॥ ध्रु० ॥ सत्संगति आवडो पाउल सन्मार्गींच पडो ॥ याविण आणिक इच्छिन तरि हे जिव्हा समूळ झडो ॥ तुझि ॥ १ ॥ निजसेजे पहुडो, मति हे सुख सिंधूंत बुडो ॥ विश्वपटीं हा एकांचि तंतू ॥ दृष्टि अशी उघडो ॥ तुझिये० ॥ २ ॥ पूर्ण रंग जडो ॥ जगदाभास समूळ मोडो ॥ हारपलें जें निजधन तें कीं ॥ माझें मज सांपडो ॥ तुझि० ॥ ३ ॥ (ध्रुवपद म्हणावें) कृष्णा रामा रामा हो रामा रामा ॥ रामा रामा रामाहो रामा रामा ॥ पुंडरीक वरदे हरि विठ्ठल ॥ पार्वतीपते हर हर महादेव ॥ जानकी० जय० श्रीगुरुदत्तात्रेय० ॥

उपोद्घात.

नवविध भक्ति घडो तुझिये स्वरूपीं प्रीति जडो ॥ विषयोन्मुख मन उन्मन होउनि वृत्ति अशी मुरडो ॥ ध्रु० ॥ आदौ कीर्तनारंभाचे ठायीं भगवद्भक्तावतंस कविश्रेष्ठ रंगनाथस्वामी ईश्वराजवळ मागणें मागतात.—नववि० ॥ १ ॥ आतां ॥ मागण्यास विषय अनेक आहेत, द्रव्य, स्त्री, गृह, संतति इत्यादिक परंतु हे सर्व क्षणिक आहे, असें जाणून रंगनाथस्वामी ईश्वराची नवविध भक्ति सांगतात.— नवविध० ॥ आतां सर्व विषय क्षणिक आहेत हें कशावरून ? तर प्रबोधचंद्रोदयकारांची याविषयीं उक्ति आहे. ॥ श्लोक ॥ श्रियो दोलालोला विषयजरसाःप्रांतविरसा विपद्गेहं गेहं महदहि धनं भूरिनिधनं ॥ बृहच्छोको लोकः सततमबलाऽनर्थबहुला तथाप्यस्मिन् घोरे पथि बत रता नात्मनिरताः ॥ १ ॥ **अर्थ**—श्रीकृष्णमिश्र म्हणतात, संपत्ति ह्या झोंपाळ्याप्रमाणें चंचल आहेत. विषयांपासून होणारीं सुखें परिणामीं विरस आहेत. घर हें सर्व विपत्तींचें स्थान आहे, पुष्कळ धन असलें तरी त्यावर अनेक प्रकारचीं अरिष्टें येतात कीं, ज्यांपासून मरणाचाही प्रसंग वारंवार येतो. हा लोक तर

महा शोकानें व्यापिला आहे आणि अबला म्हणजे स्त्री अनर्थांनीं व्यापिली आहे. तथापि अशा भयप्रद विषयमार्गाचे ठिकाणीं अज्ञानी (आत्मस्वरूपाचा विचार न करणारे) असे लोक सक्त होतात. रंगनाथस्वामी हे अशा विषयलंपटांतील नसून त्यांचें मागणेंही असें क्षणिक नाहीं. तर ते म्हणतात हे दयानिधि देवा हे वासुदेवा, माझी इच्छा इतकीच आहे कीं, ॥ पद ॥ नवविध भक्ति घडो ॥ तुझिये स्वरूपीं प्रीति जडो ॥ ध्रु० ॥ तुझ्या चरणारविंदाचे ठायीं मला नवविधा भक्ति घडावी. ती नवविधा भक्ति कोणती तर श्रीमद्भागवतांत प्रल्हादानें सांगितली आहे. ॥ श्लोक ॥ श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं ॥ अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनं ॥ १ ॥ अर्थ–विष्णु म्हणजे सर्वांतर्यामी परमात्मा याच्या चरित्राचें श्रवण म्हणजे सज्जनांपासून ऐकणें. कीर्तनं म्हणजे भगवत्कथांचें उच्चारण करणें. याचप्रमाणें परमात्मस्वरूपाचें निरंतर स्मरण, हरीची चरणसेवा, विष्णुअर्चन (पूजन) वंदन म्ह० नमस्कार करणें, दास्य तसेंच ईश्वराशीं मैत्री करणें आणि आत्मत्वाचें निवेदन करणें हे भक्तीचे नऊ प्रकार आहेत. रंगनाथस्वामी म्हणतात या नव प्रकारांसहित तुझी भक्ति मला घडावी. ॥ नवविध भक्ति घडो० ॥ आतां नवविध भक्तीपासून साध्य काय ? तर ॥ तुझिये स्वरूपीं प्रीति जडो ॥ नवविध भक्तीच्या अनुष्ठानानें दृढावी प्रेमलक्षणाभक्ति म्हणजे ईश्वराच्या स्वरूपाचे ठिकाणीं निरतिशय प्रीति ती प्राप्त व्हावी. प्रेमलक्षणाभक्तीविषयीं सुंदरदास ज्ञानसमुद्रांत वर्णन करितात. कवित्त ॥ शिषि प्रथमहि नवधा भक्ति कहतही नव प्रकार हे ताकी ॥ भेद दशमी प्रेमलच्छना कहियें सो पावे जोहै निर्वेद ॥ पराभक्तहैनाकें आगें सेवक सेव्य न होई विच्छेद ॥ उत्तम मध्य कनिष्ट तीनि विधि सुंदर मिटिहै इनतें खेद ॥ १ ॥ अर्थ—प्रथम ही नवविधा भक्ति आचरण केली असतां तिजपासून प्रेमलक्षणाभक्ति प्राप्त होते, नंतर वैराग्य म्हणजे ऐहिक पारलौकिक सर्वविषयांवर तुच्छत्वबुद्धि प्राप्त होते. आणि नंतर एक ईश्वरस्वरूपाचेच ठिकाणीं परम प्रीतिरूप प्रेमलक्षणाभक्ति प्राप्त होते. ती दृढ झाली असतां पुढें पराभक्ति म्हणजे जीमध्यें सेव्य आणि सेवक यांची एकरूपता होते, अशी विज्ञानभक्ति प्राप्त होते. हाच आशय धरून रंगनाथस्वामी म्हणतात––तुझ्या स्वरूपाच्या ठायीं प्रेम दृढ होऊन मग विषयोन्मुख मन उन्मन होऊनी ॥ वृत्ति अशी मुरडो ॥ तुझिये स्वरूपीं० ॥ १ ॥ आतां ही त्रिविध भक्ति प्राप्त होण्यास मूळ कारण सत्संगति आहे. तिजविषयीं सतत अभिरुचि असावी असें प्रथमचरणांत मागतात. तत्संगति आवडो, पाउल सन्मार्गींच पडो ॥ याविण आणिक इच्छिन तरि हे जिव्हा समूळ झडो ॥ १ ॥ नवविध ॥ सत्संगतीच्या रुचीविषयीं सुभाषितकार म्हणतात. ॥ श्लोक ॥ भक्तिमुक्तिकृदेकांत समादेशनतत्परः ॥ कस्य नानंदनिःस्पंदं विदधाति सदागमः ॥ १ ॥ अर्थ––इहमुत्र आणि मोक्षसुख देणारा आणि निरंतर उपदेश करण्याविषयीं तत्पर असा सत्समागम कोणास आनंदवृष्टि करीत नाहीं ? तर सर्वांस आनंद देतो. यास्तव सत्संगाविषयीं प्रीति असून निरंतर सदाचरण घडावें याशिवाय दुसरें कांहीं एक मी इच्छित नाहीं ॥ याविण आणिक इच्छिन तरि हे जिव्हा समूळ झडो ॥ तुझिये०

॥ २ ॥ आतां ईशभक्ति, सत्समागम आणि सदाचरण यांपासून तरी फलप्राप्ति कोणती आहे ? असें म्हणाल तर पुढील चरणांत सांगतात—निजसेजे पहुडो, मति हे सुखसिंधुंत बुडा ॥ विश्वपटीं हा एकचि तंतु दृष्टि अशी उघडो ॥ ३ ॥ नवविध० ॥ प्रेमलक्षणभक्ति, वैराग्य आणि सत्समागम या साधनांनीं साध्य जी आनंदप्राप्ति ती मला व्हावी, या अभिप्रायानें म्हणतात ॥ निजसेजे०॥ माझी ही बुद्धि निजसेजे म्हणजे स्वरूपशय्येवर निरंतर शयन करो. आणि त्या योगानें स्वरूपभूत सुखसमुद्रांत निमग्न राहो. प्रस्तूत आमची मति या क्षणिक परिणामी विरस अशा तुच्छ विषयसुखातच निमग्न आहे. यामुळें आपले ठिकाणीं विषयावांचून आनंद आहे याचें भानहि आम्हांस नाहीं. याविषयीं प्रबोधचंद्रोदयांत कृष्णपंडितांची उक्ति आहे. ॥ श्लोक ॥ शांतेऽनंतमहिम्नि निर्मलचिदानंदे तरंगावलौ निर्मुक्तोऽमृतसागरांभसि मनाङ्मग्नोऽपि नाचामति ॥ निःसारे मृगतृष्णिकार्णवजले श्रांतो विमूढः पिबत्याचामत्यवगाहतेऽभिरमते मज्जत्यथोन्मज्जति ॥ अर्थ—शांत असून ज्याचें महत्व अनंत, मत्सरहित तरंगविवर्जित अशा अमृत समुद्राच्या उदकांत हा जीव निरंतर निमग्न असून त्या अमृताच्या एका लेशाचेंहि आचमन करीत नाहीं. आणि निःसार अशा या संसाररूप मृगजल समुद्राचे उदकांत श्रमी होऊन मोह पावत आहे, तरी त्यांतील विषय मृगजळ पितो, आचमन करतो, त्यांत शिरतो, रममाण होतो, बुडतो आणि वर येतो. ॥ १ ॥ तर अशा या निःसार मृगजळतुल्य विषयशय्येवर जी बुद्धि सुप्त झाली आहे ती निज म्हणजे स्वस्वरूपसुख हीच कोणी एक शय्या तिजवर शयन करो म्हणजे स्वस्थपणानें राहो मग अर्थात् ती सुखसमुद्रांत निरंतर निमग्न राहील. आतां यावर शंका—अहो, बुद्धि निरंतर स्वरूपीं रममाण झाली असतां अशनपानादिक व्यवहार सर्व बंद होतील. कारण त्या व्यवहारास देहबुद्धि कारण आहे. स्वरूपनिष्ठताच निरंतर असल्यावर देहबुद्धीचा उदय होणें नाहीं. कारण वामनपंडितांनीं निगमसागरांत साधनाध्यायांत म्हटलें आहे. ॥ ओंवी ॥ मी देह कीं मी ब्रह्म म्हणे ॥ तिसरी गोष्टी बुद्धि नेणें ॥ ब्रह्मविस्मरणें बाणे ॥ आयती ते देहात्मता ॥ १ ॥ बुद्धीस दोन वस्तूंचें तादात्म्य होतें. विचारकालीं अथवा योगकालीं मीं ब्रह्म अशी भावना होते. आणि त्याशिवाय इतर व्यवहारकालीं मी देह असें तादात्म्य होतें. आणि आपण तर म्हणतां कीं, माझी ही मति निजसेजेवर म्हणजे स्वरूपशय्येवर निरंतर शयन करो. बरें हें कसें घडेल ? तर याविषयीं उत्तर—रंगनाथस्वामीच सांगतात—विश्वपटीं चित्तंतू एकचि दृष्टि अशी उघडो ॥ २ ॥ स्वामी म्हणतात स्वरूपास्थितींत ईषन्मात्र भंग न होतां सर्व व्यवहारही चालावेत. आणि असें होण्यास सर्व जगांत एक चैतन्यच व्यापक आहे, असें ज्ञान झालें म्हणजे कांहीं अशक्य नाहीं. म्हणून हे ईश्वरा, मला असें ज्ञान दे कीं, ज्या योगानें या विश्वरूपी पटांत एक चैतन्य हेंच तंतूप्रमाणें व्यापक अशी माझी दृष्टि उघडेल. याचप्रमाणें वामनपंडितांनींही लिहिलें आहे ॥ ओंवी ॥ दृष्टीस जें जें दिसे ॥ भगवद्रूप तें तें असे ॥ सावेशेष योगीं हेंचि गवसे ॥ विश्वरूप ॥ १ ॥ विश्वाकार माझें मन ॥ त्याही पुढें चैतन्यघन ॥ तें तों आपण हें अनुसंधान ॥ हृदयीं असावें ॥ २ ॥ अर्थात् याप्रमाणें सर्व जगांत एक सच्चिदानंदघन परमात्मा भरला आहे असें ज्ञान झालें

असतां जिकडे जिकडे बुद्धिरूप वृत्ति जाईल तिकडे तिकडे सुखसिंधूंतच निमग्न राहील यांत संशय नाहीं. याविषयीं आचार्य म्हणतात ॥ **श्लोक** ॥ देहाभिमाने गलिते विज्ञाते परमात्मनि ॥ यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधयः ॥ १ ॥ **अर्थ**–देहाभिमान म्हणजे देहच मी अशी बुद्धि नाहींशी होऊन सर्वव्यापी परमेश्वराचें तत्त्व जाणलें असतां मन जेथें जेथें जाईल तेथें तेथें समाधीच आहेत. या अभिप्रायानें रंगनाथस्वामी म्हणतात. निजसेजे पहुडो मति हे सुखसिंधूंत बुडो ॥ विश्वपटींचित्तंतू० ॥ आतां ईश्वरस्वरूप सर्वव्यापक आहे अशी दृष्टि उघडून बुद्धि निरंतर स्वरूपानंद समुद्रांत रममाण होण्यास मुख्य साधन नारायणाची नवविध भक्ति होय. तीवांचून कांहीं होणें नाहीं. म्हणून ईश्वराची प्रार्थना करितात ॥ नवविध भक्ति घडो ॥ तुझिये स्वरूपीं प्रीति जडो ॥ गोपालराधे० भजनं० पुंड० पार्व० जानकी० आतां नवविध भक्तींतून एक भक्ति जरी निष्ठेनें घडेल तरी सर्व मनोरथ पूर्ण करिते, मग नवविध भक्तीपासून चतुर्विध पुरुषार्थ-प्राप्ति होईल यांत काय आश्चर्य आहे ? अशा अभिप्रायानें कवि सुभद्राहरण आख्यान निरूपण करितातः––

सुभद्राहरण.

ओंवी ॥ सकळ पृथ्वीचीं तीर्थें ॥ अवघीं अवलोकोनि पार्थें ॥ मग आला प्रभासातें ॥ तेथें सोमनाथ वंदिला ॥ १ ॥ गोसहस्त्र भूसुवर्णें ॥ तेथें वांटिलीं कुरुनंदनें ॥ ब्राह्मण मनोपूनि मनें ॥ आशीर्वाद गर्जती ॥ २ ॥ **साकी** ॥ प्रभास तीरथमांहि धनंजय बडे हरखसे न्हाये ॥ हरिभगिनीका विवाह सुनकर द्वारावतिमो आये ॥ **चंपू** ॥ **श्लोक** ॥ पापापनोदे फलितेऽर्जुनस्य प्रागेव सेतोरवलोकनेन ॥ प्रभासतीर्थे नियमावगाहः पश्चात्सुभद्रागमहेतुरासीत् ॥ **अर्थ**–सेतुच्या अवलोकनेंकरून अर्जुनाच्या दोषांचा नाश पूर्वीच झाला असतांना पश्चात् प्रभासतीर्थाचे ठायीं नियमाकरितां जें स्नान केलें तें सुभद्रागमास (कल्याण प्राप्तीस पक्षीं सुभद्रेच्या प्राप्तीस) कारण झालें ॥ ४. ॥ **आर्या** ॥ कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे ॥ तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्र–सुतासि द्यावया पाहे ॥ ५ ॥ तातादिक म्हणति मनीं सुमति खळाला अचक्षुला रत्न ॥ शूद्रासी श्रुति देतो राम न चालेचि यापुढें यत्न ॥ ६ ॥ **चंपू** ॥ स्मृतिपथस्थितयापि सुभद्रया जनसमक्षमिवाभिवुमात्तभीः ॥ द्विजकुलानि सतत्र समत्यजत्सहचराणि रतीशवशंवदः ॥ ७ ॥ **अर्थ**—ती सुभद्रा अर्जुनाच्या स्मरणमार्गाचे ठायीं म्हणजे मनांतच जरी स्थित होती तरी लोकांसमक्ष रमण्यास तो भीत असे. कारण मानसिक सुभद्रेशीं अंतःकरणाचें दृढ तादात्म्य झालें असल्यामुळें त्याला वाटे कीं मी सुभद्रेसहित या लोकांत कसा बसूं ? असें समजूनच कीं काय तो कामाच्या स्वाधीन झालेला अर्जुन बरोबर असलेल्या ब्राह्मणसमुदायास सोडून देता झाला ॥ **अभंग** ॥ कामानें व्यापिलें फाल्गुनाचें मन ॥ जप तप ध्यान विसरला ॥ १ ॥ ८ **साकी** ॥ तलपत है मनमाहि धनंजय जैसो मिन बिनपानी ॥ कैसी प्रभुकी बहन हमारी होवेगी महारानी ॥ ९ ॥ **चंपू** ॥ पयसा परिपू

रितौ घटौ परिपश्यन्पथि पाकशासनिः ॥ कमलाक्षकनीयसी कुचौ कलयामासकरस्थिता विव ॥ १० ॥ **अर्थ**—अर्जुन, मार्गांत पाण्यानें भरलेले कुंभ आडवे आले ते पाहून कमलाक्ष जो श्रीकृष्ण त्याच्या भगिनीचे (सुभद्रेचे) कुच आपल्या हस्तगत झालेच कीं काय असें समजता झाला ॥ १० ॥ **अभंग** ॥ तेव्हां आठवीला दीनाचा कैवारी ॥ संकट निवारी देवराया ॥ ११ ॥ **चंपू** ॥ मन्मथे ज्वलित वासवसुनुर्मानसे परिणये यदुपुत्र्याः ॥ लाजवापमिवकर्तुमुपेंद्रंतत्सगर्भ्यमथचित्तमनैषीत् ॥ १२ ॥ **अर्थ**—इंद्रपुत्र जो अर्जुन तो मदन प्रदीप्त झाल्या कारणानें सुभद्रेचा आपल्याशीं विवाह होत आहे असें मनोराज्य करीत असतां त्या मानसिक विवाहांत सप्तपदीच्या वेळीं लाजाहोम करतांना ओंजळींत लाह्या घालण्याकरितांच कीं काय तिचा कनिष्ट बंधु जो श्रीकृष्ण त्याकडे चित्त नेता झाला, म्हणजे त्याचें स्मरण करिता जाहला ॥ १२ ॥ **अभंग** ॥ धांवा करितां अर्जुन ॥ धांवूनि आले नारायण ॥ १३ ॥ **चंपू** ॥ अणुमात्रमिदं सहेत वोढुं नहि विश्वंभरमद्यमामितवि ॥ मनसोप्यवरुह्य तस्य दृष्टेः पुरतः प्रादुरभूत पुमान् पुराणः ॥ १४ ॥ **अर्थ**—अणुस्वरूप हें मन विश्वंभर जो मी त्या मला धारण करण्यास समर्थ होणार नाहीं, म्हणूनच कीं काय त्याच्या मनापासून उतरून पुराणपुरुष (श्रीकृष्ण) अर्जुनाच्या दृष्टीपुढें प्रगट होता जाहला ॥ १४ ॥ **आर्या** या चिंतेनें कृष्णा वाटे हा देह मज नकोसारे ॥ होतें चित्त विकल बहु समयज्ञा सांगणें नको सारें ॥ १५ ॥ **श्लोक** ॥ संसारदवतप्तानां विषयैर्हृतचेतसां संन्यासेन सुखं पुंसां तस्मादेतद्विधीयतां ॥ १६ ॥ **अर्थ**—संसाररूप वणव्यानें तप्त झालेले आणि विषयांनीं ज्यांचीं मनें क्षुब्ध (चंचळ) झालीं आहेत अशा पुरुषांस संन्यासापासून सुख होतें या कारणास्तव तूं असें करावें, म्हणजे संन्यास घ्यावा. ॥ १६ ॥ **पद** ॥ मजला वरिल सुभद्रा काय ॥ कोणी तरी सांगाहो ॥ ध्रु० ॥ आहे लग्नाची मनिं आस ॥ कैसा घ्यावा हो संन्यास ॥ दिसतील दाही दिशा उदास ॥ होईल त्रास शरीराला ॥ मज० ॥ १ ॥ मजला अंतरातिल हे पाय ॥ पाहुनि धर्महि म्हणेल काय ॥ द्रौपदी करील हायहाय ॥ मुकेल माय प्राणांसी ॥ मजला० ॥ २ ॥ म्हणतील संन्यासी जन पार्थ ॥ नाहीं प्रपंच ना परमार्थ ॥ यांत कैसा घडेल स्वार्थ ॥ हेंहि यथार्थ बोलाहो ॥ मजला० ॥ ३ ॥ ऐकुनि बोले मेघःश्याम ॥ कार्या विघ्न करील बळिराम ॥ एका जनार्दनासी काम ॥ करी विश्राम यतिधर्मीं ॥ मजला वरिल सुभद्रा काय ॥ कोणी तरी सांगाहो ॥ ४ ॥ १७ ॥ **चंपू** ॥ विजयो मधुरस्मितस्य भावं विदुषस्तस्य मतेन भिक्षुवेषः ॥ कुसुमास्त्रभयादिवातिगूढ कुहरे रैवतकस्य तिष्ठतिस्म ॥ १८ ॥ **अर्थ**—कृष्णाचें विनोदपर भाषण ऐकून अर्जुनानें सुभद्राविषयक परमासक्तिसूचक मंदहास्य केलें. त्या वेळीं त्याचा अभिप्राय जाणून श्रीकृष्णांनीं त्याची इष्टसिद्धी होण्याकरितां दिलेल्या संमतीवरून तो अर्जुन त्रिदंडी संन्यासी झाला. आणि रैवतक पर्वताच्या गुहेंत मदनाच्या भीतीमुळेंच कीं काय अति गुप्तपणानें राहता जाहला ॥ १८ ॥ **आर्या** ॥ पार्थ त्रिदंडी वेष स्वीकारी हलधरासि वंचाया ॥ युक्तीनें स्वपर—विहित—हित साधी कपट दोष कंचा या ॥ १९ ॥ **साकी** ॥ दिया त्रिदंडी भेद सामिको हासिकरे प्रभु मनमों ॥ फेरकरत तव विनोद अबही अबही करिये भिच्छा जगमों ॥ २० ॥ **चंपु** ॥ कथं सुभद्रा कमनीयतायाः कल्पे तनुत्यै कविरुन्नतोपि ॥

चतुर्थमण्याश्रममस्ययेन तां साधनीभूयदिदृक्षतेस्म ॥ **अर्थ**–**चंपूकार** म्हणतात–कवि महापंडित जरी असला तरी सुभद्रेच्या सौंदर्याचें वर्णन करूं शकणार नाहीं: कारण चतुर्थाश्रम म्हणजे संन्यासही (ज्यास स्त्रीच्या हातांतील कंकणांचा ध्वनि देखील वर्ज्य तो) अर्जुनास साह्य होऊन तिला पाहण्यास इच्छिता झाला ॥ २१ ॥ **साकी** ॥ आया एक संन्यासी बनमों कोटी सुरज सम झलके ॥ शांत दांत अतिकांत तापसी देखतही मन ललके ॥ २२ ॥ **आर्या** ॥ मौन सदा एकांत स्थिति साधु समाधियोग सुविरक्ति ॥ साक्ति न लोकसमाजीं लागे पौरांसि पार्थ यतिभक्ति ॥ २३ ॥ मोठेमोठेहि मठद्वारांतुनि भेटि घेति पायांची ॥ असम-शरज्वरभर खरगरपवि परिवरिसमाधि वायांची ॥ २४ ॥ **पद** ॥ अर्जुन होऊनि संन्याशी ॥ आला द्वारावातिकेसी ॥ ध्रु० ॥ बरवा परिकर लंगोटी ॥ गुलाबी कडकडित छाटी ॥ प्रणवोच्चार स्थिति ओंठीं ॥ अंगीं विभूतीची ऊटी ॥ पाहूनि भुलले जन त्यासी ॥ आला० ॥ १ ॥ लोटिलि द्वारींवती सारी ॥ झाली दाटी मठद्वारीं ॥ पुजाया नाना उपचारीं ॥ वेळ मग साधिती सुविचारी ॥ दुर्लभ यतिदर्शन भारी ॥ ढोंग माजविती कंसारी ॥ लोटल्या भेटींच्या राशी ॥ आला० ॥ २ ॥ वरिवरि ज्ञानयोग मुद्रा ॥ अंतरीं गडबडे सुभद्रा ॥ हें एक ठावें यादवेंद्रा ॥ उपजवि भक्ति बलभद्रा ॥ कुतुहलपंत विठ्ठलासी ॥ आला० ॥ ३ ॥ २५ ॥ **आर्या** ॥ रामासही कळलें कीं योगी मोटा असे म्हणे पाहूं ॥ आहों ब्रह्मण्य तया आणूं भिक्षेसि शिरपदीं वाहूं ॥ २६ ॥ **साकी** ॥ धन्य हमारो जनन भाग अज दरसन भयोतेहारो ॥ चलो हमारो गृहमो हमकूं भवजलपार उतारो ॥ १७ ॥ **पद** ॥ ॥ हरहर पार्थ सुभद्रा नवरीसाठीं संन्याशी झाला ॥ ध्रु० ॥ तीर्थें हिंडत हिंडत अर्जुन प्रभाशीं आला ॥ बळरामाचा निश्चय तेथें सविस्तर कळला ॥ १ ॥ हर० ॥ रंगुनि भगवीं वस्त्रें अंगीं लावुनि भस्माला ॥ दंडकमंडलु मंडित हस्तकीं धरिली जमाला ॥ हर० ॥ २ ॥ योग धारणा ध्यान मानसीं समाधि नेमाला ॥ मिरवि वरिपरि अंतरीं करपवि कामाचा भाला ॥ हरहर० ॥ ३ ॥ काशिवास हें प्रकट करूनी रूप ठकवी रामाला ॥ घाला घालुनि हरिल सुभद्रा साधिल कामाला ॥ ४ ॥ हरहर० ॥ २० ॥ ॥ **आर्या** ॥ तो यति एके दिवशीं बलदेवें आणिला स्वगेहास ॥ पूजुनि सुश्रद्धेनें जेवविता माधवास ये हास ॥ २९ ॥ **ओंवी** ॥ वरिवरि तापसाचा वेष ॥ तीर्थयात्रेचा अति सोस ॥ हृदयीं कामाचा निवास ॥ हा परमार्थ नेटका ॥ ३० ॥ पार्थ म्हणे हृदयस्था ॥ जेणें परिहरेल हृदयव्यथा ॥ मनोवृत्ति होतील स्वस्था ॥ तो उपाय मज सांगा ॥ ३१ ॥ **आर्या** ॥ यतिदर्शना सुभद्रा येउनि बैसे निजाग्रजाजवळ ॥ नवल प्रेक्षुनियां यति हस्तींचा तत्क्षणीं गळे कवळ ॥ ३२ ॥ घाली वृतांत सैंधव दुर्धी जंबीर पायसीं कथिका ॥ मथि कामशर जया त्या राम म्हणे साधुमोक्ष–सत्पथिका ॥ ३३ ॥ **चंपू** ॥ वपुषा मधुरेण सुभ्रुवा धनुषाचित्तभुवाच तर्जिताः ॥ तपसेव दिने दिने तन्वोस्तनिमानं जगृहे स मत्सरी ॥ ३४ ॥ **अर्थ** सुभद्रेच्या लावण्ययुक्त स्वरूपानें, धनुष्याकृति अशा भिवईनें आणि मनांत प्रदीप्त झालेल्या कामाग्नीच्या योगानें पीडित झालेला अर्जुन संन्यासप्रयुक्त तपश्चर्येच्या योगानेंच कीं काय दिवसेंदिवस शरीराचे ठिकाणीं कृशत्व पावता झाला ॥ ३४ ॥ प्रनिनिःश्वसिते दीर्घं पाणिना नासिकां स्पृशन् ॥ भावयामास पार्थोऽयं प्राणायामसमापनं ॥ ३५ ॥ **अर्थ**--अर्जुन हा विरहानें दीर्घश्वास वहात असतां हस्ताग्रानें नासिकेस स्पर्श करून प्राणायामाची समाप्ति झाली असें दर्शविता झाला ॥ ३५ ॥

आर्या ॥ सुकुमारी तेही तया पाहे नारी मनोरमा यतिला ॥ अस्वस्थ होय तेव्हां लावविलावी विभूति मांयं तिला ॥ ३६ ॥ चंपू ॥ मार्गेशरस्त्रयममुष्यकृते विमुच्य शेषं द्वयं पुनरिवोज्झितुमात्तलोभः ॥ शुश्रूषितुं तदनुसोदर चोदितायास्तन्व्याः स्वरोनयनमेव शरं न्यतानीत ॥ ३७ ॥ अर्थ—अर्जुन हा मार्गानें येतांना त्यावर मदनानें आपल्या पांच बाणांपैकीं तीन बाण सोडले. ते त्रिदंडाच्या रूपानें त्यास लागून राहिले. बाकीचे दोन राहिले तेही त्या अर्जुनास मारावे अशी इच्छा मनांत धरून तो मदन बलराम दादांनीं स्वामीची सेवा करण्याकरितां पाठविलेल्या सुभद्रेचे नेत्र तेच बाण कल्पिता झाला. म्हणजे सुभद्रेचे कटाक्षबाण लागून अर्जुन अत्यंत काममोहित झाला. ॥ ३७ ॥ चंपू—कन्याकरेमृन्दति पादपद्मं पुष्यंति गात्रे पुलकांकुराणि ॥ हरे हरे माधव माधवेति हरिस्मृतेरन्यथयांचकार ॥ ३८ ॥ अर्थ ॥ कन्या जी सुभद्रा तिचा मृदु हस्त त्या कपटयतीच्या चरणकमलांस संवाहन करीत असतां त्याचे आंगावर रोमाच उत्पन्न झाले, त्या वेळेस हे हरे ! हरे ! हे माधवा ! हे माधवा ! याप्रमाणें हरिस्मरण करून त्यास रूपांतर देता झाला. ॥ ३८ ॥ गद्य ॥ एकदा निर्वृत्यं प्रत्यवसानकृत्यं प्रतिक्षणाभिक्षचापक्षुरप्रसंधुक्षणेनसमंतात्पतितैः सत्वगुण शकलैरिवस्वेदाबिंभिन्यार्कीर्णांचामुखींत्वचमध्यास्यतिश्राम्यंतंधवित्रेणवीजयंतीसुभद्रातैस्तैरंगितैर्यतित्वेसंशय्यतस्यतत्व जिज्ञासयासविनयमनुरहसिन्यजिज्ञपत् ॥ ३९ ॥ अर्थ—एकदां भोजनकृत्य आटपल्यावर प्रतिक्षणीं कामबाणाच्या लक्षणानें आसमंतात छिन्न होऊन पडलेलीं सत्वगुणाचीं शकलेंच कीं काय अशा घर्मबिंदूनीं व्याप्त अशा कृष्णाजिनावर बसून स्वामी विश्रांति घेत असतां पंख्यानें वारा घालणारी सुभद्रा त्या त्या चिन्हांवरून त्याच्या संन्यासाविषयीं संशय पावून खरें तत्व समजावें म्हणून एकांतीं परम नम्रतेनें असें बोलली. ॥ ३९ ॥ चंपू । भगवन्नखिलविबुध्यसेपरमार्थवदभावियेशुभम् ॥ प्रयतायतयोभवद्विधाःप्रणिधानेनाहिदिव्यचक्षुषः ॥ ४० ॥ अर्थ—हे भगवन्, स्वामिमहाराज, आपण सर्व जाणतां यास्तव माझें शुभाशुभ पुढें काय होणार तें खरें सांगा. कारण आपल्यासारखे जितेंद्रिय यति (संन्यासी) समाधीच्या योगानें दिव्य ज्ञानसंपन्न असतात. तेव्हां अर्जुन म्हणतो—॥ श्लोक पादांगुष्ठनखं यस्तेभाले कुर्याद्विशेषकं ॥ स नरोऽपिस्मरेणार्तःसद्यः स्यादाभिषंदृशोः ॥ ४१ ॥ अर्थ—हे बाले, तुझ्या चरणांगुष्ठाचा तिलक जर मस्तकावर धारण करील तर तो नर कामानें पीडित होऊन तुझे दृष्टीचा विजय होईल. ॥ ४२ ॥ सुभद्रा म्हणत्ये " नरशब्दस्य विशेषपरता वा सामान्यपरता ? " अर्थ—नर शब्द हा विशेषनाम आहे कीं सामान्यनाम आहे श्लोक ॥ यमेवमुद्दिश्यतवोक्तिभंगी स एव दासोस्त्यनुकंपनीयः ॥ इतिप्रकाशक्षणमर्जुनत्वं चुचुंबताचोरयतिः कपोले ॥ ४३ ॥ अर्थ—अर्जुन म्हणतो हे सुभद्रे ज्याला उद्देशून हें तुझें चातुर्यानें भाषण आहे तोच हा दास (अर्जुन) तुझ्या कृपेला पात्र आहे. याप्रमाणें बोलून क्षणमात्र आपला अर्जुनपणा प्रगट करून त्या सुभद्रेस गालाचे ठिकाणीं चुंबन देता झाला. ॥ ४३ ॥ आर्या ॥ करुनि कृपा कृष्ण म्हणे अर्जुनजी तरि मुलीस पळवा हो ॥ पळवाहो कोपानळ ही तनु अतनुज्वरी न पळ वाहो ॥ ४४ ॥ अनुकूल ब्रह्म तसें तें झालें तन्मनोरथा पर्व ॥ तीर्थस्नान कराया पुरवासी लोक चालिले सर्व ॥ ४५ ॥ ओंवी ॥ वर्म सागे भक्तपती ॥ जेव्हां रैवताहूनि फिरती ॥

सुभद्रा वाहूनियां रथावरती ॥ हरण तुवां करणें ॥ ४६ ॥ मागें पडेल जो प्रसंग ॥ तो मी संपादीन श्रीरंग ॥ यादव करितील पाठलाग ॥ निवारणें तयांतें ॥ ४७ ॥ करुनि पर्वताची पूजा ॥ द्वारके येतां अच्युतानुजा ॥ पार्थें धावुनि सतेजा ॥ हस्त-कमळें आकर्षिली ॥ ४८ ॥ तारुण्यभरें कामपिसें ॥ पहिला भावो अर्जुनीं वसे ॥ हातीं धरितांचि संतोषें ॥ रहंवरी वळंगली ॥ ४९ ॥ **आर्या** ॥ तेव्हां धांवुनि बैसे पार्थ सुभद्रा-रथीं जसा पाटीं ॥ सुचिर क्षुधित ब्राह्मण हांहां म्हणतांहि वाढिल्या ताटीं ॥ ५० ॥ पद ॥ या संन्यासा काय ह्मणावें ॥ ध्रु० ॥ शेंडी मुंडुनि भगवें गुंडुनि ॥ पिशवी सोडुनि द्रव्य गणावें ॥ यासं ॥ १ पुडीलागीं सांगूं जातां ॥ नित्य किंवा नैमित्य पुसावें ॥ २ ॥ गीता तत्व विचार नकरितां ॥ स्त्रियांसवें हांसत बसावें यासं ॥ ३ ॥ अमृत प्रभु ह्मणे या यतिवेषा ॥ कां न यमें तोंडांत हणावें ॥ ४ ॥ यासं ॥ ५१ ॥ **ओंवी** ॥ पृथ्वी करीन पांडवरहित ॥ पालथें घालीन इंद्रप्रस्थ ॥ नांगर उचलुनि कृतांतवत ॥ लोहमुसळ घेतलें ॥ ५२ ॥ **आर्या** ॥ यादव सर्वहि झाले सिद्ध परि हरि स्वयें न लेश वदे ॥ बलभद्र म्हणे ऐका यादवहो न मन यांत केशव दे ॥ ५३ ॥ कृष्ण ह्मणे दादाजी पडला आहे असा विचार मला ॥ कीं भगिनीहरणास्तव जिष्णु तुह्मां दुष्ट वध्यसा गमला ॥ ५४ ॥ **ओंवी** ॥ अर्जुनापासूनी राजकुमारी ॥ हिरूनि आणील ऐसा क्षत्री ॥ मातें न दिसे पृथ्वीवरी ॥ ही एक असे आशंका ॥ ५५ ॥ होतां पार्थ जिंकूनि समरीं ॥ हिरूनि आणिली नवरी जरी ॥ पुढें अर्पावि कोणाकरीं ॥ जो याहूनि आगळा ॥ ५६ ॥ **आर्या** ॥ जा जा उठा मुरलीला धांवूनि तुह्मी घराप्रती आणा ॥ प्राणाधिक तो येना तरि घालाव्या मदंघ्रिच्या आणा ॥ ५७ ॥ **ओंवी** ॥ धाडुनि मंत्री पुरोहित ॥ मानें परतविला पार्थ ॥ पाणिग्रहण विधियुक्त ॥ सुभद्रा देवी दीधली ॥ ५८ ॥ चार दिवसपर्यंत ॥ सोहळा झाला अद्भुत ॥ तो वर्णितां ग्रंथार्थ ॥ पसरेल समुद्राएवढा ॥ ५९ ॥ वर्ष एक हरि संगती ॥ द्वारकापुरीं करूनि वसती ॥ उरला वनवास पुष्करक्षेत्रीं ॥ ऋषिसंगतीं काढिला ॥ ६० ॥

॥ सुभद्राहरणाख्यानं समाप्तम् ॥

उपसंहार

—:*:—

असो याप्रमाणें श्रीकृष्णाची सख्य भक्ति करणारा जो अर्जुन त्यास श्रीकृष्ण साहाय्यानें सुभद्राप्राप्ती कशा अडचणींतून झाली ? याचप्रमाणें ईश्वरभक्तीच्या योगानें मानवास सर्व इच्छित फळें प्राप्त होऊन अनिष्टाची निवृत्ति होते. या आशयानें रंगनाथस्वामी पदा-च्या अंत्यचरणांत सांगतात--॥ पूर्णरंग जोडा जगदाभास समुळ मोडा ॥ हारपलें जें नि धन तें कीं माझें मज सांपडो ॥ नवविध भक्ति घडो ॥ तवकथामृतं तप्तजीवनं कविभि-रीडितंकल्मषापहम्० ॥ आरती ॥ कायेनवाचा मनसेंद्रियेर्वा० अच्युतंकेशवं राम नारायणं कृष्ण दामोदरं वासुदेवं भजे ॥ श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्र भजे ॥ १ ॥ हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥ हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ २ ॥ इति भजनम् ॥ पुंडलीक वरदे हरिविठ्ठल ॥ पार्वतीपते हरहर महादेव ॥ जानकी जीवन स्मरण जयजय राम ॥ श्रीसद्गुरुमहाराजकी जय ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

पूर्वरंगनिरूपणम्.

श्रीमन्मंगलमूर्तयेनमः ॥ अविरलमदजलनिव० ॥ इत्यादि मंगलचरणं ॥ विठ्ठल रखुमाई ॥ दया करी विठ्ठल रखुमाई ॥ इति भजनम् ॥ पुंडरीक० पार्वती० जानकी० ॥ अभंग ॥ पडतां जडभारी ॥ दासीं आठवावा हरी ॥ ध्रु० ॥ मग तो होऊं नेदी शीण ॥ आड घाली सुदर्शन ॥ १ ॥ हरिनामाच्या चिंतनें ॥ वारा वाटा पळती विघ्नें ॥ २ ॥ तुका म्हणे प्राण ॥ करा देवासी अर्पण ॥ ३ ॥ पुंडरीक वरदे० पार्वती० जानकीजिवन० ॥ (नंतर ध्रुवपद म्हणावें) जानकी जिवन सद्गुरुमहाराजकी जय ॥

उपोद्घात.

पडतां जडभारी ॥ दासीं आठवावा हरी ॥ ध्रु० ॥ आदौकीर्तनारंभाचेठायीं भगवज्जन-कौतुकाराम असे तुकारामाख्य सज्जनवर्य कवि, भवदावानल–भर्जित अशा अज्ञ आणि दुःखी जंविांस सर्व दुखें व संकटें यांतून मुक्त व्हावें अशाविषयीं उपाय सांगतात,— पडतां जडभारी० ॥ कोणतेंही जड भारी (संकट) प्राप्त झालें असतां अनन्यपणें हरि म्हणजे सर्व दुःखें हरण करणारा जो परमात्मा याचें चिंतन करावें. म्हणजे मग तो ॥ होऊं नेदी शीण ॥ आड घाली सुदर्शन ॥ १ ॥ तो परमात्मा श्रीहरि सुदर्शन (चक्र) आड घालून आपल्या भक्तांस अगदीं शीण होऊं देत नाहीं. सर्व दुःखें व संकटें तत्काळ नाहींशीं करतो. याविषयीं भागवतांत द्वादशस्कंधीं शुकदेव सांगतात, ॥ श्लोक ॥ अविस्मृतिः कृष्णपदारविंदयोः क्षिणोत्यभद्राणि च शं तनोति ॥ सत्त्वस्य शुद्धिं परमात्मभक्तिं ज्ञानंच विज्ञानविरागयुक्तम् ॥ १ ॥ अर्थ—श्रीकृष्णाच्या चरणकमलांची निरंतर स्मृति ही सर्व अभद्रें म्हणजे संकटें यांचा नाश करिते, आणि सुखाचा विस्तार करिते. अंतःकरणास शुद्धता देते. तशीच परमात्मा जो सर्वांतर्यामी ईश्वर त्याचे ठायीं भक्ति उत्पन्न करिते, आणि अनुभव व वैराग्य यांसहित ज्ञान देते. हाच आशय मनांत धरून तुकाराम म्हणतात,—पडतां जडभारी ॥ दासीं आठवावा हरी ॥ १ ॥ आतां ईश्वराची निरंतर स्मृति केल्यानें सर्व शीणभाग नाहींसा होतो असें म्हणतात. परंतु ईश्वराचें स्मरण कोणत्या रीतीनें करावें व त्यापासून कोणत्या दुःखाचा नाश होतो असें म्हणाल तर याविषयीं तृतीयस्कंधीं कपिलमहामुनि म्हणतात ॥ श्लोक ॥ यच्छौचनिःसृत सरित्प्रवोदकेन तीर्थेन मूर्ध्न्यधिकृतेन शिवः शिवोऽभूत ॥ ध्यातुर्मनः शमलशैलनिसृष्टवज्रं. ध्यायेच्चिरं भगवतश्चरणारविंदम् ॥ १ ॥ अर्थ—कपिलमहामुनि देवहूतीप्रत सांगतात हे जननि, ईश्वराचें समग्र चिंतन होणें एकदम अशक्य आहे, याकरितां एक एक अवयवाचें क्रमाक्रमानें ध्यान करून मग समग्र मूर्तीचें ध्यान करावें त्यांत प्रथम चरणाचें चिंतन करावें. त्याविषयीं सांगतात. हे देवहूति, ज्याच्या प्रक्षालनकाळीं (ब्रह्मदेवानें त्रिविक्रमाचें पूजन केलें त्यावेळीं) निर्माण झालेली जी महानदी गंगा तिचें पवित्रोदक मस्तकावर धारण केल्यानें शिव हा शिव (मंगलरूप) झाला. व जें

ध्यान करणाऱ्या पुरुषांच्या मनांतील दुःखरूपी पर्वतास चूर्ण करणारें केवळ वज्रच होय; अशा भगवंताच्या चरणकमलाचें चिरकाल ध्यान करावें ॥ १ ॥ हाच आशय मनांत आणून तुकाराम म्हणतात.—पडतां जडभारी ॥ दासीं आठवावा हरी ॥ १ ॥ यद्वा जडभारी म्हणजे जड जें आत्मातिरिक्त हें अहमादि घटांत द्वैत याच्या भरांत (समूहांत) पडतां म्हणजे सांपडतांना हरि म्हणजे स्मरणाबरोबर सर्व वृत्ति हरण करणारा जो अंतरात्मा याची आठवण करावी म्हणजे, ॥ मग तो होऊं नेदीं शीण ॥ आड घाली सुदर्शन ॥ १ ॥ परमात्म्याची अशी हृदयांचे ठिकाणीं स्मृति केली असतां तो शीण होऊं देत नाहीं. कारण तो हरि सुदर्शन सु (उत्तम) दर्शन (दृष्टि) अर्थात् आत्मज्ञान देतो आणि त्याच्या योगानें सर्व शीण म्हणजे देहाभिमानमूलक सर्व संसारश्रम नाहींसे करितो. याविषयीं आचार्य म्हणतात. ॥ आर्या ॥ उद्धृतनग नगभिदनुज दनुजकुलामित्र मित्रशशिदृष्टे ॥ दृष्टे भवति प्रभवति न भवति किं भवतिरस्कारः ॥ १ ॥ अर्थ—हे गोवर्द्धनोद्धरणा, हे उपेंद्रा, हे दैत्यवंशदावानला हे चंद्रसूर्यलोचना. हे श्रीकृष्णा, महाप्रभाव जो तूं त्या तुझें दर्शन (ज्ञान) झालें असतां भव म्हणजे अनेक दुःखांचे उद्भवस्थान अशा या संसाराचा तिरस्कार (नाश) होणार नाही काय ? अपितु होईलच. असा अभिप्राय मनांत आणून तुकाराम म्हणतात ॥ पडतां जड० ॥१ ॥ हरिनामाच्या चिंतनें ॥ बारा वाटा पळती विघ्नें ॥ २ ॥ आतां संकटकाळीं परमात्म्याची आठवण केली असतां तें भगवन्नामस्मरण सर्व विघ्नांस दूर करितें. असा आशय तृतीय चरणांत प्रतिपादन करितात. ॥ हरिनामाच्या चिंतनें० ॥ हरीच्या नामाचें चिंतन केलें असतां सर्व विघ्नें बारा वाटा पळतात, म्हणजे निःशेष नाहींशीं होतात. याविषयीं प्रसिद्ध पुराणोक्त आहे ॥ श्लोक ॥ सर्वदा सर्वकार्येषु नास्ति तेषाममंमलम् ॥ येषां हृदिस्थो भगवान् मंगलायतनं हरिः ॥ १ ॥ अर्थ—ज्याच्या हृदयांत सर्व मंगलाचें स्थान असा भगवान (षड्गुणैश्वर्य संपन्न) हरि निरंतर स्मरणमार्गाचें ठायीं आहे त्यास सर्वकाळ कोणत्याही कार्यांत विघ्नादिकांच्या योगानें अमंगल (अकल्याण) होत नाहीं. तस्मात् सर्व अधिकारी जीवांना संसार-संबंधीं सर्व संकटें निवारण होण्याकरितां एक प्रभु जो सर्वांतर्यामी कृष्ण परमात्मा त्याचेंच स्मरण करावे. म्हणजे परमात्मा त्यांचीं संकटें दूर करून त्यांस अनुपम्य सुख देतो. अशा अभिप्रायानें तुकाराम आद्यचरणांत सांगतात ॥ पडतां जड० ॥ दासी आठ० ॥ आतां कोणावर महत्संकट पडलें आणि त्यांतून हरिस्मरणानें त्याची मुक्तता कशी झाली णशाविषयीं कवि दामाजीपंताचें चरित्र सांगतात:—

दामाजीपंताचें चरित्र.

साकी—भक्तराज सद्विप्र दयालु धर्ममूर्ति दामाजी ॥ बेदर भूपके सेवा करके विठ्ठल चरसनो राजी ॥ १ ॥ पद ॥ यवन बेदरींचा तो अधिकारी, ल्याचे दरबारीं ॥ दामाजीपंत कारभारी, बहु खबरदारी ॥ जाणुनि मंगळवेटियाचें, ठाणें दिधलें पूर्ण कृपेचें ॥ वारी संकट हरि दामाजीचें कौतुक देवाचें ॥ ध्रु० ॥ २ ॥ ओंवी ॥ झाला क्षुधेचा क-

डाड ॥ लोक मरती तडातड ॥ तेव्हां दुष्काळाची धाड ॥ पंताकडे पातली ॥ ३ ॥ **साकी**—पंढरपुरके दुजवर सब मिल दामाजी दरवाजे ॥ यामिक बोलती खडे रहो तब बिचार मनमों पाये ॥ ४ ॥ हात जोरकर ठाडे विप्र सब दामाजी दरवाजे ॥ धनदौलत नहिं मागत दाता अन्न अनाथकुं दिजे ॥ ५ ॥ पद ॥ पडला दुष्काळ पृथ्वीवरता ॥ ही ईश्वरसत्ता ॥ विप्र पंढरीचे म्हणती ताता ॥ दामाजी पंता ॥ धान्य देउनी तारिं आतां ॥ प्राण वाचवी ब्राह्मणांचे ॥ ० ६ ॥ **छंद** ॥ द्वारापुढें कोल्हेहुक ॥ लोक म्हणती भूक भूक ॥ पंताकडे टूक टूक ॥ दीनवदनें पाहती ॥ ७ ॥ **साकी** ॥ इतना सुनकर दामाजी तब बिकल होत अत मनमों ॥ हात जोरकर कहे सामि अब चलियो मेरे गृहमो ॥ ८ ॥ **ओंवी** ॥ बोले सुंदरा अहो पती ॥ माझे अलंकार ब्राम्हणांप्रती ॥ द्यावे परी प्रभुधान्याप्रती ॥ शिवूं नये सर्वथा ॥ ९ ॥ हें यवनासी कळतां जाण ॥ तत्काळ घेईल तुमचे प्राण ॥ संकटीं तुम्हां शिकविल कोण ॥ म्हणुनि चरणां विनवितसें ॥ १० ॥ **साकी** हाति न पाव बंधावे नाहितो तीखे सूल धरावे ॥ उडा दियो तोफनके मुखसें और बात नहिं भावे ॥ ११ ॥ **ओंवी** ॥ पांच सहस्र ब्राम्हण ॥ धान्यें वांचतील त्यांचे प्राण ॥ हें न होतां जाण ॥ काय वांचुनी जगीं या ॥ १२ ॥ छंद तुम्ही आम्ही वेंचूं तनु ॥ सकळ होतील जतनु ॥ विठूचरणीं वतनु ॥ प्राणां उदक सोडिलें ॥ १३ **साकी** ॥ हात जोरकर नम्र बचनसें भयो भगतजी ठारा ॥ पूर्ण करोजी साईं इच्छा लुटिये धान्य कुठारा ॥ १४ ॥ छंद ॥ गोण्या गाड्याअपार ॥ धान्य लुटिताती फार ॥ सर्व करिती जयजकार ॥ पुंडलीक वरदे ॥ १५ ॥ अभंग--तेथें मुजुमदार कानड ब्राह्मण ॥ फिर्याद लिहून पाठविली ॥ १६ ॥ छंद--भया पंत जब्बरदस्त ॥ सबदुनियामों मस्त ॥ सबही धान्य किया फस्त ॥ विप्रहस्त लुटाया ॥ १७ ॥ **साकी** ॥ ले आवो वह दामाजीकूं हातिन पाव बधावो ॥ उडा दियो तोफके मुखसे माथे सूल धरावो ॥ १८ ॥ **गीत** ॥ कांता बोले दामाजीसी ॥ स्वामी ऐका वचनासी ॥ मारूंनियां जिवें मजसी ॥ बेदरपुरा जावें ॥ १ ॥ यवन नव्हे तो जाणा काळ ॥ दूत पाठविले तात्काळ ॥ तुह्मां नेऊन उतावेळ ॥ हरील प्राणा ॥ २ ॥ तुमचे संगें जें सुख झालें ॥ तें मज आतां स्वप्नीं न मिळे ॥ जीव माझा तळमळे ॥ करूं गत कैशी ॥ ३ ॥ यास्तव विनवितें पायांसी ॥ शरण जावें विठ्ठलासी ॥ तोचि वारील संकटासी ॥ निश्चयें जाणा ॥ ४ ॥ १९ ॥ **ओंवी** ॥आतां स्वामी तुम्हांवांचून ॥ सदन दिसतें घोर वन ॥ यालागीं मजला मारून ॥ बेदरासी तुम्हीं जावें ॥ २० ॥ **पद** ॥ विनवित पतिव्रताशिरोमणी ॥ वदे शब्द मृदु मंजुळ सद्गुणखाणी ॥ धृ० ॥ द्यावें सर्वस्व तुम्हीं नच जावें ॥ विषमकाळीं श्रीविठ्ठलासी ध्यावें ॥ १ ॥ सर्वहि लज्जा वाढवी हपीकेशी ॥ कर्मधर्म अर्पितां श्रीरंगासी ॥ २ ॥ ऐसा आशय सांगुनी अंतरींचा ॥ वंदुनि धरी मार्ग तो बेदरींचा ॥ ३ ॥ २१ ॥ **अभंग** ॥ सवें दूत घेऊनि आला राऊळासी ॥ नमन देवासी तेणें केलें ॥ २२ ॥ **आर्या** ॥ जाउनि देंवालयिं तो ठेवुनि चरणावरी भुजा भाळ ॥ यवनापराधकृत मी सदया निजबिरुद आजि सांभाळ ॥ २३ ॥ **पद** ॥ स्थिरचर व्यापका ब्रह्मानंदा ॥ संकटकाळीं रक्षिसी दासां सदां ॥ धृ० ॥ तुजवीण कवणा शरण-मी जाऊंरे ॥ दुजा देव तुजविणें कोण पाहूं ॥ १ ॥ ऐसा आशय सांगुनी अंत-

रींचा ॥ मार्ग धरी वंदुनी बेदरींचा ॥ २ ॥ २४ ॥ **अभंग** ॥ आतां येतों आम्हीं लोभ अमू द्यावा ॥ पुन्हां मी केशवा नये येथें ॥ १ ॥ **कडवें** ॥ हृदयीं गुज कळलें श्रीरंगाला ॥ सांगे रुक्मिणीला ॥ नेती धरुनी गे दामाजीला ॥ ही लज्जा मजला ॥ हिशोब घेउनि जातों वहिला ॥ नग हे द्यावे अवघे तुमचे ॥ वारी० ॥ २९ ॥ **छंद** ॥ सवाईनें अधिक मोल ॥ पंत अक्षराचा डौल ॥ कृत्रिमाचें पत्र फोल ॥ लिहुनियां घेतलें ॥ २३ ॥ **कडवें** ॥ अनत ब्रह्मांडें ज्याच्या पोटीं ॥ सावळा जगजेठी ॥ काळी घोंगडी काळी काठी ॥ काळा दोरा कंठीं ॥ बोली महाराची थेट मराठी ॥ गांडीस लंगोटी ॥ पायीं वाहाणा मोठा शाहाणा ॥ पतितपावन नाम जयाचें ॥ वारी० ॥ २७ ॥ **साकी** ॥ त्रिभुवनके पति भक्तन खातर नीच भेख है लीनो ॥ हीन दीनसे दोनो करसे प्रथम जोहरा कीनो ॥ २८ ॥ **कडवें** ॥ प्रथम यवनासी करुनी जोहार ॥ मी विठ्या माहार ॥ मंगळवेढ्याचा वडिबार ॥ ऐकावी खबर ॥ हिशेब घेउनि मायबापा ॥ उत्तर द्यावें लाखोट्याचें ॥ वारीं० ॥ २९ ॥ **ओंवी** ॥ स्वमुखें राव उत्तर ॥ कोण्या गांवींचा तूं महार ॥ येरू बोले मायबापा जोहार ॥ मंगळवेढ्याचा मी असें ॥ ३० ॥ पहीं पाहातां द्रव्यमेळ ॥ रायाचें विकासलें मुखकमळ ॥ म्हणे दामाजीपंत केवळ ॥ विश्वासाचा मुगुटमणी ॥ ३१ ॥ पहा कानडा कपटी चावटी ॥ लोक म्हणताती शेवटीं ॥ यालागीं त्यासी देऊनि सोडचिठ्ठी ॥ दूर करावें सर्वेंच ॥ ३२ ॥ पोतें फोडूनि जों पाहाता तंव तें भरलें अपरिमित ॥ मोजणारांचें थकले हात ॥ आश्चर्य करीत मनामध्यें ॥ ३३ ॥ **साकी** बेदर भूपति करत अचंबा छन छन पल पल मनमों ॥ सब खलकतका स्वामी ये है वैसा आया मनमो ॥ ३४ ॥ **ओंवी** ॥ पावतीपत्र लिहूनि त्वरित ॥ श्रीहरीच्या करीं देत ॥ म्हणे जाय पावलें समस्त ॥ संशयातें सोडुनि ॥ ३५ कडवें ॥ म्हणे मी पंताचा बहु कामाचा ॥ विश्वासु घरचा ॥ बंदा शिरमिंधा आहें त्याचा ॥ जन्मोजन्मींचा ॥ नाजुक जरूर अडलें भिडलें ॥ कामत्रि तेथें मज नफराचें ॥ वारी० ॥ ३६ ॥ पद ॥ धेड तेरी सूरतकी छबन्यारी ॥ धेड० ॥ ध्रु० ॥ वैसो धेड कबूनहि देखे ॥ इतनी उमर हमारी ॥ धेड० ॥ मेरे मनमों येहि खुदाहै ॥ त्रिभुवनकी अखत्यारी ॥ दामाजीको बडो भागहै ॥ चाकर कुंजबिहारी ॥ धेड० ॥ २ ॥ ३७ ॥ **ओंवी** ॥ ऐसें ऐकुनि उत्तर ॥ मनांत म्हणे रुक्मिणीवर ॥ तुझ्या बापाचा चाकर ॥ म्हणून येथें येईन कीं ॥ ३८ ॥ **साकी** ॥ निकले धुंडत दूत भूपके बन बन येहि पुकारे ॥ कांहीं नजर न आवे तबहिं रोवत यह जन सारे ॥ ३९ ॥ **ओंवी** ॥ गहिवरूनि बोले माचार ॥ जो दाखवी विठ्या महार ॥ त्यास देईन राज्यभार ॥ सर्व संपत्ती समवेत ॥ ४० ॥ वृद्ध म्हणती नृपासी ॥ शरण जावें दामाजीसी ॥ तोच दाखवील विठ्या महारासी ॥ निश्चय हाची जाणावा ॥ ४१ ॥ **अभंग** ॥ दामाजिपंतासी बेदरासी नेलें ॥ राजा म्हणे झालें कवतुक ॥ १ काल गेला विठ्या रसीद भरूनी ॥ हिशेब घेउनि जाब दिला ॥ २ ॥ कैंचा विठ्या कोठें पाठवीला कधीं ॥ काढूनियां कधीं जाब दिला ॥ ३ ॥ पाहतांचि जाब हृदय फुटलें ॥ आश्चर्य वाटलें मनामध्यें ॥ ४ ॥ ॥ ४२ ॥ **साकी** ॥ सुन दामाजी नही सुझत कछु जुगुत बिचारहि धंदा ॥ बिठू धेडहै कहा बतावो मै हूं तुमका बंदा ॥ ४३ ॥ **अभंग** ॥ नव्हे नव्हे तो महार ॥ देवी रखुमाईचा वर ॥ १ ॥ ज्याचा नकळे वेदापार ॥ झाला मजसाठीं महार ॥ २ ॥ कैसा

जन्मलों चांडाळ ॥ शिणवीला तो दयाळ ॥ ३ ॥ काय वांचूनियां आतां ॥ दुःख दिलें पंढरीनाथा ॥ ४ ॥ किती वर्णूं पुरुषोत्तमा ॥ जनी म्हणे झाली सीमा ॥ ५ ॥ ४४ ॥ **साकी** ॥ सब तरुवर कूं पूछत है कहुं देखा अंत्यज वनमों ॥ निशिदिनि घरि पल चैन नही बहू बरखत जल नयमानो ॥ ४५ ॥ **अभंग** ॥ राउळांत जातां सन्मुख देखिला ॥ विठूनें धरिला हृदयकमळीं ॥ ४६ ॥ क० ॥ देवें दामाजी हृदयीं धरिला ॥ समजावी त्याला ॥ बारे श्रम बहुत झाले तुजला ॥ श्रुत नाहीं मजला ॥ अघटित कारणीं करूनि लपवी ॥ कार्य साधूनि हरि भक्ताचें ॥ बारी० ॥ ४७ ॥ **साकी** ॥ मे पतीतता राजा तुमहि पावनके सिरताज्या ॥ गनिका अजामिल तारे कीर्तनीं वाजत नौबतबाजा ॥४८॥ ॥ चौ० ॥ मेरे पापिनका काज ॥ आप आये महाराज ॥ मैहूं दुष्ट दगलबाज ॥ मोरि लाज राखिये ॥ ४९ ॥ **ओंवी** ॥ आहेसा गमे यवन ॥ कैसा येऊं त्यासी सोडून ॥ जन्मापासून खादलें अन्न ॥ त्याचें उणें न साहे ॥ १९ ॥ कैसा तरी अन्नदाता ॥ लोक म्हणती तत्त्वतां ॥ यालागीं यासी उद्धरूनि पंढरिनाथा ॥ लाज राखिली पाहिजे ॥ ९१ ॥ कड० ॥ यवन याच्या योगें तरला ॥ मुक्तिस नेला ॥ होता पुण्याचा दोर पहिला ॥ तो कामा आला ॥ यापरि चरित्र दामाजीचें ॥ श्रवण करितां भवभय कैंचें ॥ वारी संकट हरि दामाजीचें ॥ कौतुक देवाचें ॥ ९२ ॥

उपसंहार.

असो. याप्रमाणें दामाजीपंत महासंकटांत पडला होता; त्यांत यवनाशीं गांठ. शिपाई बोलावूं आलेला, अन्याय खराच; तथापि दामाजीपंताचा दृढनिश्चय विठ्ठलचरणीं असल्यामुळें त्या तशाही प्रसंगीं न डगमगतां अंतःकरणांत प्रभूचें स्मरण केलें आणि आतां प्रभु विठ्ठलावांचून दुसरा कोणी त्राता नाहीं असें समजून बादशाहाकडे निघाला. त्या वेळीं प्रभूनीं त्या संकटांतून सहज त्यास पार केलें. तस्मात् स्मरण करणाराचें संकट प्रभु दूर करितोच. असा आशय मनांत आणून मूळ अभंगांत तुकारामबुवा म्हणतात—पडतां जडभारी ॥ दासीं आठवावा हरी ॥ ध्रु० ॥ तवकथामृतं तप्तजीवनं० ॥ हेंचिदान देगा देवा० ॥ आरती ॥ कायेनवाचा० ॥ अच्युतं केशवं० ॥ हरेराम हरे० ॥ पुंडरीकवरदा हरिविठ्ठल ॥ पार्वतीपते हर हर महादेव ॥ जानकी जी० ॥ सब संतनकी जय ॥ संपू. ॥

पूर्वरंग निरूपण.

श्रीमन्मंगलमूर्तये नमः ॥ अविरलमदजलनिवहमित्यादिनमनम् ॥ गुरुराज माउली दयाकर गुरुराज माउली ॥ इति भजनं ॥ पुंडरीक० पार्वतीप० सीताकांतस्म० ॥ ध्रुवपद म्हणावें ॥ जानकीजीवनस्मरण ॥ पद ॥ ज्याचा तो जाणे ज्याचा तो जाणे ॥ जाणीव निमाली यासचि बाणे ॥ ध्रु० ॥ जनीं जनार्दन जाणोनि वागे ॥ पदोपदीं त्याला समाधी लागे ॥१॥ ज्याचा तो जाणे ॥ चित्सुखसागरीं हारपलें चित्त ॥ ठायींचे ठायीं तो पूर्ण निवांत ॥ २ ॥ ज्या० ॥ सद्गुरुकृपें केशवीं देख ॥ देखणेपणाचा राहिला लेख ॥ ज्याचा० ॥३॥ ळी महाराज ॥ पुंडरी० पार्वती० सीताकां० ॥

उपोद्घात.

कीर्तनारंभाचे ठायीं भगवद्भक्त आणि आत्मसाक्षात्कारी असे केशवस्वामी हे विचाराची पूर्णता झाल्यावर आत्मस्वरूप एक स्वसंवेद्यच आहे असें स्वानुभवें जाणून त्या विषयींचा अनुवाद करितात—ज्याचा तो जाणे ज्याचा तो जाणे ॥ जाणीव निमाली त्यासीच वाणे ॥ ध्रु० ॥ या पदामध्यें केशवस्वमी म्हणतात कीं, ज्याचा तो जाणतो. अर्थात् मग गुरु, शास्त्र, सज्जन, परंपरा यांची कांहीं अपेक्षा राहिली नाहीं, असें सिद्ध होतें. शंकाकार म्हणतो असें जर आहे तर गुरु आणि शास्त्र यांची जी प्रशंसा केली आहे आणि गुरुशास्त्रांच्या योगानें ज्ञान प्राप्त होतें असें जें म्हणतात तें मिथ्या होईल. जसें श्लोक ॥ अतिदूरतरं निजस्वरूपं गुरुशास्त्रान्नविचारयेद्यदि ॥ निकटंगुरुशास्त्रवेदनात् प्रकटं स्यात्स्वतनौस्वयं हि तत् ॥ १ ॥ अर्थ—जर मनुष्य गुरुमुखापासून शास्त्र विचारपूर्वक श्रवण करणार नाहीं तर आत्मस्वरूप फार दूर आहे. पण गुरुमुखेंकरून शास्त्रीय ज्ञान झालें असतां तें (आत्मस्वरूप) निकट म्हणजे जवळ आहे. कांकीं तें आपलें आपण या देहांतच प्रगट होतें. म्हणजे पाहणारास प्रथम स्फुरणरूपानें अनुभवास येतें; इतकेंच नव्हे तर पाहणारा स्वतः तेंच होतो. आतां प्रथम स्फुरण म्हणजे काय तर शब्दादिक विषय स्फुरण्यापूर्वी तत्स्फारेक इंद्रियें असतात. त्यांच्याही पूर्वी तत्स्फारेक मन असतें आणि त्या पूर्वीही मनाच्या उदयास कारणभूत जें स्फुरण अहमस्मि अशा आकाराचें तें, त्यास प्रथम स्फुरण असें म्हणतात. याविषयीं प्रमाण-ओंवी (ज्ञानेश्वरी) अर्जुनपण न येतां ॥ मी ऐसें जें पंडुसुता ॥ स्फुरे तेंचि जाण तत्वतां ॥ तयाचें रूप ॥ १ ॥ असो. तस्मात् पूर्वीच्या वाक्यावरून गुरुशास्त्रविचारानेंच ज्ञान होतें असें सिद्ध आहे. आणि आपण म्हणतां ज्याचा तो जाणें तर हें केशवस्वामीचें वाक्य विरुद्ध दिसतें अशी शंका आल्यास त्यावर केशवस्वामी समाधान करितात ॥ जाणीव निमाली त्यासींचं वाणे ॥ ज्याचा तो जाणे ॥ ध्रु० ॥ अरे तूं जें म्हणतोस, गुरुशास्त्रावांचून अत्यंत दुर्बोध अशा ब्रह्मस्वरूपाचें ज्ञान होणें नाहीं, तर हें तुझें म्हणणें योग्य आहे, कारण गुरूनें उपदेश केल्यावांचून व कांहीं शास्त्रसिद्धांत समजल्यावांचून आत्मज्ञान होत नाहीं. आतां आमचें जें म्हणणें, ' ज्याचा तो जाणे, ' तेंही पण खरें आहे. कसें म्हणशील तर जाणणें हें दोन प्रकारचें आहे, एक परोक्ष आणि दुसरें अपरोक्ष. त्यांत परोक्ष म्हणजे ऐकीव शब्दज्ञान तें होण्यास गुरु व शास्त्रप्रक्रिया यांची अपेक्षा आहे, परंतु अपरोक्ष (अनुभवज्ञान) हें ज्याचें त्यालाच होतें. येथें शास्त्र केवळ दर्शक आणि गुरुरूपानें आपणच आहों अशा अभिप्रायानें पदकार प्रवृत्त होऊन म्हणतात, ॥ ज्याचा तो जाणे ज्याचा तो जाणे ॥ जाणीव निमाली त्यासीच वाणे ॥ ध्रु० ॥ आतां अपरोक्षज्ञानकाली गुरुशास्त्रादि द्वैत तर नाहींच. परंतु ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय हाही विभाग रहात नाहीं. अशाविषयीं श्रीमच्छंकराचार्य प्रतिपादन करितात ॥ श्लोक ॥ यस्मादन्यन्नास्त्यपि नैवं परमार्थं दृश्यादन्योनिर्विषयज्ञानमयत्वात् ॥ ज्ञातृज्ञानज्ञेयविहीनोऽपिसदाज्ञस्तंसंसारध्वांतविनाशंहरिमीडे ॥ २ ॥ अर्थ—ज्या आत्मस्वरूपाहून अन्य कांहीं नाहीं आणि आपाततः जरी कांहीं दृश्यमान झालें तरी तें सत्य नाहीं. आत्मा हा दृश्याहून भिन्न म्हणजे अदृश्य आहे. कारण तो निर्विषय जें ज्ञान तत्स्वरूप आहे, म्हणून परमात्मा हा ज्ञाता (जाणणारा), ज्ञान

(जाणणें) आणि ज्ञेय (जाणण्याचा) विषय) या त्रिपुटीनें रहित आहे परंतु सर्वदा ज्ञानस्वरूप आहे. त्या संसाररूपी अंधकाराचा नाश करणाऱ्या परमात्म्या श्रीहरीस मी स्तवितों. तात्पर्य, आचार्यांचेंही म्हणणें असेंच आहे कीं, परमात्मस्वरूपी ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय या त्रिपुटीवांचून ज्ञान आहे. अर्थात् भिन्नत्वानें मुळींच ज्ञान व्हावयाचें नाहीं. ज्याचा तोच एकरूपत्वानें जाणेल तर जाणेल. या अभिप्रायानें केशवस्वामी म्हणतात. ॥ ज्याचा तो जाणे ॥ जाणीव निमाली त्यासीच बाणे ॥ १ ॥ पूर्वोक्तसिद्धांताच्या यथार्थ ज्ञानास साधन द्वितीय चरणांत सांगतात. ॥ जनींजनार्दन जाणूनि वागे ॥ पदोपदीं त्याला समाधि लागे ॥ २ ॥ सर्व जनांचे ठायीं अंतर्बाह्य व्यापकत्वेंकरून परमात्मा आहे असें जाणून जो वागतो त्याला पदोपदीं समाधिसुख प्राप्त होतें. आतां सर्व ठिकाणीं परमात्मा आहे याचा प्रत्यय काय असें म्हणाल तर याविषयीं प्रमाणः—॥ श्लोक ॥ पाषाण वृक्षतृण धान्यकटांबराद्या दग्धा भवंतिही मृदेव यथा तथैव ॥ देहेंद्रियासुमनआदि समस्तविश्व ज्ञानाग्निदग्धमुपयांति परात्मभावं ॥ १ ॥ अर्थ—पाषाण, वृक्ष, तृण, धान्य, कट (चटई) वस्त्र आदिकरून सर्व पार्थिव पदार्थ दग्ध झाले असतां शेवटीं त्यांचें मूळ कारण जी भूमि तद्रूपतेप्रत पावतात. कारण ज्याचा जो आदि तेथेंच त्याचा अंत होतो. जसा घट हा मृत्तिकेचें कार्य असल्यामुळें कारणभूत जी मृत्तिका तिचे ठायीं लय पावतो. या दृष्टांताप्रमाणें देह, इंद्रियें, प्राण, मन व बुद्धि इत्यादि सकल विश्व ज्ञानाग्नीकरून दग्ध झालें असतां म्हणजे देहेंद्रियादि सर्व संघाताहून भिन्न जें आत्मस्वरूप तेंच देहेंद्रियादिकांस प्रकाशत्वें करून अधिष्ठानत्वें करून आणि तद्रूपत्वें करून आहे असें विचारयुक्त बुद्धीनें पाहिलें असतां परमात्मरूपाप्रतच पावतात म्हणजे त्या विचारकालीं तीं तत्त्वें न भासतां एक आत्मस्वरूपच अवशिष्ट राहतें. या न्यायानें जो जनांचे ठायीं जनार्दन म्हणजे परमात्मा यास पहातो तो पावलोपावलीं (सर्वदां) समाधिसुख भोगितो. अथवा, ' पदोपदी ' पद्यते म्हणजे प्राप्त होतें. अर्थात् ज्या ज्या संकेतानें जें जें प्राप्त होतें तें सर्व पद त्या ठिकाणीं म्हणजे पदार्थमात्राचे ठायीं एक परब्रह्मच अविभक्तपणानें आहे अशा रीतीनें पाहिलें असतां प्रतिपदार्थीं त्यास समाधि लागेल यांत कांहीं संशय नाहीं. याविषयीं वाक्यवृत्तींत भगवत्पादाचार्य म्हणतात. ॥ श्लोक ॥ नष्टे पूर्वविकल्पे तु यावदन्यस्य नोदयः ॥ निर्विकल्पक चैतन्यं स्पष्ट तावद्विभासते ॥ १ ॥ अर्थ—पूर्व विकल्प (पहिली कल्पना) नष्ट होऊन दुसरीचा जोंपर्यंत उदय होत नाहीं तोंपर्यंत निर्विकल्प म्हणजे भेदरहित असें चैतन्य स्पष्ट प्रकाशमान होतें. अर्थात् अशा रीतीनें वृत्तीनें एक पदार्थास सोडून दुसऱ्या पदार्थास व्यापण्यापूर्वी निर्विकल्प स्थिति स्वतःसिद्ध आहे तीच मननपूर्वक पाहणार जो साधक त्यास पदोपदीं समाधि लागते. तस्मात् अशा विचारानें समाधिसुख जें प्राप्त होतें त्याचा अनुभव ज्याचा त्यालाच. हें अगदीं स्पष्ट आहे. असा आशय मनांत आणून केशवस्वामी म्हणतात. ' ज्याचा तो जाणे ॥ २ ॥ जाणीव निमाली त्यासीच बाणे ' ॥ आतां यावर शंकाकार म्हणतो, समाधिसुख इंद्रियादिकांना गोचर होणार नाहीं, हें योग्यच आहे, कारण तीं बहिर्मुख आहेत, परंतु ' मनसैवेदमाप्तव्यं ' इत्यादि श्रुतिप्रामाण्यावरून मनास तें समाधिसुख समजलें पाहिजे. असें ऐकून द्वितीय चरणांत केशवस्वामी त्याचें समाधान करितात

'चित्सुख सागरीं हरपलें चित्त ॥ ठायींचे ठायीं तो पूर्ण निवांत ॥ २ ॥' चित् म्ह० ज्ञान आणि सुख म्हणजे आनंद हीं पदें दोन आहेत परंतु या दोहोंचा लक्ष्य अर्थ एकच आहे. जसें गुलाबाचें फूल एक असून गंध, रस, स्पर्श आणि रूप हीं भिन्न अशीं वाटतात. याचें कारण त्याची ग्राहकें जी घ्राणादिक इंद्रियें तीं भिन्न होत म्हणून त्याचाही भेद वाटतो. परंतु वस्तुतः पुष्पाचे ठायीं ते गंधादिक अभिन्नच आहेत; कारण एकास सोडून एक राहत नाहीं. तद्वत् चिदानंदही एकच आहे. परंतु ग्रहण करणारी वृत्ति जर रजोगुणानें व्याप्त असली तर ज्ञान (समजणें) मात्र तिला होतें. आणि सत्वगुणात्मिका वृत्तींत आनंद व ज्ञान दोन्हीही अनुभवास येतात. अशा अभिप्रायानें चित्सुखसागरीं असें म्हटलें आहे. या सच्चिदानंदरूप समुद्रांत चित्त निमग्न झालें असतां त्याचा चित्तपणाच हारपतो म्हणजे नाहींसा होतो याविषयीं एक कवीची उक्ति आहे. ॥ श्लोक ॥ चित्तं चिच्च विजानीयात्तकाररहितं यदा ॥ तकारो विषयाभ्यासस्तस्य त्यागे चिदेवहि ॥ २ ॥ अर्थ—चित्त हें तकारानें रहित झालें असतां चित् (ज्ञानस्वरूप) च आहे असें जाणावें. तकार हा विषयाभ्यास होय. अर्थात् विषयाभ्यास नष्ट झाला म्हणजे चित्त चैतन्यच आहे. असो. याप्रमाणें चित्त हारपल्यावर आपले ठिकाणीचें पूर्णकाम होऊन तो पुरुष स्वस्वरूपीं निश्चळ राहतो. तस्मात् त्या स्थितींत जें स्वरूपसुख अनुभूयमान होतें तें मनासही ज्ञात होत नाहीं. तर तें, केवळ स्वयंवेद्यच होय. अशा अभिप्रायानें केशवस्वामी म्हणतात. ज्याचा तो जाणें ज्याचा तो जाणे ॥ जाणीव निमाली त्यासीच वाणे ॥ ध्रु० ॥ आतां मनादिकांस त्या स्वरूपसुखाचें ज्ञातृत्व नाहीं असें सिद्ध झालें; परंतु मनादिकांहून पर जो आत्मा त्यास तरी तें ज्ञान असेल अशी शंका उत्पन्न झाल्यास त्याविषयीं शेवटल्या चरणांत समाधान करितात ॥ सद्गुरूकृपें केशवीं देखा ॥ देखणेपणाचा राहिला लेखा ॥ ४ ॥ केशवस्वामी म्हणतात, सद्गुरूच्या कृपेनें मी सच्चिदानंद सर्वसाक्षी इत्यादिक देखणेपणाचा द्रष्टत्वाचा (लेखा) संस्कारही राहिला म्हणजे शांत झाला. कारण ज्याच्या योगानें सर्व जाणलें जातें त्यास कोणी कशानें जाणावें इत्यादि श्रुतितात्पर्यावरून आणि स्वानुभवावरून आत्मस्वरूप ज्ञानाज्ञानांहून अतीत आहे. त्यासी प्रत्यंतर दुसरें नकोच अशा अभिप्रायानें केशवस्वामी प्रथम पदांत म्हणतात. ज्याचा तो जाणे ज्याचा तो जाणे ॥ जाणीव निमा० ॥ आतां कोणी म्हणेल कीं, ज्याचा तो जाणे ॥ या ध्रुवपदाप्रमाणें व शेवटीं देखणेपणाचा राहिला लेख या वाक्याअन्वयें म्हटलें म्हणजे जाणीव आणि देखणेपणाचा यांचा नाश झाल्यावर कोणताही व्यवहार राहणार नाहीं कारण सर्व व्यवहारास जाणीव कारण आहे. याविषयीं मुकुंदराजाचें परमामृतांत एक वाक्यही आहे ॥ ओंवी ॥ यांत तुझी एक जाणीव नाहीं. ॥ तरी हें इत्यादि नस्फुरे कांहीं ॥ यास्तव ब्रह्मज्ञान झाल्यानंतर सर्व व्यवहार बंद होतात कीं काय अशी शंका आल्यास त्यावर केशवस्वामीचें समाधान असें आहे कीं, वस्तुगत्या विद्याऽविद्यादि स्पर्शरहित आणि अहंकारादि मलविवर्जित अशा आत्मस्वरूपीं ज्ञातृत्व, द्रष्टृत्व, हीं स्वाभाविक नाहींत तर औपाधिक आहेत यास्तव सर्व व्यवहार बंद होतात असें नाहीं, परंतु त्यावर मिथ्यात्व दृष्टि होऊन ते सर्व बाधितानुवृत्तीनें राहतात. याविषयीं विद्यारण्य स्वामीचीही उक्ति पंचदशींत आहे ॥ नाप्रतीतिर्भवेद्बाधः किंतु मिथ्यात्व-

चिंतनम् ॥ म्हणजे जगताची व जगद्व्यापारांची अगदीं अप्रतीति होणें हा बाध शब्दाचा अर्थ नव्हे तर त्याविषयीं मिथ्यात्वचिंतन असणें हाच बाध होय. अर्थात् अशा बाधानुवृत्तीनें सर्व व्यवहार होतात अशा अभिप्रायानें कवि ब्रह्मविद्याविशारद आणि ब्रह्मनिष्ठकुलशिखामणि अशा श्रीरामचंद्राचें राज्याभिषेक आख्यान निरूपण करितात.

रामराज्याभिषेक.

अभंग ॥ रावण मारूनी झाला जयवंत ॥ राज्य दे भगवंत बिभीषणा ॥ १ ॥ मग बोले राम अंजनीचे सुता ॥ सांगे लंकानाथा सीता आणी ॥ २ ॥ १ ॥ **साकी** ॥ दसकंधरकू मारकर प्रभु लंका देत बिभीखनकू ॥ यह वृत्त सीतासुनवेकौ फेर पठा दियो हनुमतकू ॥२॥ **दिंडी** ॥ असें ऐकूनि राम भाषणासी ॥ त्वरें आलाचि अशोक काननासी ॥ वंदुनियां जानकी पदयुगातें ॥ वदे रामाज्ञा तीस मुदित चित्तें ॥ ३ ॥ **आर्या** ॥ दशकंठ क्षयवार्ता ऐकुनि सीता म्हणे मरुत्पोता ॥ दावीं आतां राजा मजला चिंता महासरित्पोता ॥ ४ ॥ प्रभुवचनें मग त्याणें स्नाता धृतभूषणा जगन्माहिता ॥ बैसवुनी नरयानीं अति हर्षें आणिली घरा दुहिता ॥ ५ ॥ **पद** ॥ वानर म्हणती भूपाळा ॥ दर्शन न दे माय बाळा ॥ ध्रु० ॥ वानर शिबिकेच्या भवती ॥ घोष बहु चोपदार करिती ॥ यष्टिका घेउनियां फिरती ॥ सर्वी कपिसीं ताडितार्ती ॥ पहा बा सदया आम्हाला ॥ दर्शन० ॥ ॥ १ ॥ कोणी म्हणती श्रीरामा ॥ मरण कां न नये अझुनी आम्हां ॥ कोणी म्हणती बलभीमा ॥ लाजचि नसे पूर्णकामा ॥ मारिती आम्हां असुर बाळा ॥ दर्श० ॥ २ ॥ ६ ॥ **पद २ रें** ॥ आमुची विनवणी बोल ॥ मारुती आमु० ॥ ध्रु० ॥ राक्षस वदले मातेसाठीं ॥ श्रम झाले बहु फोल ॥ मारुती० ॥ १ ॥ राक्षसि आम्हां मारिती आतां ॥ पुण्या नाहीं मोल ॥ २ ॥ ऐकुनि ऐसें कथि रामाला ॥ वर्षि कृपेचा डोल ॥ मारु० ॥ ३ ॥ ७ ॥ **अभंग** ॥ ऐकूनियां ऐसें क्रोधावला राम ॥ जाणूनियां काम वानरांचा ॥ १ ॥ पालखी सोडूनी चालो भूमीवरी ॥ पहावी डोळेभरी वानरांनीं ॥ २ ॥ ८ ॥ **ओंवी** ॥ राम बोले सीते सुंदरी ॥ तूं होतीस परमंदिरीं ॥ त्याचा संशय लोकांतरीं ॥ फार झाला वाटतो ॥ ९ ॥ ॥ **आर्या** ॥ यापरि अप्रिय वदतां आलें दुःखाब्धिनीर नेत्रांस ॥ गात्रांस कंप सुटला सीता बहु पावली मनीं त्रास ॥ १० ॥ **रामा०** ॥ लक्ष्मणं प्राह मे शीघ्रं प्रज्वालय हुताशनं ॥ विश्वासार्थं हि रामस्य लोकानां प्रत्ययायच ॥ ११ ॥ **आर्या** ॥ अघशंका वाराया प्रत्यय उपजावया विशुद्ध सती ॥ शपथ पुरस्सर दीप्त ज्वलनज्वालांत जाहली धसती ॥ १२ ॥ हरशक्रांबुजजन्मप्रभृति त्रिदशार्षि देव गंधर्व ॥ म्हणती रामा सीता निर्दोषा सत्य बोलतों सर्व ॥ १३ ॥ **श्लोक** ॥ पावली स्वविरहें अनुकंपा ॥ राम तीवरि करी अनुकंपा ॥ धन्य तोचि सुख वासर तीतें ॥ मग्न तोचि सुखवास रतीतें ॥१४॥ **साकी** ॥ अर्भक बंदर देखत चाहत तब सीता माइनसो । उनकू सबही दूर करे और मार दियो लकुटिनसो ॥ १५ ॥ **पद** ॥ चलो चलो घर जाइये, सबमिल चलो० ॥ माताबिभीखन पास लेयोहै ॥ हमकूं दरसन पाइये ॥ चलो० ॥ १ ॥ सुगल बालिसुत बजरंगजीकू ॥ प्रेमाकिसे जबिछाये ॥ २ ॥ परे सुगर प्रभू अपने काजकू ॥ अब हमकूं दुखदाइये ॥ चलो० ॥ ३ ॥ सुरदास प्रभू बाल कपिनकी ॥ तुमही लाज निभाइये ॥ च०

॥ ४ ॥ १६ ॥ **पद २ रें** ॥ काहे कु तोरा संगा रामजी का० ॥ध्रु० ॥ नलनील जाबुवंत हनुमान ॥ येहे लुटत सब रंग ॥ १ ॥ सीता माइको दरसन बतावो ॥ परत तीतमोभंग ॥ का० ॥ २ ॥ सूरशामप्रभु बालकीपनसे ॥ हुवा बडा परसंग ॥ ३ ॥ १७ ॥ **श्लोक** ॥ निरखुनि विभु त्यासी वैसवी अग्रभागीं ॥ स्तवुनि मग म्हणे मी तूमच्यानें सुभागीं ॥ मधुरवचनीं रामें दीधली सौख्य बाळा ॥ घडि घडि जगपाळा मानसीं ये उमाळा ॥ १८ ॥ ॥ **दिंडी** ॥ अकस्मात वैसूनियां विमानीं ॥ राय दशरथ पावला तया स्थानीं ॥ बोधशब्दा सांगुनी राघवाला ॥ पुत्रमस्तक हुंगून नभीं गेला ॥ १९ ॥ **श्लोक** ॥ बिभीषणाला मग राम सांगे ॥ पूजीं कपींद्रां सकळांसि वेगें ॥ आणी त्वरें पुष्पक जाण मातें ॥ वाटे कनिष्ठा सय फार होतें ॥ २० ॥ **साकी** ॥ भरतभाइकूं मिलने चाहत मनमों करत है चिंता ॥ दोनो नयन जल भर भर आवे सुनो बिभीखन भगता ॥ २१ ॥ सुनो बिभीखन सुलग बालिसुत सुनरे बजरंग प्यारे ॥ भरत मिलेबिन घायल सब येह प्रानहि होत हमारे ॥ २२ ॥ **अभंग** ॥ भरतावांचूनि नाहीं मला कोणी ॥ भक्तशिरोमणि भेटो आम्हां ॥ १ ॥ ऐसें बोलूनीयां करी तळमळ ॥ नेत्रीं येतें जळ राघवाच्या ॥ २ ॥ ॥ २३ ॥ आर्या ॥ हें रघुसत्तम वदतां बिभीषणें सर्व पूजिलीं कटकें ॥ दिधलीं हाटक मणिमय सत्पदकें हार कुंडलें कटकें ॥ २४ ॥ साकी ॥ बिमानका जब सुमरन किय्या तबही सन्मुख पायो ॥ राम लछीमन सीता माई सब कपि यानें चढायो ॥ २५ ॥ **श्लोक** जवळ अनुज सीता राम बैसे विमानीं ॥ कपिपतिसह जाती बंधु तेजें विमानीं ॥ दशमुख अनुजा हे उत्तमश्लोक लंका ॥ पवनजसह यांनीं घे तया निष्कलंका ॥ २६ ॥ **अभंग** ॥ विमानीं बैसुनी निघे रामराजा ॥ वानरांच्या फौजा घेवोनियां ॥ २७ ॥ **आर्या** ॥ सीतेशि म्हणे राघव रिपुकटकें या रणांगणीं शमलीं ॥ सुमुखि मदीय शरानलवदनीं सारीं पतंगसीं गमलीं ॥ २८ ॥ **ओवी** ॥ जानकी म्हणे राघवासीं ॥ दाखवा मज वानर स्त्रियांशीं ॥ रामें धाडूनि सुग्रीवासी ॥ तारादि स्त्रिया आणविल्या ॥ २९ ॥ **श्लोक** ॥ गौरी तनुर्नयनमुन्नतमायताच नासा कृशा कटितटी वसनं विचित्रं ॥ अंगानि रोमरहितानि कथं सुखाय पुच्छं न तुच्छमिति यत्र समस्तमस्ति ॥ ३० ॥ **आर्या** ॥ हे पंपा पुण्यजला येथें तुजला स्मरूनि मी रडलों ॥ सौमित्र्यंकावरता मुहूर्तपर्यंत कश्मलें पडलों ॥ ३१ ॥ निशिचरनायक येथें आला होऊनि दंभ संन्यासी ॥ तुज नेउनि मज दिधलें दुःख जनीं जें असह्य अन्यांसी ॥ ३२ ॥ दिसतो आश्रम तो पहा जेथें तुज शोधितां सये जाये ॥ शतवार सानुजें म्यां केलें गोदावरीस ये जा ये ॥ ३३ ॥ दिंडी ॥ तुवां उटजीं पाळिले स्वयें पक्षी ॥ उडति मंजुळ शब्दांसि करिती लक्षीं ॥ पेरु केळी नारळी आम्रफूलें ॥ पहा फुलली हीं फळलिं जंबुकूळें ॥ ३४ ॥ **अभंग** ॥ पाहें गुंजारवें कुजती भ्रमरी ॥ जाती वृक्षावरी वेली पाहें ॥ १ ॥ पाहे गोदावरी ऋषींचे आश्रम ॥ गेले विपज्छम ज्याच्या योगें ॥ २ ॥ ३५ ॥ **साकी** ॥ तन्हो तन्होके देखे नगर तब चित्रकूट नग आये ॥ गंगा-जमुना संगम देखे भरद्वाज मठपायें ॥ ३६ ॥ **श्लोक** ॥ क्षितिवरी उतरी मग यान तें ॥ उतरुनी मुखवी ऋषिला न तें ॥ भरत बंधुस त्या ऋषिला पुसे ॥ अति मनीं विरहातुर होतसे ॥ ३७ ॥ **अभंग** ॥ न वर्णवती मज तयाचे ते गुण ॥ कासावीस प्राण होतो माझा ॥ १ ॥ मजसाठीं तेणें सोडिला संसार ॥ फार त्याचा भार मजवरी ॥ २ ॥ ३८ ॥ **पद** ॥

कुशल वृत्त मज सांगा मम प्राणसख्या भरताचें ॥ ध्रु० ॥ वनवासा गेलों कळतां अति दुःखित अंतरिं झालां ॥ धिक्कारुनि कैकयिमाता, धांवुनियां मजप्रति आलां ॥ चित्रकूठ पर्वतिं येतां पाहुनियां मजप्रति धाला ॥ चा० ॥ परतलों नाहिं मी मागें ॥ मजवरि तो भरला रागें ॥ सर्वस्वहि लोटुनि रागें ॥ गेला हें कर्म सताचें कु० ॥ १ ॥ मुनि वदे ऐक तूं रामा तयिं पासुनि नंदिग्रामीं ॥ वल्कलें जटा निराहारी मन ठेउनि भरतें रामीं ॥ इंद्रियांस दमुनि तयां तो रथ यूथपसा संग्रामीं ॥ चा० ॥ पादुकांस अर्पुनि रा-ज्य ॥ राज्यभोग करुनि त्याज्य ॥ मानसीं विरक्त प्राज्य ॥ सोडुनियां कर्म हिताचें ॥ २ ॥ कु० ॥ ३९ ॥ **साकी** ॥ भरद्वाजकों वचन सुनाकर नयनज निर भर आया । भाई भरतजी भाई भरतजी ऐसा शब्द बुलाया ॥४०॥ **आर्या** ॥ पवनतनय मग रामें भरा-तातें पश्चागमासि कळवाया ॥ पाठविला दूत पुढें लोकांचा सर्व शोक पळवाया ॥ ४१ ॥ ॥ **अभंग** ॥ मारुती तो मार्गीं गुहासी कळवूनी ॥ गेला त्वरें सदनीं भरताच्या ॥ ४२ ॥ **आर्या** ॥ मणि हेममयश्रीमद्रघुनंदन पादुकार्चनाधीन ॥ मीन जळाविण तैसा मारुतिनें भरत देखिला दीन ॥ ४३ ॥ **पद** ॥ धरो भरत धीर मनसें ॥ आये रामासिता लछिमनसें ॥ ॥ ध्रु० ॥ रजनीचर दुर्जन सब मारे ॥ रावन कुंभकरनसें ॥ १ ॥ सुगल बालिसुत आंगे दौरत ॥ जोर हात तनमनसें ॥ २ ॥ सब बानरके फौज चलत है ॥ कौन रहे बिल मनसें ॥ ३ ॥ भरत भरत येहि नाम पुकारत ॥ प्रभुजी पल पल छनसें ॥ ४ ॥ पन-तनय कहे अमृत बचनसें ॥ खुबहि करो जतनसें ॥ ५ ॥ ४४ ॥ **आर्या** ॥ आलिंगुनियां श्रीमान् मारुतिला कांचनासनीं अर्चीं ॥ प्रार्थुनि म्हणे कृपालो मालविली शोकवन्हिची अर्चीं ॥ ४५ ॥ रामचरित्र पयामृत पाजावें त्वां महातृषाक्रांता ॥ बाळाला स्तन्य जसें देते माता कृपाकुलस्वांता ॥ ४६ ॥ राक्षस संशय केला बिभीषणाला समर्पिली लंका ॥ विजयी राघव आला घेउनि सीता सती गतकलंका ॥ ४७ ॥ सुग्रीव वानराधिप राक्षस राजा विभीषणख्यात ॥ आले प्लवग निशाचर तुजला भेटावया असंख्यात ॥ ४८ ॥ ॥ **श्लोक** ॥ गोमूत्र पक्कजव भक्षुन वाट पाहे ॥ श्रीरामचंद्र अझुनीहि नयेचि कां हें ॥ कीं स्थंडि वारिज जसे क्षण कल्प कंठीं ॥ जो प्राण देउनि असे बसला स्वकंठीं ॥ ४९ ॥ **पद** साचि कहोरे भाई बजरंग ॥ ध्रु० ॥ बिभीखन और सूगल बालिसूत ॥ इनकी पुरन कमाई ॥ १ ॥ मय अपराधी बडो रामको कछुहिबातमनलाई ॥ २ ॥ जीवनसुतप्रभु मेहेर करे कब ॥ तुमको राम दुहाई ॥ ३ ॥ ५० ॥ **साकी** ॥ कहे भरतजी सुन सुन साधो सब देवनका राजा ॥ मेरो सुमरन करत रामजी तबही तुमको भेजा ॥ ५१ ॥ **ओंवी** ॥ आश्वासूनियां भरतासी ॥ वेगें पातला रामापासी ॥ रामासि म्हणे चला वेगेंसी ॥ विलंब ना करा कांहीं आतां ॥ ५२ ॥ **पद** ॥ तेथें भरत देखिला म्यां ॥ रामा आण तुझी ॥ ध्रु० ॥ प्रेमळ तनू लहान बाळ ॥ परि उपवासी लोटित काळ ॥ हातीं घेउनिया जपमाळ ॥ लोटित काळ हरिभजनीं ॥ तेथें० ॥ १ ॥ म्हणे कधिं भेटेल रघुराय ॥ वत्सालागीं जैसी माय ॥ रडत मोकलुनी धाय धाय ॥ कांहीं उपाय न सुचेची ॥ तेथें० ॥ २ ॥ सर्व ऊनियां राष्ट्र ॥ केलें धरणीवरती काष्ठ ॥ तेथें रचियेलें बहुराष्ट्र ॥ पाहिलें स्पष्ट प्रेमेनें ॥ थें० ॥ ३ ॥ ५३ ॥ **श्लोक** ॥ श्रवणिं भरत ऐके राम आला अयोध्ये ॥ अभिमुख विभु थें येति आमात्य योद्धे ॥ पुरजन गुरुसंगें पादुका मस्तकांतीं ॥ करिति रवि शशीचा

आग्रहो ध्वस्तकांती ॥ ९४ ॥ **आर्या** ॥ हें ऐकुनिया श्रीमद्भरते त्वरित प्रमोद पूर्ण-मना ॥ पौर प्रधान माता घेउनि करि राघवाकडे गमना ॥ ९५ ॥ **साकी** ॥ भरद्वाजको पूछ करे तव निकले रघुपत राजा ॥ पथमों गुहकों मिलेचले तव बाजत नौबत बाजा ॥ ९६ ॥ **आर्या** ॥ वाद्यांच्या प्रकारानें मागध बंदिस्तुति स्वनें कांहीं ॥ ब्रह्मांडरिक्त होतें तें भरिलें सर्व देव लोकांहीं ॥ ९७ ॥ अमर कुसुम गण वर्षति तननन करिती समस्त गंधर्व ॥ सर्वत्रांला झालें आनंदाचेंचि तें महापर्व ॥ ९८ ॥ उतरुनियां जगतीवर पुष्पक रामें सबाष्प भरतातें ॥ आघ्राण करूनि माथा हृदयीं धरिलें सुतासि का तातें ॥ ९९ ॥ **केकावली** ॥ धरी भरत पादुका व्यजन चामरें वीजिती ॥ विभीषण कपींद्र जे निजसुखें तयांच्या जिती ॥ सुधाकर धरी मरुत्सुतसितातपत्राकृती ॥ प्रवेश करि राघव स्वनगरीं पवित्रां कृती ॥ १०० ॥ **श्लोक** ॥ कोसलाधिपति कोसललोकीं ॥ दृष्टीनें बहुदिसां अव-लोकी ॥ नृत्यवस्त्र उडवूनि करीती ॥ पुष्पवृष्टि करि कौतुकरीतीं ॥ १०१ ॥ वंदिलें अवघियां वडिलांहो ॥ धाकुट्यांस पदवंदन लाहो ॥ रामलक्ष्मण धरा तनयांही ॥ घेतले पुजुन पूजन यांहीं ॥ १०२ ॥ **आर्या** ॥ त्यावरि उत्तम समयीं भरत वसिष्ठ प्रधान सप्रकृती ॥ राज्याभिषेक कामें प्रार्थिति रामासि पौरव प्रकृतिजनां-१०३ ॥ ॥ **ओंवी** ॥ मग वानरांतें पाठवून ॥ आणविलें चतुःसमुद्रांचें जीवन ॥ वसिष्ठ आपुल्या हातें स्नान ॥ घालिता झाला रामातें ॥ १०४ ॥ **अभंग** ॥ स्नान झाल्यावरी दीधलीं वस्त्रें ॥ कस्तूरी चंदनें लेपायेलीं ॥ १ ॥ अलंकार आंगीं घालिती रामाच्या ॥ माळा त्या फुलांच्या घालिताती ॥ २ ॥ शृंगारूनि राम बैसे सिंहासनीं ॥ वाद्यांचा तो ध्वनि होत असे ॥ ३ ॥ १०५ ॥ **आर्या** ॥ रघुवर हेमनगावर सतडिद्घनसा नृपासनीं साज ॥ सेवक मयूर नाचति चातकसे सर्व भासती राजे ॥ १०६ ॥ **दिंडी** ॥ करुनि पूजा वानरां देई वस्त्रें ॥ प्रेमभावानें भरलिं सकळ नेत्रें ॥ जानकीनें मारुतीस दिली माळा ॥ तयीं हर्षे तो पदीं ठेवि भाळा ॥ १०७ ॥ **श्लोक** ॥ मुक्तेष्वंतर्नरामोऽस्ति तथा रत्नांतरेष्वपि ॥ बंधकाये गुणाः प्रोक्तास्तांतूर्णासंत्यजाम्यहम् ॥ १०८ ॥ **अभंग** ॥ ऐसा सकळांनीं राम केला राजा ॥ वानरांच्या फौजा आनंदती ॥ १०९ ॥ **आर्या** ॥ जेव्हां नृपति जनांला आज्ञा दे जावयासि गेहातें ॥ विरहासहिष्णु रडती म्हणुनि म्हणे त्यांस तो उगें हातें ॥ ११० ॥ ऐसें वदोनि राक्षस वानर राजे ससैन्य पाठविले ॥ मणि पदक प्रतिबिंबच्छळें हृदयांत काय सांठविलें ॥ १११ ॥ आख्यान समाप्त ॥

उपसंहार.

श्रीरामचंद्र पूर्णब्रह्म असून अवतारानुरूप वसिष्ठ गुरूंच्या उपदेशानें ब्रह्मनिष्ठ झाले, आणि सर्व प्रजांच्या संरक्षणाकरितां राज्याभिषेक करून घेतला. त्याप्रमाणेंच सर्व पृथ्वीचें पालन केलें यावरून ब्रह्मज्ञान झाल्याबरोबर सर्व व्यवहार बंद होतात असें कोणीं समजूं नये, आतां तें ब्रह्म कशानें व कोणीं जाणावें आणि तें आपले ठिकाणीं कसें ठसेल असें म्हणाल तर केशवस्वामी सांगतात—ज्याचा तो जाणे ॥ २ ॥ जाणीव निमाली त्यासचि घाणें ॥ हेंचि दान० ॥ आरती ॥ कायेन वा० पुं० जा० ॥ संपूर्णम् ॥

विक्रीस तयार

—:o:—

		रु.	आ.	पै.
१	कीर्तनतरंगिणी भाग १	१	०	०
२	कीर्तनतरंगिणी भाग २	१	०	०
३	कीर्तनतरंगिणी भाग ३	१	०	०
४	कीर्तनतरंगिणी भाग ४	१	०	०
५	सूपशास्त्र	१	४	०
६	शिवस्वरोदय	०	१०	०
७	प्रश्नभैरव	०	७	०
८	पर्शियन नाईटस् भाग १।२।३ प्रत्येकीं ...	१	१२	०
९	योगतत्वामृत	३	०	०
१०	भाक्यवृत्ती (हंसराज स्वामीकृत)	५	०	०
११	शिवगीता सटीक	१	८	०
१२	शिवगीता सार्थ	३	८	०
१३	शनिमाहात्म्य	०	२	६
१४	पदसंग्रह भाग १	०	१४	०
१५	पदसंग्रह भाग २	०	१२	०
१६	मत्स्यपुराण भाग १।२।३	२	८	०

रावजी श्रीधर गोंधळेकर यांचा बुकडेपो,
बुधवार चौक पुणें शहर.